
सप्टेंबर २०२५/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य



## हात मदतीचा!


महाराष्ट्र शासन
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
सेवा हाच संकल्प,
भारत हीच पहिली प्रेरणा ... ७५ वर्षे
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
नवरात्रोत्सव
आठवा राष्ट्रीय पोषण माह २०२५
नवरंग पोषणाचे
सुपोषित भारताचे
दिवस पहिला : रंग पांढरा
POSHAN
Abhiyaan
PM's Overarching
Scheme for Holistic
Nourishment
सही पोषण - देश रोशन
फुलकोबी - व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन के, फोलेट, फायबर
लसूण / कांदे - बॅक्टेरिया आणि विषाणू नष्ट करण्याची क्षमता
दही - व्हिटॅमिन डी, फॉस्फरस, पोटॅशियम
पनीर - प्रोटीन, कॅल्शियम, व्हिटॅमिन डी, व्हिटॅमिन बी
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
एकनाथ शिंदे
उपमुख्यमंत्री
अजित पवार
उपमुख्यमंत्री
आदिती तटकरे
मंत्री, महिला व बालविकास विभाग
मेघना साकोरे बोर्डीकर
राज्यमंत्री, महिला व बालविकास विभाग
महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन
www.icds.gov.in | www.womenchild.maharashtra.gov.in

## ६ प्रभावी मदतकार्यातून आपद्ग्रस्तांना दिलासा!

दरवर्षी पावसाळ्यात काही भागांमध्ये दुष्काळ, तर काही भागांमध्ये अतिवृष्टी अशी दुहेरी संकटे शेतकऱ्यांवर कोसळतात. यंदाही अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे, नद्या-नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडले आहे. शेती हा केवळ उपजीविकेचा मार्ग नाही, तर अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नैसर्गिक आपत्तीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे.

## १४ राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता 'सेवा पंधरवडा'

महसूल विभागाने अलीकडील काळात अनेक लोकहिताचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान, जिवंत सातबारा, नवीन वाळू निर्गती आणि कृत्रिम वाळू धोरण, दस्त नोंदणीसाठी सलोखा योजना, विद्यार्थ्यांकरिता प्रतिज्ञापत्रांसाठीचे मुद्रांक शुल्क माफ आदींचा समावेश आहे. विविध अभियान आणि मोहिमांच्या माध्यमातून नागरिकांना या सेवांचा लाभ जलदगतीने मिळवून देण्यात येत आहे.

## २० ध्यास आरोग्याचा, विकास महाराष्ट्राचा!

राज्यातील शहरी, ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेला गुणात्मक, पारदर्शक, सक्षम, प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन योजना राबविण्यात येत आहेत. गुणवत्तापूर्ण, सहज आणि सुलभ आरोग्य सेवा नागरिकांच्या दारी पोहोचविण्याचा निर्धार या कामगिरीतून स्पष्ट दिसतो. प्राथमिक, द्विस्तरीय व त्रिस्तरीय प्रणालीद्वारे राज्यात आरोग्यसेवा दिल्या जातात. त्यांना अधिक सक्षम करण्याचा माझा प्रयत्न आहे व शासन यासाठी कटिबद्ध आहे.


पूरग्रस्तांच्या आधारासाठी शासनाची तत्पर कार्यवाही! — १०
एकनाथ पोवार

संकल्प मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीचा! — १६
गणेश फुंदे

समृद्ध व सक्षम गावांसाठी अभियान! — १८
डॉ. मिलिंद दुसाने

आत्मनिर्भरतेचे प्रतीक! — २३
विलास बोडके

उद्योगजगतात डिजिटल क्रांती — २५
दिपेंद्रसिंह कुशवाह

महाराष्ट्र-आयोवा भागीदारीतून समृद्धीचा नवा सेतू! — २६
वर्षा फडके-आंधळे

तयारी भक्तिमेळ्याची! — २८
गोपाळ साळुंखे

मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था : सारथी — ३०
संध्या गरवारे-खंडारे

गणेशोत्सव आता राज्य महोत्सव — ३३
प्रवीण टाके

स्वस्थ नारी, सशक्त परिवार! — ३५
संजय ओरके

मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील 'नवीन नागपूर'च्या निर्मितीकडे! — ३७
रितेश भुयार

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय! — ४०
ब्रिजकिशोर झंवर

स्मार्ट व इंटेलिजंट 'सातनवरी' — ४३
बालाजी देवर्जनकर

कोल्हापूर सर्किट बेंच, न्यायदानाचे नवे दालन! — ४६
प्रवीण टाके

वातावरणीय बदलाचे आव्हान आणि उपाययोजना — ४८
अभिजीत घोरपडे

ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाची उमेद! — ५१
वंदना थोरात

गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांचे 'इस्रो'कडे ऐतिहासिक उड्डाण! — ५३
गजानन जाधव

अहिल्यानगर-बीड रेल्वे : चार दशकानंतरची स्वप्नपूर्ती! — ५५
अरुण सूर्यवंशी

बार्टी : सामाजिक परिवर्तनाची वाटचाल — ५६
शैलजा पाटील

वर्ष ७६ वे | अंक ८ | सप्टेंबर २०२५

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

■ मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
■ व्यवस्थापकीय संपादक — हेमराज बागुल
■ संपादक — गोविंद अहंकारी
■ सहसंपादक — अर्चना देशमुख, अश्विनी पुजारी
■ मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, सुशिम कांबळे
■ मांडणी, सजावट — शैलेश कदम
■ मुद्रितशोधन — भाग्यश्री पेठकर
■ मुद्रण — मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा.लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन.एम.जोशी मार्ग, मुंबई – ४०००११.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालयासमोर,
मुंबई–४०० ०३२.
E-mail : lokrajya2011@gmail.com

**ई – लोकराज्य** http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमत असेलच असे नाही.

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी रुग्णांच्या दुःखावर फुंकर!

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संवेदनशील नेतृत्वातून उभारलेला मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष गरीब आणि गरजू रुग्णांसाठी आशेचा किरण ठरत आहे. राज्यातील हजारो कुटुंबांचे दुःख हलके करण्यामध्ये या कक्षाचे योगदान मोलाचे ठरत असून, उपचार न परवडणाऱ्या रुग्णांना नवे जीवन देण्याचे काम हा कक्ष करत आहे.

एफसीआरए प्रमाणपत्र, त्रिपक्षीय करार आणि क्राउड फंडिंगसारखे अभिनव उपक्रम या योजनेच्या माध्यमातून राबवले जात असून, यामुळे आरोग्यसेवेच्या क्षेत्रात एक नवा अध्याय सुरू झाला आहे. १ जानेवारी ते ३१ ऑगस्ट २०२५ या कालावधीतच तब्बल २२,४०२ रुग्णांना १९५ कोटी ७ लाख ३८ हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे. ही आकडेवारी योजनेची कार्यक्षमता अधोरेखित करते.

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाला फॉरेन काँट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्टअंतर्गत प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. यामुळे परदेशातून थेट देणग्या स्वीकारणे शक्य झाले असून याबाबत महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरले आहे.

महाराष्ट्रात प्रथमच क्राऊड फंडिंगच्या माध्यमातून रुग्णांना मदत पुरवली जाणार आहे. ज्या रुग्णांच्या उपचाराचा खर्च १० लाख रुपयांपेक्षा अधिक असेल, ते या योजनेसाठी पात्र ठरणार आहेत. या उद्देशाने स्वतंत्र पोर्टल विकसित करण्यात आले असून, ते तीन महिन्यांत कार्यान्वित होणार आहे. उपचाराचा खर्च कोट्यवधींमध्ये असताना, इतर योजना वापरूनही निधी अपुरा पडतो. तेव्हा क्राऊड फंडिंग गरजू रुग्णांसाठी जीवनदायी ठरेल, यासाठी पात्रतेची तपासणी आणि पारदर्शकतेसाठी स्वतंत्र नियामक यंत्रणा उभारली जाणार आहे. ही योजना ग्रामीण तसेच शहरी भागातील रुग्णांसाठी वरदान ठरणार आहे.

**आवश्यक कागदपत्रे :** १) विहित नमुन्यातील अर्ज, २) रुग्ण दाखल असल्यास जिओ-टॅग फोटो, ३) वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र (खासगी रुग्णालय असल्यास सर्जनकडून प्रमाणित अंदाजपत्रक), ४) तहसील कार्यालयाचा चालू वर्षातील कुटुंबाचा एकत्रित १.६० लाखांपेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला, ५) रुग्ण महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचे पुरावे (आधारकार्ड/लहान बालकांसाठी आईचे आधारकार्ड), ६) रेशनकार्ड, ७) आजारासंदर्भातील वैद्यकीय अहवाल, ८) अपघातग्रस्त रुग्णांसाठी एफआयआरची प्रत, ९) प्रत्यारोपण रुग्णांसाठी झेडटीसीसी/शासकीय समितीची मान्यता, १०) संबंधित रुग्णालयाची नोंद सीएमआरएफ कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असणे आवश्यक.

**अर्जासाठी संपर्क :** अधिकृत संकेतस्थळ https://cmrf.maharashtra.gov.in, ई-मेल aao.cmrf-mhgov.in, टोल-फ्री क्रमांक : ९३२११०३१०३.

## 'श्री गणेशा आरोग्याचा' अभियान

मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाच्या वतीने आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून २८ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२५ दरम्यान राज्यभरात 'श्री गणेशा आरोग्याचा' अभियान राबविण्यात आले. यामध्ये साधारण ३.२६ लाख नागरिकांनी मोफत आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.

# हात मदतीचा...

महाराष्ट्राला नैसर्गिक आपत्ती काही नवीन नाही. राज्याला भूकंप, त्सुनामी, दुष्काळ, अतिवृष्टी अशा अनेक प्रसंगांना सामोरे जावे लागले आहे. अशा सर्व आपत्तींवर आजपर्यंत यशस्वीपणे मात करण्यासाठी शासन सदैव तत्पर असते. अशाच अतिवृष्टीमुळे मागील आठवड्यात राज्यात पूरपरिस्थिती निर्माण झाली. राज्यावर अस्मानी संकट ओढावल्याने संवेदनशील राज्य शासनाने तत्काळ याची दखल घेऊन, या भागातील नागरिकांना मदत करण्यासाठी मदतीचा हात देऊन पूरपरिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले.

राज्यातील धाराशिव, लातूर, सोलापूर या जिल्ह्यांसोबतच बीड, हिंगोली, परभणी, नाशिक, जळगाव, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर अशा विविध जिल्ह्यांमध्ये या अतिवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर मंत्रीदेखील त्या भागातील नागरिकांच्या मदतीला धावून गेले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह इतर मंत्र्यांनी त्या अतिवृष्टीग्रस्त भागात नुकसानाची पाहणी केली. नागरिकांशी संवाद साधून अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांना मदतीसाठी प्रशासनाला आदेश देऊन या आपत्तीवर मात करण्यासाठी शासन, प्रशासनाच्या वतीने एकत्रितपणे प्रयत्न केले जात आहेत, असा विश्वास त्यांनी पूरग्रस्तांना दिला.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मदतीचे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. त्याद्वारे नागरिकांना आवश्यक मदत केली जात आहे.

उपजीविकेचा व अर्थव्यवस्थेचा कणा असलेली शेती अतिवृष्टीमुळे बाधित झाली आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे शेतीपिकांचे, जनावरांचे मोठे नुकसान झाले असून, अनेक भागात ढगफुटी होऊन नद्यांना आलेल्या पुरामुळे जमीन खरडून गेली आहे. या भागातील नागरिकांच्या मदतीसाठी आजपर्यंतचे सर्व निकष बाजूला ठेवून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत करण्याचा निर्णय राज्य शासनामार्फत घेण्यात आला. ज्या भागात पाणी शिरले, तेथील नुकसानाबाबत मोबाइल व ड्रोनद्वारे काढण्यात आलेले फोटो स्वीकारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयदेखील राज्य शासनाने घेतला. तसेच बाधित क्षेत्राचे पंचनामेदेखील प्रशासनामार्फत तातडीने करण्यात येत आहेत. याद्वारे तेथील जनजीवन पूर्वपदावर आणण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्न केले जात आहेत. यासाठी राज्य शासनाने घेतलेले निर्णय; तसेच यासोबत राज्यातील एकूणच पूरपरिस्थिती व त्या अनुषंगाने शासनाने केलेल्या कार्यवाहीबाबतची सचित्र माहिती 'लोकराज्य'च्या अंकात देण्याचा प्रयत्न केला आहे.

यासोबतच राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता सेवा पंधरवडा, मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या निमित्ताने संकल्प मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीचा, आरोग्यविषयक योजनांची माहिती, गणेशोत्सव ते राज्य महोत्सव, मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील नवीन नागपूर, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय, देशात पहिले ठरलेले डिजिटल गाव सातनवरी, कोल्हापूर विभागात सर्किट बेंचचा झालेला शुभारंभ, बीड ते अहिल्यानगर रेल्वे : जिल्ह्याची विकासवाहिनी यांसह विविध विषयांची व विकासकामांबाबतची माहिती या अंकात देण्यात आली आहे. इतर नियमित अंकांप्रमाणेच 'लोकराज्य'चा हा माहितीपूर्ण अंकदेखील वाचकांना नक्कीच आवडेल, अशी खात्री आहे.

**ब्रिजेश सिंह**
(मुख्य संपादक)

**दरवर्षी पावसाळ्यात काही भागांमध्ये दुष्काळ, तर काही भागांमध्ये अतिवृष्टी अशी दुहेरी संकटे शेतकऱ्यांवर कोसळतात. यंदाही अनेक जिल्ह्यांमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे, नद्या–नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेतकऱ्यांचे उभे पीक वाहून गेल्याने शेतकरी बांधव मोठ्या संकटात सापडले आहे. शेती हा केवळ उपजीविकेचा मार्ग नाही, तर अर्थव्यवस्थेचा कणा असल्याने नैसर्गिक आपत्तीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानापोटी बाधित शेतकऱ्यांना राज्य शासनाने तत्परतेने मदतीचा हात पुढे करत शेतकऱ्यांना जिव्हाळ्याची साथ देऊन शेतकऱ्यांप्रति शासनाने संवेदनशीलता दाखवून दिली आहे.**

# प्रभावी मदतकार्यातून आपद्ग्रस्तांना दिलासा!

जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे. शेती पिकांचे, जनावरांचे, घरांचे, व्यावसायिकांचे खूप मोठे नुकसान झाले असून पूरग्रस्त नागरिकांनी अशा संकटाच्या काळात धीर धरावा, राज्य शासन संकटकाळात पूरग्रस्तांच्या पूर्णपणे पाठीशी असून नागरिकांना सर्वतोपरी मदत केली जाणार असल्याची ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. सोलापूर जिल्ह्याच्या माढा तालुक्यातील निमगाव, दारफळ व सीना या गावांना भेटी देऊन नुकसानाची पाहणी करत मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गावातील नागरिकांशी संवाद साधला.

### देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री

राज्यातील विविध जिल्ह्यांत झालेल्या अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामध्ये नागरिक व शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून राज्य शासन पूरग्रस्तांच्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे. या भागातील शेतकरी, आपत्तीग्रस्त नागरिकांना टंचाईप्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ३० सप्टेंबर रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीनंतर दिली. त्याचप्रमाणे आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांकडील कर्जाची वसुली थांबविण्याचे निर्देशही बँकाने दिल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

अतिवृष्टीसारख्या भीषण परिस्थितीमुळे शेतकरीबांधव सध्या अडचणीत आहे. हे लक्षात घेऊन बँकांनी शेतकऱ्यांकडून कर्जाची वसुली थांबवण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच पूरग्रस्त कुटुंबांना गहू-तांदूळ, डाळी व आवश्यक वस्तूंचे साहित्य वितरित करण्यात येत आहे.

विहीर खचणे, शेतजमीन खरडून जाणे, अशा आपत्तीत केंद्र सरकारच्या निकषाबाहेर जाऊन, झालेल्या नुकसानीवरही राज्य सरकार स्वतंत्र मदत करणार आहे. नुकसानीचे पंचनामे दोन-तीन दिवसांत पूर्ण होऊन पुढील आठवड्यात केंद्राला प्रस्ताव पाठवला जाणार आहे. मात्र केंद्राच्या मदतीची वाट न पाहता राज्य सरकारने स्वतःच्या निधीतून मदत सुरू केली असून, नंतर केंद्राकडून ती रक्कम 'रिइम्बर्समेंट'च्या स्वरूपात मिळेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी होत असली तरी आपत्ती व्यवस्थापन नियमावलीत (मॅन्युअल) अशी व्याख्येचा समावेश नाही, असे असले तरी टंचाई निवारण काळातील निकषांप्रमाणेच सर्व सवलती व उपाययोजना लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.






### एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री

पूरबाधित ग्रामस्थ व शेतकऱ्यांना लवकरच पंचनामे करून मदत देण्यात येणार आहे. त्यासाठी पूरपरिस्थिती व नुकसानाचे गांभीर्य लक्षात घेता अटी व निकषांमध्ये शिथिलता आणण्यात येऊन मदतीपासून कोणीही वंचित राहणार नाही. जमीन पूर्णतः खरडून गेली आहे, त्याबाबत मदतीचे निकष बदलविण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

बाधितांना आता मदतीची आवश्यकता असून प्रत्येकाने आपापल्या परीने मदत करावी. नैसर्गिक आपत्ती कोसळली असून अशा संकटांचा सामना करण्यासाठी शासन म्हणून आम्ही आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे आहोत. केंद्र आणि राज्य शासनाची मदत देऊन जनतेला आधार देण्यात येईल. पंचनाम्यानंतर नुकसानाची तीव्रता समोर आल्यावर धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल, असे श्री. शिंदे यांनी बधितांना आश्वस्त केले.

### अजित पवार, उपमुख्यमंत्री

राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे आस्मानी संकट कोसळले असून पूरस्थिती निर्माण झाली आहे. बीड, धाराशिव आणि सोलापूर जिल्ह्यांतील पूरग्रस्त भागांना प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांसह आपत्तीग्रस्तांच्या वेदना जाणून घेतल्या आहेत. राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने जून ते ऑगस्ट दरम्यान झालेल्या नुकसानासाठी २,२१५ कोटी रुपये तातडीने मंजूर करून त्याचा शासन निर्णय निर्गमित केला आहे. राज्यातील बाधित शेतकऱ्यांच्या खात्यात ही रक्कम थेट जमा होईल. 'एनडीआरएफ-



एसडीआरएफ'च्या निकषांपेक्षा अधिकची मदत बाधितांना देण्यात येईल. बाधित क्षेत्राचे ड्रोनच्या साहाय्याने तातडीने पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. पूरपरिस्थितीत अडकलेल्या नागरिकांना प्रसंगी हेलिकॉप्टर व बोटींच्या साहाय्याने सुरक्षितस्थळी हलविण्यात आले असून पूरग्रस्तांच्या मदतीसाठी एनडीआरएफच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. आपत्तीग्रस्तांना मदत देण्यात कोणतीही कसर राहणार नाही, त्यासाठी निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह पालकमंत्र्यांनी पूरग्रस्त भागांचा दौरा केला आहे. या आस्मानी संकटाच्या काळात शासन ठामपणे आपद्ग्रस्त शेतकरी, कष्टकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या पाठीशी उभे आहे. पूरग्रस्तांचे संसार पुन्हा उभे करण्यासाठी सर्वस्व पणाला लावण्यासाठी शर्तीचे प्रयत्न करण्यात येत आहे.

### दत्तात्रय भरणे, कृषिमंत्री

अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागातील शेती शिवाराची पाहणी करताना, एकही शेतकरी शासनाच्या मदतीपासून वंचित राहणार नाही, काळजी करू नका, शासन आपल्या सोबत आहे. जालना जिल्ह्यातील सोमठाणा, ता. बदनापूर व ढाकलगाव, ता. अंबड शिवारात कृषिमंत्री यांनी थेट बांधावर जात शेतकऱ्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

अतिवृष्टीमुळे शेतकरी बांधवाने कष्टाने पिकविलेल्या शेती पिकाचे नुकसान झाले असून जालना जिल्ह्यात नुकसानाचे क्षेत्र अधिक आहे. कपाशी, सोयाबीन यासह



इतर पिकांच्या नुकसानासोबतच पशुधन आणि घरांची पडझड झाली आहे. जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांसह तातडीने पंचनामे करून राज्य शासनाकडे अहवाल सादर करावा. अहवाल प्राप्त होताच तातडीने नुकसानभरपाई देण्यात येईल, असे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले.

## पंकजा मुंडे, पशुसंवर्धन मंत्री

ढगफुटीसदृश पाऊस झाल्याने सिंदफणा नदीच्या पुरामुळे या नदीचे पाणी बऱ्याच शेतांमध्ये शिरल्याने शेतपिकांचे बरेच नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर बाधित शेतकऱ्यांना तत्काळ मदत करणार असल्याचे आश्वासित करून नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करण्याचे काम सुरू असून, शासनामार्फत पूरग्रस्त भागातील बाधित नागरिक आणि शेतकऱ्यांना तत्काळ मदत पोहोचविण्यात येत आहे. जिल्ह्यातील ज्या भागात ६५ मि.मी.पेक्षा जास्त पाऊस झाल्यास अतिवृष्टी घोषित करण्याचा नियम आहे, परंतु ६५ मि.मी.पेक्षा कमी पाऊस झाला असेल, त्या ठिकाणचेही पंचनामे करण्याच्या सूचना पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी प्रशासनाला दिल्या.

## अतुल सावे, दिव्यांग कल्याण विभाग मंत्री

छत्रपती संभाजीनगर येथील वैजापूर तालुक्यातील वीरगाव, भग्गाव, कापूस वडगाव या परिसरात अतिवृष्टीमुळे झालेल्या शेतीच्या नुकसानाची पाहणी केली. त्यावेळी शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी प्रशासनास पंचनामे करण्याचे निर्देश देऊन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनातर्फे भरीव मदत देण्यात येईल, असे आश्वासन देण्यात आले.



## मेघना बोर्डीकर, आरोग्य राज्यमंत्री

अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या संकटकाळात राज्य शासन नुकसानग्रस्तांच्या पूर्णपणे पाठीशी असून शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येणार आहे. परभणी जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे शेतपिकांच्या नुकसानासाठी शेतकऱ्यांना मदत देण्याकरिता शासनाने जून ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत १२८ कोटी ५५ लक्ष ३८ हजार इतका निधी वितरित करण्यास मंजुरी दिली असून निधीच्या वाटपाची कार्यवाही सुरू आहे. सप्टेंबर २०२५ महिन्यातील अतिवृष्टीमुळे झालेली नुकसानभरपाईदेखील तातडीने दिली जाईल, असे आरोग्य राज्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले.

## डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील, जलसंपदा मंत्री

कर्जत व जामखेड तालुक्यात अतिवृष्टीमुळे शेतपिके, शेतजमीन, ओढे, नाले व घरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पहिल्यांदाच झाला असून त्याचा आपण समर्थपणे सामना करत आहोत. शासनाने या परिस्थितीला अतिशय गंभीरतेने घेतले आहे. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानाचे पंचनामे कृषी सहायक, तलाठी व ग्रामसेवक यांच्यामार्फत करण्यात येत आहेत. अनेक गावांमध्ये अजूनही पाणी साचलेले असून अशा ठिकाणी ड्रोनद्वारे तातडीने सर्वेक्षण करून आणि ७/१२ वरील नोंदीनुसार सरसकट पंचनामे करण्याच्या सूचनाही जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी दिल्या आहेत.



आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन जळगाव जिल्ह्यातील जामनेर व पाचोरा तालुक्यातील पूरग्रस्त भागाची पाहणी करताना.



अहिल्यानगर येथील कर्जत व जामखेड तालुक्यात अतिवृष्टीची पाहणी करताना जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे-पाटील.



शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांनी हिंगोली जिल्ह्यात झालेल्या अतिवृष्टी भागाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.



छत्रपती संभाजीनगर येथील वैजापूर तालुक्यातील गिरगाव भगाव कापूस वडगाव या पूरग्रस्त भागाला सीमा व बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी भेट दिली.



परभणी जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानाची पाहणी करताना आरोग्य राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर.



महसूल तथा गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी लातूर तालुक्यातील पूरग्रस्त व अतिवृष्टी झालेल्या नुकसानाची पाहणी करताना.

**अतिवृष्टीच्या तडाख्याने महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये जनजीवन विस्कळीत झाले असून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर पीडितांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने तातडीने मदत निधी जाहीर केला आहे. या निधीमुळे शेतकरी, घरकूलधारक; तसेच अन्य प्रभावित घटकांना मोठा आधार मिळणार आहे.**

# पूरग्रस्तांच्या आधारासाठी शासनाची तत्पर कार्यवाही!

**एकनाथ पोवार**

अतिवृष्टी व पुरामुळे एप्रिल २०२५ पासून बाधित झालेल्या सुमारे ३१.६४ लाख बाधितांना आतापर्यंत (२३ सप्टेंबर) २,२१५ कोटी रुपयांच्या मदतीस मान्यता दिली असून ही मदत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग केली जात आहे. बाधित शेतकरी व नागरिकांना तत्काळ मदत करण्यासाठी नुकसानाचे तत्काळ पंचनामे करून मदत देण्याचे घेतलेले निर्णय म्हणजे या शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढवणारे आणि त्यांच्या कष्टाचे मोल जपणारे आहेत.

केंद्र सरकारने चक्रीवादळ, दुष्काळ, भूकंप, आग, पूर, त्सुनामी, गारपीट, दरड कोसळणे, बर्फ खंड कोसळणे, हिमवर्षा, ढगफुटी, टोळ धाड, थंडीची लाट व कडाके या बारा नैसर्गिक आपत्ती २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयामध्ये घोषित केल्या आहेत. त्याचप्रमाणे राज्य शासनानेदेखील अवेळी/अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, वीज पडणे, समुद्राचे उधाण, आकस्मिक आग, सततचा पाऊस या सहा नैसर्गिक आपत्ती म्हणून घोषित केल्या आहेत.

## आपद्ग्रस्तांच्या मदतीसाठी निधी

नैसर्गिक आपत्तीमुळे घरांची पडझड झाल्यास या घरांच्या दुरुस्तीसाठी आपद्ग्रस्तांना त्वरित मदत देण्यासाठी विभागीय आयुक्तांना निधी वितरित करण्यात आला आहे. शासन निर्णय ३० मे २०२५ नुसार कोकण विभाग पाच कोटी, पुणे विभाग १२ कोटी, नाशिक विभाग पाच कोटी, छत्रपती संभाजीनगर विभाग १२ कोटी, अमरावती विभाग पाच कोटी आणि नागपूर विभागासाठी १० कोटी असा ४९ कोटींचा निधी आगाऊ देण्यात आला आहे.

## बाधित कुटुंबांना मदत

अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या कुटुंबांना घरगुती भांडी वस्तू घेण्यासाठी पाच हजार रुपये आणि कपड्यांसाठी पाच हजार रुपये, दुकानदारासाठी कमाल ५० हजार (पंचनाम्याच्या ७५ टक्के जी अधिक असेल ती), टपरीधारकांसाठी कमाल १० हजार (पंचनाम्याच्या ७५ टक्के जी अधिक असेल ती) रुपये देण्यात येणारी मदत ही खरीप हंगाम २०२५ साठीही लागू करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर आपद्ग्रस्तांना त्वरित मदत देणे शक्य होण्यासाठी या मदतीच्या लेखाक्षर्षाला उणे (-) प्राधिकार देण्यात आले आहे.

## बाधित शेतकऱ्यांना २,२१५ कोटींची मदत

यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या शेतपिकांच्या



मदत व पुनर्वसन विभागाच्या माध्यमातून बाधित कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत, निवारा व जीवनावश्यक साहित्य पुरवण्यात येत आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना पिकांच्या हानीबाबत योग्य ती भरपाई दिली जात आहे. शासनाचे उद्दिष्ट फक्त तात्पुरती मदत देणे नाही, तर नागरिकांना पुन्हा उभे करण्यासाठी ठोस पावले उचलली जाण्यासाठी उमेद देणे हे आहे. शासनाच्या वतीने बाधित कुटुंबांपर्यंत तातडीची मदत पोहोचवण्यात येत आहे. ही मदत केवळ आर्थिक नाही, तर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी आहे.

**- मकरंद जाधव-पाटील,**
**मदत व पुनर्वसन, मंत्री.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लातूर जिल्हा पोलीस अधिकारी व कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., लातूर यांच्या वतीने 'मुख्यमंत्री साहाय्यता निधी'साठी १,११,१११ देणगीचा धनादेश सुपुर्द करण्यात आला.

नुकसानापोटी ३१ लाख ६५ हजार ७८३ बाधित शेतकऱ्यांना आतापर्यंत (२३ सप्टेंबर) रुपये २२१५ कोटी १३ लाख २३ हजारांची मदत जाहीर करण्यात आली आहे. जून २०२५ मध्ये अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेती नुकसानासाठी मदत म्हणून अमरावती, छत्रपती संभाजीनगर विभागाला अनुक्रमे ८६.२३ कोटी व १४.५४ कोटी अशा १००.७७ कोटी निधीला मंजुरी देण्यात आली आहे.

अतिवृष्टी व पुरामुळे जून ते ऑगस्ट २०२५ मध्ये झालेल्या शेतकऱ्यांच्या नुकसानासाठी नागपूर विभागास १३.५६ कोटी, छत्रपती संभाजीनगर विभागास ०.८ कोटी आणि पुणे विभाग ५९.७९ कोटी असे ७३.५४ कोटी निधी मंजूर करण्यात आला, तर जून २०२५ मधील शेतपिकांच्या नुकसानापोटी मदत म्हणून कोकण विभागाला ०.३७ कोटीचा निधी मंजूर केला आहे. नांदेड, परभणी, सातारा आणि सांगली जिल्ह्यात जून २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टी व पुरामुळे बाधित शेतकऱ्यांना नुकसानापोटी मदत देण्यासाठी ६८९ कोटी ५२ लाख ६१ हजार रुपयांच्या निधीस शासनाने मान्यता दिली आहे.

अतिवृष्टी व पुरामुळे बाधित झालेल्या अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा, वाशिम, गोंदिया, भंडारा, गडचिरोली, वर्धा, नागपूर, पुणे, हिंगोली, बीड, लातूर, धाराशिव, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव आणि अहिल्यानगर जिल्ह्यांमध्ये जुलै व ऑगस्ट २०२५ या महिन्यात झालेल्या शेतपिकाच्या नुकसानापोटी एक हजार ३३९ कोटी ४९ लाख २५ हजारांच्या मदतीस मान्यता देण्यात आली आहे.



जळगाव जिल्ह्यातील मुक्ताईनगर तालुक्यात पुरात वाहून मृत झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबास तत्काळ मदतीचा धनादेश देताना गुलाबराव पाटील, पालकमंत्री (जि. जळगाव).

## राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे दर

जिरायत पिकांच्या नुकसानासाठी ८५०० रुपये (प्रतिहेक्टर, २ हेक्टर मर्यादेत), बागायत पिकांच्या नुकसानासाठी साठी १७,००० रुपये (प्रतिहेक्टर, २ हेक्टर मर्यादेत), बहुवार्षिक पिकांच्या नुकसानासाठी मदत २२,५०० रुपये (प्रतिहेक्टर, २ हेक्टर मर्यादेत) मदत देण्यात येत असून हे दर जानेवारी २०२५ पासून लागू आहेत.

नैसर्गिक आपत्तीत बाधित शेतकऱ्यांना मदत आणि दिलासा देण्यास शासनाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. शासनाने बाधित पिकांचे तातडीने पंचनामे करून मदत देण्याच्या घेतलेल्या या निर्णयामुळे अतिवृष्टी व अवकाळी पाऊस या आपत्तीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना उभारी मिळेल.

यंदाच्या खरीप हंगामात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या शेतपिकांच्या नुकसानास शासनाने तत्काळ मदत देण्याचा निर्णय घेतला, शेतकऱ्याला आपत्तीच्या संकटात मदत करून शेतकऱ्यांवरती असणारे उत्तरदायित्व जपण्याचे काम या मदतीतून झाले आहे, असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

विभागीय संपर्क अधिकारी

# मदतकार्य दृष्टिक्षेपात...
















**महसूल विभागाने अलीकडील काळात अनेक लोकहिताचे निर्णय घेतले आहेत. यामध्ये प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान, जिवंत सातबारा, नवीन वाळू निर्गती आणि कृत्रिम वाळू धोरण, दस्त नोंदणीसाठी सलोखा योजना, ड्रोनद्वारे गौण खनिज सर्वेक्षण, सार्वजनिक हिताच्या बांधकामांना स्वामित्वधन न आकारता गौण खनिज वापरण्यास परवानगी, तुकडेबंदी कायद्यात सुधारणा, प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता, विद्यार्थ्यांकरिता प्रतिज्ञापत्रांसाठीचे मुद्रांक शुल्क माफ आदींचा समावेश आहे. विविध अभियान आणि मोहिमांच्या माध्यमातून नागरिकांना या सेवांचा लाभ जलदगतीने मिळवून देण्यात येत असून आता राष्ट्रनेता प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवडा' राबविण्यात येणार आहे.**

# राष्ट्रनेता ते राष्ट्रपिता 'सेवा पंधरवडा'

**चंद्रशेखर बावनकुळे,** महसूल मंत्री



महसूल विभाग हा जनतेच्या दैनंदिन समस्या आणि जिव्हाळ्याच्या विषयांशी निगडित असलेला विभाग आहे. महाराष्ट्र शासन गतिमान आणि पारदर्शकतेने काम करीत असून सामान्य जनतेला दिलासा देण्यासाठी महसूल प्रशासनदेखील अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शकतेने काम करीत आहे. गतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण या योजनेंतर्गत महसुली क्षेत्रीय कार्यालयाकडून जनतेस सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २०२५-२६ या वर्षात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर अभियान मंडळ स्तरावर आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, विद्यार्थी, महिला यांना महसूल विभागाशी संबंधित विविध प्रमाणपत्रांचे वाटप करणे; तसेच नागरिकांच्या तक्रारी दूर करणे, या उद्देशाने मंडळस्तरावर वर्षातून किमान चार वेळा हे अभियान आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

सर्वसामान्य जनता व शेतकरी यांचे महसूल विभागांतर्गत क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न तातडीने निकाली काढणे व महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, पारदर्शक, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या दृष्टीने १ जून ते ३१ जुलै २०२५ या कालावधीत महाराजस्व अभियान हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात आला. त्याचप्रमाणे राज्यात १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत महसूल सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यात प्रामुख्याने नागरिकांना विविध प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा जन्मदिन १७ सप्टेंबर २०२५ ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीमध्ये आता 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान' अंतर्गत 'सेवा पंधरवडा' साजरा करण्यात येणार आहे. या पंधरवड्यात राबवण्यात येणारे कार्यक्रम हे यापूर्वीच राबविण्यात येत असून पंधरवड्यादरम्यान व त्यानंतरही निरंतरपणे राबविले जाणारे कार्यक्रम आहेत. तथापि या कालावधीत मोहीम स्वरूपात युद्धपातळीवर राबविण्यात आले आहेत.

हे अभियान तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात आले. यामध्ये १७ ते २२ सप्टेंबर या कालावधीतील पहिल्या टप्प्यामध्ये 'पाणंद रस्तेविषयक मोहीम' राबविण्यात आली. २३ ते २७ सप्टेंबर या दुसऱ्या टप्प्यामध्ये 'सर्वांसाठी घरे' या उपक्रमासाठी पूरक उपक्रम राबविले गेले, तर २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या अंतिम टप्प्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांमार्फत स्थानिक परिस्थितीचा विचार करून 'नावीन्यपूर्वक उपक्रम' राबविले जातील.

### 'पाणंद रस्तेविषयक मोहीम'

प्रत्येक शेतकऱ्याच्या शेताला रस्ता देण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. शेतात जाण्यासाठी, शेतमालाची ने-आण करण्यासाठी शेतरस्त्यांच्या निर्मितीसाठी विविध योजनांच्या निधीचा समन्वय साधून समग्र योजना आणली जाणार आहे. ही योजना संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांच्या शेत रस्त्यांची मागणी पूर्ण करणारी असेल. शेत रस्त्यांच्या प्रकरणांमध्ये अपिल उपविभागीय अधिकाऱ्यांपर्यंत संपवण्याची व्यवस्था निर्माण करण्यात येणार आहे. वाटपपत्रात शेतकऱ्यांचा समावेश करणे, शेतरस्त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी लोक अदालती घेणे, रस्त्यांचे सपाटीकरण करणे, चालू वहिवाट रस्त्यांचे सर्वेक्षण, गाव नकाशात हे रस्ते घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. यापुढे शेतरस्ता किमान ३ ते ४ मीटर रुंदीचा करण्यात येऊन जमाबंदी आयुक्त यांच्या माध्यमातून शेतरस्त्यांना क्रमांक देण्याची कार्यवाहीदेखील करण्यात येणार आहे. ७/१२ उताऱ्याच्या इतर हक्क या सदरात शेतरस्त्याची नोंद झाल्यामुळे त्या रस्त्याची कायदेशीर वैधता स्थापित होऊन भविष्यात शेतरस्त्यांच्या वादांचे प्रमाण कमी होण्यास मदत होणार आहे.

या अनुषंगाने सेवा पंधरवडा अभियानाच्या पहिल्या टप्प्यामध्ये १७ ते २२ सप्टेंबरच्या कालावधीमध्ये महसूल विभागाच्या २९ ऑगस्ट २०२५च्या शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी केली. याचबरोबर शिव पाणंद रस्त्यांचे सर्व्हेक्षण करणे, ज्या पाणंद रस्त्यांची नोंद निस्तार पत्रक / वाजिब उल अर्जमध्ये




करण्यात आलेली नाही, त्याची नोंद घेण्याबाबत कार्यवाही करणे, शेतावर जाण्यासाठी रस्ते उपलब्ध करून देण्यासाठी संमतीपत्र घेणे, रस्ता अदालत आयोजित करुन शेत रस्त्यांची प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे, शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे आदी कामे करण्यात येणार आहेत.

## ‘सर्वांसाठी घरे’ला पूरक उपक्रम

राज्यातील प्रत्येक नागरिकाला परवडणारे व सुरक्षित घर मिळाले पाहिजे, यासाठी केंद्र सरकारबरोबरच राज्य शासनदेखील प्रयत्नशील आहे. या अनुषंगाने २३ ते २७ सप्टेंबरच्या कालावधीतील दुसऱ्या टप्प्यात ‘सर्वांसाठी घरे’ या उपक्रमांतर्गत घरे बांधण्यासाठी निर्बाध्यरीत्या वाटपास उपलब्ध असलेली शासकीय जमीन कब्जेहक्काने प्रदान करण्यात येईल. या उपक्रमासाठी अस्तित्वातील रहिवासी प्रयोजनासाठी असलेल्या शासकीय जमिनीवरील अतिक्रमणे नियमातील तरतुदीनुसार नियमानुकूल करण्यात येतील.

या मोहिमेंतर्गत महसूल विभागाच्या १४ डिसेंबर १९९८ शासन निर्णयामधील तरतुदीनुसार आरक्षण विकास आराखड्याशी सुसंगत असल्यास शहरातील जमिनीवरील गायरान नोंदी कमी करून त्या जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणे; तसेच आरक्षण विकास आराखड्याशी सुसंगत नसल्यास अतिक्रमण नियमानुकूल करण्यासाठी आरक्षण बदलाचे प्रस्ताव सादर करण्यात येतील. या टप्प्यामध्ये सर्वांसाठी घरे या योजनेंतर्गत शासकीय जमिनी वाटप केलेल्या / अतिक्रमण नियमानुकूल केलेल्या लाभार्थ्यांना जमिनींचे पट्टे वाटप केले जातील.

## नावीन्यपूर्ण उपक्रम

अभियानाच्या तिसऱ्या टप्प्यात २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांमार्फत स्थानिक गरजा, भौगोलिक परिस्थितीचा विचार करून अधिकाधिक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जाणार आहेत.

‘सेवा पंधरवडा’ अभियानासाठी जिल्हाधिकारी यांच्यामार्फत स्थानिक विधानसभा / विधान परिषद सदस्य, स्थानिक संसद सदस्य, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य; तसेच ग्रामपंचायत सदस्य यांना सहभागी करून घेण्यात येणार आहे. तसेच सर्वसामान्य नागरिकांना या अभियानाबाबत माहिती होण्यासाठी या अभियानाला स्थानिक; तसेच राज्यस्तरावर व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल. हे अभियान यशस्वी होण्याच्या दृष्टीने विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी; तसेच तहसीलदार यांच्यामार्फत त्यांच्या स्तरावर सर्व संबंधित यंत्रणांची बैठक घेऊन अभियानाचे नियोजन केले जाईल. तसेच वेळोवेळी या कामांचा आढावा घेतला जाईल.

‘सेवा पंधरवडा’ अभियानामध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचा संबंधित जिल्हाधिकाऱ्यांमार्फत यथोचित गौरव केला जाणार आहे. शासनाच्या निर्देशाप्रमाणे राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांमार्फत ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान’अंतर्गत ‘सेवा पंधरवडा’ आपापल्या जिल्ह्यांमध्ये जिल्हा, तालुका व गावपातळीवर प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जाणार आहेत.

राष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी समर्पित भावनेने कार्य करणाऱ्या दोन महनीय व्यक्तींच्या जन्मदिन व जयंतीचे औचित्य साधून त्या दरम्यानच्या पर्वात हे अभियान राबविले जाणार असल्याने याचे पावित्र्य राखण्यासाठी; तसेच नागरिकांना महसूल विभागाच्या सेवांचा लाभ जलदगतीने मिळवून देण्यासाठी यंत्रणेतील प्रत्येक घटक प्रयत्नांची पराकाष्ठा करणार आहे, हे निश्चित.

**शब्दांकन : ब्रिजकिशोर झंवर,**
वरिष्ठ सहायक संचालक

**भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक पर्व असलेल्या मराठवाडा मुक्तिसंग्राम पर्वाचे स्मरण मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनी करण्यात आले. यानिमित्त मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत विविध कार्यक्रम झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे मुख्य शासकीय ध्वजारोहणाचा सोहळा झाला, तर मराठवाड्यातील अन्य जिल्ह्यांच्या मुख्यालयी पालकमंत्री यांच्या हस्ते ध्वजारोहण सोहळ्यासह विविध कार्यक्रम झाले. या सोहळ्याच्या माध्यमातून मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीचा संकल्प सोडण्यात आला आहे, असे सांगण्यात आले. या सोहळ्याच्या अनुषंगाने हा लेख...**

# संकल्प मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीचा!

**गणेश फुंदे**

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या सिद्धार्थ उद्यानात मराठवाडा मुक्तिसंग्राम स्मृतिस्तंभ येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. त्यांनी स्मृतिस्तंभाला पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. सामाजिक न्यायमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट, खासदार डॉ. भागवत कराड, डॉ. कल्याण काळे, संदिपान भुमरे, आमदार सतीश चव्हाण, प्रशांत बंब, प्रदीप जयस्वाल, विलास भुमरे, संजना जाधव यांच्यासह आजी-माजी लोकप्रतिनिधी, सर्व प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.

निजामाच्या राजवटीतून मराठवाड्याला मुक्त करण्यासाठी मोठा लढा उभा राहिला. त्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रविनारायण रेड्डी, देवीसिंग चव्हाण, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंग नाईक, विजेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे, काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्धन होरटीकर गुरुजी, सूर्यभान पवार, विनायकराव चारठाणकर आदींसह असंख्य नागरिकांनी रझाकारांच्या विरोधात तीव्र लढा देत मराठवाडा मुक्त केला. हा दिवस केवळ मराठवाड्याच्या मुक्तीचाच दिवस नाही, तर एकसंघ भारत निर्मितीचा दिवस म्हणून या घटनेकडे पाहिले पाहिजे. मराठवाडा मुक्तीसाठी परिश्रम घेतलेल्या सर्वांचा आदर ठेवत मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्न करीत राहीन, ते आपले कर्तव्य आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.



## मराठवाडा दुष्काळमुक्त करणार...

यंदाच्या पावसाळ्यात मराठवाड्यात अतिवृष्टी झाली. त्यामुळे नुकसान झालेल्या सर्वांना राज्य शासनातर्फे तत्काळ मदत देण्यात येईल. मराठवाड्यातील दुष्काळाचे निराकरण करण्यासाठी कृष्णा खोऱ्यातले पाणी हे मराठवाड्यापर्यंत आणले. दुसऱ्या टप्प्यात सांगली, कोल्हापूरमधील पूर पाणी उजनीपर्यंत आणून ते मराठवाड्यात आणण्यात येईल. उल्हास खोऱ्याचे ५४ टीएमसी पाणीदेखील मराठवाड्यात आणण्यात येईल. गोदावरीच्या खोऱ्यातील तूट दूर करून प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत हे पाणी पोहोचविण्याचे काम करण्यात येईल.

छत्रपती संभाजीनगरला २०२३ मध्ये झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासासाठी विविध निर्णय घेण्यात आले आहेत. या निर्णयांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

## फॅक्टरीच्या माध्यमातून रोजगार

लातूरची कोच फॅक्टरी आता अंतिम टप्प्यामध्ये आहे. जवळपास १४ हजार लोकांना त्या ठिकाणी रोजगार मिळणार आहे. छत्रपती संभाजीनगरच नाही, तर मराठवाड्याच्या इतर भागात जे काम चालले आहे ते विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे. अहिल्यानगरपासून बीडपर्यंतचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण करण्याचे काम आपल्या शासनाच्या माध्यमातून होत आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

## सिट्रिपलआयटी प्रकल्प उभारणीस गती

बीड येथे पोलीस मुख्यालयाच्या पोलीस कवायत मैदानावर ध्वजारोहण सोहळा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते पार पडला. बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. बीड विमानतळ विकास प्रकल्प हाती घेतला आहे. सिट्रिपलआयटी प्रकल्प उभारणीस गती दिली आहे. टाटा टेक्नॉलॉजी आणि एमआयडीसी यांच्या सहकार्याने १९६ कोटी ९८ लक्ष रुपयांचा प्रकल्प लवकरच प्रत्यक्षात आकारास येईल. बीड-अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ होत असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय जिल्ह्यातील विविध विकास

कामांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याचे त्यांनी सांगितले.

### जालना येथे हुतात्म्यांना अभिवादन

जालना येथील टाऊन हॉल येथे मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते झाले. हुतात्मा स्मारक स्मृती स्तंभास पुष्पचक्र वाहून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. भारतीय स्वातंत्र्याच्या लढ्यात मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यासाठी जालना जिल्ह्यातील जनतेने त्याग व बलिदान देत हा लढा यशस्वी केला. जिल्ह्यातील दगडाबाई शेळके यांची ओळख मराठवाड्याची झाशीची राणी लक्ष्मीबाई असल्याचे पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

यावेळी पालकमंत्री श्रीमती मुंडे यांच्या हस्ते शासकीय सेवा घरपोच देण्यासाठी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या संकल्पनेतून आकारास आलेल्या 'जालना मित्र' पोर्टलचे उद्घाटन करण्यात आले.

### परभणीमध्ये अभिवादन

परभणी येथील राजगोपालचारी उद्यानात मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रम पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते झाला. त्यांनी स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना अभिवादन केले. या लढ्यात परभणी जिल्ह्याचे उल्लेखनीय योगदान आहे. जिल्ह्यातील अनेकांनी या लढ्यात योगदान दिले. स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची जाणीव ठेवून त्यांच्या प्रेरणेने जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न केले जातील, असे पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी सांगितले. तसेच या लढ्यात पुरुषांच्या बरोबरीने महिलांचे योगदान महत्त्वपूर्ण होते. गीताबाई चारठाणकर, शांताबाई पेडगावकर यासह अनेक महिलांनी लढ्यात अनन्य साधारण कामगिरी बजावल्याचे त्यांनी सांगितले.

### नांदेडला ध्वजारोहण

नांदेड येथील माता गुजरीजी विसावा उद्यानात मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते झाले. प्रारंभी पालकमंत्री श्री. सावे यांनी स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. जिल्ह्यातील अतिवृष्टीबाधित सर्व शेतकऱ्यांना मदत येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछडे, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे आदी उपस्थित होते.

### व्हॉट्सॲपद्वारे तक्रार निवारण

नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने नागरिकांच्या सोयीसाठी व्हॉट्सॲप चॅटबॉट ऑटोमेशन (Whatsapp Chatbot Automation) सेवा सुरू केली आहे. या सेवेचे उद्घाटन पालकमंत्री श्री. सावे यांच्या हस्ते झाले. या सेवेमुळे नागरिकांना शासकीय माहिती व सेवा सहज, सुलभ आणि वेगवान पद्धतीने २४ तास उपलब्ध होत आहेत. शासकीय योजना, प्रमाणपत्रासाठी आवश्यक कागदपत्रांची यादी, ऑनलाइन अर्जाच्या लिंक, अर्जाची सद्य:स्थिती, तक्रार नोंदविणे आदी सुविधा मोबाइलवरून थेट उपलब्ध होत आहेत.

> राज्य शासनाच्या माध्यमातून मराठवाड्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी उद्योग आणि त्यातून रोजगार निर्मिती, कृषी, पायाभूत सोयी-सुविधांचा विकास अशा सर्व क्षेत्रात अथकपणे काम करण्यात येईल.
>
> **- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री.**

### हुतात्मा स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण

लातूर येथे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते हुतात्मा स्मारक स्मृतिस्तंभ येथे ध्वजारोहण सोहळा पार पडला. पालकमंत्री श्री. भोसले यांनी हुतात्मा स्मारक स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले. मराठवाडा मुक्तिसंग्रामाच्या लढ्यातील महत्त्वपूर्ण घटनांच्या छायाचित्रांचा समावेश असलेल्या 'मराठवाडा मुक्तिलढा' या कॉफीटेबल बुकचे प्रकाशन पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते झाले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली जिल्हा प्रशासनाने ही सचित्र पुस्तिका तयार केली आहे. इतिहास अभ्यासक विवेक सौताडेकर आणि भाऊसाहेब उमाटे यांचे सहकार्य लाभले आहे.

### हिंगोलीत ध्वजारोहण

हिंगोली येथील अण्णासाहेब टाकळगव्हाणकर बाल उद्यानातील हुतात्मा स्मारक स्मृतिस्तंभ येथे पालकमंत्री नरहरी झिरवाळ यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा झाला. यावेळी स्वातंत्र्य सैनिकांचे कुटुंबीय मालतीबाई पैठणकर उपस्थित होत्या. जिल्हा प्रशासनाने सेवादूत हिंगोली ही वेब प्रणाली, व्हॉटस्ॲप चॅटबॉट प्रणाली, ईक्यूजे कोर्ट लाइव्हबोर्ड सॉफ्टवेअर आणि मोबाइल ॲप्लिकेशन, व्हॉट्सॲप बेस तक्रार निवारण प्रणाली विकसित केली आहे. ही सेवा नागरिकांच्या समस्या जलद, पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने सोडविण्यात उपयोगात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

### धाराशिवमध्ये ध्वजारोहण

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात मुख्य शासकीय ध्वजारोहण पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते झाले. तत्पूर्वी त्यांनी स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण केले. मराठवाडा जिल्ह्याचा गौरवशाली इतिहास आणि जिल्ह्याच्या प्रगतीसाठी सुरू असलेल्या विविध योजनांची माहिती देत पालकमंत्री श्री. सरनाईक यांनी शुभेच्छासंदेशातून प्रकाश टाकला.

मराठवाड्यातील आठही जिल्ह्यात मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाबरोबरच विविध कार्यक्रमांचे उद्घाटन, लोकार्पण करण्यात आले. त्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा, मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान, स्वस्थ नारी-सशक्त परिवार अभियान, वृक्षारोपण, परभणीत मोबाइल फॉरेन्सिक व्हॅन आणि पाच आय-बाईकचे उद्घाटन, बीड येथील जिल्हा रुग्णालयात अत्याधुनिक कार्डियाक कॅथलॅबचे लोकार्पण, नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाने तयार केलेले कॉफीटेबल बुक आदींचा समावेश होता.

**(सहायक संचालक, संचालक माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.)**

**'महाराष्ट्र सक्षम आणि समृद्ध तेव्हाच होईल, जेव्हा प्रत्येक गाव सक्षम आणि समृद्ध होईल' - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची सुरुवात नुकतीच मराठवाड्यातून झाली. मुहूर्त होता मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचा आणि ठिकाण होते किनगाव ता. फुलंब्री जि. छत्रपती संभाजीनगर.**

# समृद्ध व सक्षम गावांसाठी अभियान!

**डॉ. मिलिंद दुसाने**

मागासलेपण, सततचा दुष्काळ असा शिक्का मराठवाड्याच्या कपाळी बसलाय. हा शिक्का मिटवण्याचा निर्धार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहेच. शिवाय त्यासाठी प्रत्यक्ष कृतीचे पाऊल त्यांनी मराठवाड्यातूनच टाकले हे विशेष. हा काही निव्वळ योगायोग नव्हता. ही एक जाणीवपूर्वक संदेश देणारी कृती होय. आता हे अभियान १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविले जाईल. किनगावच्या ग्रामस्थांना प्रोत्साहित करताना श्री. फडणवीस म्हणाले त्याप्रमाणे, स्पर्धा सुरू झाली आहे, प्रत्येकाने आपले अभियान समजून आपला सहभाग द्यावा आणि महाराष्ट्र घडवावा.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे ग्रामीण महाराष्ट्राला सक्षम आणि समृद्ध करणारे ठरणार, यात शंका नाही. आजपर्यंत या राज्याने ग्रामसमृद्धीची अनेक अभियाने पाहिली आणि राबवलीही. त्यातून काही गावे निश्चितच आदर्श ठरावीत अशी घडली; पण किनगावला मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले त्याप्रमाणे, आता प्रत्येक गाव, ग्रामपंचायत या अभियानात सहभागी होईल आणि समृद्ध, सक्षम होईल. या अभियानाचा मूळ उद्देशच ग्रामपंचायतीला पर्यायाने प्रत्येक ग्रामस्थाला प्रोत्साहित करणे हाच आहे. हे प्रोत्साहन तालुका, जिल्हा, महसूल विभाग आणि राज्य अशा चार स्तरांवर आहे.

### समृद्धीची सप्तपदी

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाचे सात प्रमुख घटक आहेत.

- सुशासनयुक्त पंचायत तयार करणे.
- सक्षम पंचायत तयार करणे.
- जलसमृद्ध, स्वच्छ व हरित गाव निर्माण करणे.
- मनरेगा व इतर योजनांचे अभिसरण करणे.
- गावपातळीवरील संस्थांचे सक्षमीकरण करणे.
- उपजीविका विकास, सामाजिक न्याय.
- लोकसहभाग व श्रमदानाच्या माध्यमातून लोकचळवळ निर्माण करणे.

प्रत्यक्षात या अभियानाची तयारी १ ऑगस्टपासूनच सुरू झाली आहे. मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनापासून म्हणजेच १७ सप्टेंबरपासून हे अभियान राज्यभरात सुरू झाले. हे अभियान ग्रामस्थांना विविध सेवा देण्याचे अभिवचन देते, त्यासाठी आवश्यक यंत्रणेचे सक्षमीकरण करण्यास चालना देते,



हेच ते सुशासन. त्यात लोकाभिमुख प्रशासन, नागरी सेवा सुविधा केंद्र, ग्रामपंचायत स्तरावरच तक्रार निवारण, ग्रामपंचायतीचे संकेतस्थळ आणि त्यावर ग्रामपंचायती संबंधित सर्व माहिती प्रसिद्ध करणे ही बाब समाविष्ट आहे. यामुळे ग्रामपंचायत स्तरावरच उत्तम सेवा आणि पारदर्शकता याचा समन्वय घालून देण्यात आला आहे. याशिवाय दप्तर अद्ययावतीकरण, लेखापरीक्षण, सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, ग्रामविकास समितीचे कामकाज इ. बाबींवर भर देण्यात आला आहे. बदलत्या काळात माहिती तंत्रज्ञानाच्या युगात ग्रामीण भागातील व्यक्ती ही मागे राहू नये, याबाबतही शासन सजग आहे. ग्रामपंचायत स्तरावरच दिव्यांग, महिला व बालकल्याण, मागासवर्गीयांचे कल्याण यांच्यावरील अर्थसंकल्पित खर्च त्या-त्या प्रमाणात करणे, दिव्यांगांना ओळखपत्र मिळवून देणे, आयुष्मान भारत कार्ड मिळवून देणे अशा लोककल्याणाच्या बाबींचा अंतर्भाव करण्यात आला आहे. लोकसहभाग वाढविण्यासाठी लोकवर्गणीचे उद्दिष्ट प्रति एक हजार लोकसंख्येस दोन लाख रुपये इतके ठरवून देण्यात आले आहे. या प्रत्येक बाबीला गुणांकन देण्यात आले आहे.



## पर्यावरण समृद्धीची कास

आपलं गाव हे जलसमृद्ध, स्वच्छ आणि हरित असावं, यासाठी पाण्याचे स्रोत बळकटीकरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग सर्व शासकीय निमशासकीय संस्थांमध्ये स्थापित करणे, सूक्ष्म सिंचनाखाली क्षेत्र वाढविणे, अपारंपरिक ऊर्जेचा, सौरऊर्जेचा वापर वाढवून त्याद्वारे पाणीपुरवठा योजना, ग्रामपंचायत इमारत, घरकुलांना सौरऊर्जेवर रूपांतरित करणे या उपायांचा समावेश आहे. शिवाय वृक्षलागवड व संवर्धन, स्वच्छता अभियान अंमलबजावणी, प्लास्टिकबंदी घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन अशा बाबी अंतर्भूत करण्यात आल्या आहेत.

## योजनांचे अभिसरण

गावातील विकास, स्वच्छता, जलसंधारण; तसेच जीवनमान उंचावणारी वैयक्तिक लाभाची कामे ही महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेचे इतर योजनांशी अभिसरण करून करण्यात यावी. त्यात घरकूल बांधणी, जलतारा शोषखड्डे, शेतीशी निगडित, शेतीपूरक कामे यांचा समावेश करून त्यासाठी गुणांकन ठेवण्यात आले आहे.

## गावाचा सर्वांगीण विकास

गावाच्या प्रत्येक घटकाचा विकास, तेथील सार्वजनिक सुविधांचा विकास हे या अभियानाचे वैशिष्ट्य म्हटले पाहिजे. ग्रामपंचायत सक्षमीकरण, शाळा सुविधांचे सक्षमीकरण, सर्व शाळा डिजिटल करणे, शाळांमध्ये मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह, पिण्याच्या पाण्याची सुविधा, परसबाग निर्मिती, सौरऊर्जा कार्यान्वित करणे, बोलक्या भिंती रंगवणे, अंगणवाडीचे सक्षमीकरण करणे, पशुवैद्यकीय कचरा, स्मशानभूमी इ. सुविधांचा विकास करणे, गावाला व्यायामशाळा उपलब्ध करून त्यासाठी सुविधा उपलब्ध करणे, धार्मिक स्थळांचे सुशोभिकरण करणे इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे. यातील प्रत्येक बाबीला गुणांकन देण्यात येणार आहे.

## लाडकी बहीण होणार लखपती दिदी

सर्व घटकांचा आर्थिक सामाजिक विकास करून हे अभियान सामाजिक न्यायाचेही अभिवचन देते. प्रत्येकाला हक्काचे घर देणे, त्यासाठी घरकूल योजनांची अंमलबजावणी, महिला बचतगटांना कर्ज वितरण करून त्यांचा उद्योग व्यवसाय उभारून त्यांचे उत्पन्न वाढविणे व त्यातून लखपती दिदी निर्माण करणे, शेतकरी उत्पादक संस्थांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून, त्यांच्या स्वतंत्र संस्था निर्माण करणे, सुशिक्षित बेरोजगारांना कौशल्य प्रशिक्षण, उद्योग व्यवसायासाठी कर्ज देणे, सामाजिक अर्थसाहाय्य योजनेंतर्गत गावातील वंचित पात्र लाभार्थ्यांना लाभ देणे, सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन, ॲनिमियामुक्त गाव ही संकल्पना राबविणे इ. बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

## लोकसहभाग हीच यशाची गुरुकिल्ली

प्रत्येक अभियानाची यशस्विता ही त्यातील लोकसहभागावर अवलंबून असते. लोकांनी या अभियानात सहभागी व्हावे, श्रमदान करावे, स्वच्छता अभियानात सहभागी होणे इ. बाबींनाही या अभियानात चालना देण्यात आली आहे. याशिवाय पाणंद रस्त्यांची कामे, रस्ता दुरुस्तीची कामे करता येणार आहेत.

## गुणांकन आणि पारितोषिके

या अभियानात समाविष्ट प्रत्येक बाबीला गुण देण्यात येणार आहेत आणि या गुणांकनाच्या आधारे पारितोषिकेही दिली जाणार आहेत. तालुका ते राज्यस्तर अशी या पारितोषिकांची वर्गवारी आहे. एकूण २३० कोटी रुपयांची पारितोषिके ग्रामपंचायतींना मिळणार आहेत. आता गरज आहे, ती ग्रामपंचातींच्या आणि पर्यायाने लोकांच्या सक्रियतेची.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शुभारंभाच्या कार्यक्रमात ग्रामस्थांना म्हणाले त्याप्रमाणे, राज्यातील अनेक गावांमध्ये लोक वेगवेगळे प्रयत्न करून परिवर्तन घडवीत आहेत. आपल्या प्रत्येकामध्ये हे परिवर्तन घडविण्याची सुप्त शक्ती आहे. त्या सुप्त शक्तीची आठवण करून देण्यासाठीच हे अभियान आहे.

(जिल्हा माहिती अधिकारी, छत्रपती संभाजीनगर.)

**राज्यातील शहरी, ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेला गुणात्मक, पारदर्शक, सक्षम, प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन योजना राबविण्यात येत आहेत. गुणवत्तापूर्ण, सहज आणि सुलभ आरोग्य सेवा नागरिकांच्या दारी पोहोचविण्याचा निर्धार या कामगिरीतून स्पष्ट दिसतो. प्राथमिक, द्विस्तरीय व त्रिस्तरीय प्रणालीद्वारे राज्यात आरोग्यसेवा दिल्या जातात. त्यांना अधिक सक्षम करण्याचा माझा प्रयत्न आहे व शासन यासाठी कटिबद्ध आहे. आरोग्याचा ध्यास – महाराष्ट्राचा विकास या ध्येयाने विभाग कार्यरत असून आगामी काळात महाराष्ट्राला सुदृढ व संपन्न बनविण्याचा विश्वास राज्यातील जनतेला मिळत आहे.**

# ध्यास आरोग्याचा, विकास महाराष्ट्राचा!

**प्रकाश आबिटकर,**
सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री



शासनाच्या वतीने 'संकल्प निरोगी महाराष्ट्राचा' या दृढनिश्चयाने राज्यातील गोरगरीब, दुर्गम, अतिदुर्गम; तसेच लोकवस्त्यांमध्ये राहणाऱ्या लोकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या समन्वयाने 'आरोग्य योजना' तसेच विविध उपक्रम राबविण्याचे व लोकसहभागातून ते यशस्वी करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण व वेळेवर आरोग्य सेवा मिळावी, या हेतूने राज्यात जानेवारीपासून विविध आरोग्य योजना आखण्यात येत आहेत. आरोग्य विभाग अधिक सक्षम करण्याच्या दृष्टिकोनातून काही महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, तर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या समन्वयातून विभागाने मागील नऊ महिन्यांत लोकाभिमुख, पारदर्शक आणि परिणामकारक उपक्रम हाती घेतले आहेत.

राज्यातील शहरी, ग्रामीण व दुर्गम भागातील जनतेला गुणात्मक, पारदर्शक, सक्षम, प्रतिबंधात्मक व उपचारात्मक आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन योजना राबविण्यात येत आहेत. सर्वसामान्यांपर्यंत आरोग्य सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आरोग्य योजना कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. समाजातल्या तळागाळातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, यासाठी राज्याचा सार्वजनिक आरोग्य विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. प्राथमिक, द्विस्तरीय व त्रिस्तरीय प्रणालीद्वारे राज्यात आरोग्यसेवा दिल्या जातात. त्यांना अधिक सक्षम करण्याचा माझा प्रयत्न आहे व शासन यासाठी कटिबद्ध आहे.

### मनुष्यबळ भरती

चांगले नेतृत्व व्यक्ती, गट किंवा संस्थेला योग्य दिशेने मार्गदर्शन करून बदल घडवून आणते आणि त्यांना त्यांच्या ध्येयांपर्यंत पोहोचण्यास मदत करते. त्यामुळे आरोग्य संस्था आणि आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांमध्ये विश्वास आणि प्रेरणा निर्माण करणे हेदेखील गरजेचे आहे. त्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागातील राज्य स्तरावरील पदे भरण्यात आली आहेत. तसेच आरोग्य संस्थांमधील पदेसुद्धा भरण्यात येत आहे. यामुळे सेवांचे सनियंत्रण आणि विविध कार्यक्रम राबवण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध होत आहे. तसेच विभाग अधिक सक्षम करण्यासाठी मनुष्यबळ उपलब्ध करून देऊन सार्वजनिक आरोग्य विभागासाठी नवीन आकृतिबंध तयार करण्यात येत आहे.



### धोरणात्मक निर्णय

राज्याचे स्वतंत्र आरोग्य धोरण तयार करण्यात येत असून यामुळे आरोग्य व्यवस्थेला दीर्घकालीन दिशा मिळणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचा चेहरा-मोहरा बदलणारे, राज्याची आरोग्य व्यवस्था अधिक बळकट व लोकाभिमुख करणारे महाराष्ट्राचे स्वतंत्र आरोग्यविषयक धोरण (State Health Policy) बनविण्याची कार्यवाही सुरू झाली आहे.

त्याचप्रमाणे राज्यात उपलब्ध असलेल्या उच्च दर्जाच्या शासकीय व खासगी आरोग्य सुविधा यांचा सर्वसामान्य जनतेला लाभ व्हावा आणि राज्यातील आरोग्य सुविधा उच्चतम दर्जाची व्हावी, यासाठी आरोग्य पर्यटन संकल्पना साकार करण्याची प्रक्रिया सुरू असून, भविष्यात महाराष्ट्रात 'आरोग्य पर्यटन' ही संकल्पना (Medical Tourism) रुजवण्याच्या दृष्टीने विभाग काम करत आहे.

### आरोग्य सेवांचे बळकटीकरण

खासगी रुग्णालयांची राज्यभर तपासणी मोहीम सुरू करून नियमपालन सुनिश्चित करण्यात आले आहे. रुग्णालय नोंदणी ऑनलाइन करण्यात आली आहे. तसेच रुग्णालय नोंदणी सर्वसमावेशक करण्यात येत आहे. खासगी रुग्णालयांच्या प्रभावी सनियंत्रणासाठी बॉम्बे नर्सिंग होम कायद्यात सुधारणा करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे

राज्यातील खासगी प्रयोगशाळांवर नियंत्रण आणि त्यांची गुणवत्ता राखण्यासाठी नवीन लेबोरेटरी ॲक्ट तयार करण्यात येत आहे.

नवीन अत्याधुनिक रुग्णवाहिका सेवा सुरू करण्यासाठी करार करण्यात आला आहे. याद्वारे १०८ रुग्णवाहिका सेवेचा दर्जा सुधारण्यात आला असून, ॲडव्हान्स लाइफ सपोर्ट असणाऱ्या रुग्णवाहिका रुग्णसेवेसाठी उपलब्ध होणार आहेत. राज्यासाठी १,७५६ रुग्णवाहिका उपलब्ध होणार असून त्याचा फायदा राज्याच्या कानाकोपऱ्यातील रुग्णांना होणार आहे. संसर्गजन्य आजार नियंत्रणासाठी साथरोग कायद्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यात येत आहे.

कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेंतर्गत मोबाइल व्हॅनचे लोकार्पण करण्यात आले असून, राज्यातील दोन कोटी महिलांची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम घेण्यात आली आहे. असंसर्गजन्य आजारांमध्ये महिलांमधील कर्करोग हा आजार जगभरात मोठा आरोग्याचा प्रश्न बनला आहे. कर्करोगाचे प्रामुख्याने तीन प्रकार आहेत - मुख कर्करोग, गर्भाशयमुख कर्करोग, स्तन कर्करोग इत्यादी. कर्करोगाचे प्रमाण देशभर आणि राज्यात वाढत असल्याने या आजाराचे वेळेवर निदान आणि उपचार होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. कर्करोगाविषयी जनजागृती आणि त्यावरील उपचार अधिक प्रभावीपणे राबविण्यासाठी जागतिक कर्करोग दिनानिमित्त विशेष मोहीम राबविण्यात आली. महिलांसाठी गर्भाशयमुख कर्करोग ही मोठी समस्या आहे. याविषयी जनजागृती करण्यासाठी मोहीम राबविण्यात येत आहे.

आरबीएसके अंतर्गत शालेय तपासणी व मोफत उपचार मोहीम हाती घेण्यात आली असून, त्या अंतर्गत बालके आणि किशोरवयीन मुलांची तपासणी करण्यात येत आहे. राज्यात राबवण्यात आलेल्या मोतिबिंदूमुक्त महाराष्ट्र मोहिमेत १ लाखपेक्षा जास्त शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

पीसीपीएनडीटी कायद्याची कठोर अंमलबजावणी करून स्त्रीभ्रूणहत्येवर नियंत्रण आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

महिन्यातून किमान दोन वेळा रुग्णालयांना अचानक भेट देऊन सुविधा तपासल्या जात आहेत. सर्व शासकीय रुग्णालयांमध्ये आवश्यक औषधांचा नियमित पुरवठा सुनिश्चित करण्यात आला आहे.

महात्मा फुले जनआरोग्य योजना सर्वांपर्यंत पोहोचण्यासाठी त्याची व्याप्ती वाढविण्याचा निर्णय घेण्यात आला. योजनेच्या पॅनलवरील रुग्णालयांची संख्या वाढली असून, योजनेच्या पॅकेजमध्येसुद्धा आली आहे. राज्यातील सर्व नागरिकांना आयुष्यमान भारत कार्डद्वारे पाच लाखांपर्यंत मोफत उपचार मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आरोग्य संस्था निरीक्षण प्रणालीचा शुभारंभ झाला आहे.

दिव्यांगांबाबत आरोग्य विभाग संवेदनशील असून विशेष काळजी घेत दिव्यांग व्यक्तींना प्रवासात अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे त्यांना जवळच्या ठिकाणी,






सुधारणा करण्यात येत आहे. पॅकेजमध्ये काही नवीन आजारांचा समावेश करण्यात येणार असून त्याचा फायदा रुग्णांना होईल. त्यासाठी आरोग्य यंत्रणा आणि महात्मा फुले जनआरोग्य योजना सोसायटीचा वेळोवेळी आढावा घेण्यात येतो. त्याचप्रमाणे, बृहन्मुंबईसह सर्व महानगरपालिकांच्या रुग्णालयांत महात्मा फुले जनआरोग्य योजना लागू करण्यात आली आहे. याशिवाय कामगार विमा सोसायटीच्या रुग्णालयांमध्येही महात्मा फुले जनआरोग्य योजना लागू करण्यात सुलभतेने दिव्यांग प्रमाणपत्रे मिळावीत, यासाठी ग्रामीण रुग्णालय (५० खाटा) व उपजिल्हा रुग्णालय स्तरावरसुद्धा शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत. तसेच प्रमाणपत्र देणारी नवीन केंद्रेसुद्धा निर्माण करण्यात येत आहेत.

राज्यात औषधांचा नियमित पुरवठा होण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू व सेवा प्राधिकरणामार्फत सर्व औषधांची निविदा काढण्यात येत आहे. राज्यात प्रत्येक जिल्हास्तरावर वेअरहाऊस तयार करण्याचा निर्णय घेण्यात

आला आहे, जेणेकरून सर्व औषधी जिल्ह्यात वेळेवर उपलब्ध होऊ शकतील. त्याचप्रमाणे औषधी कोणत्याही स्तरावर खरेदी करताना उच्चतम दर्जाच्या असाव्यात, यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

### नवीन उपक्रम व योजनांचा विस्तार

रक्तपेढी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यासाठी नवीन नियमावली तयार करण्यात येत आहे. तसेच रक्तपेढींच्या नियंत्रणासाठीसुद्धा नियमावली तयार करण्यात येत आहे. रुग्णालये तयार झाल्यावर तत्काळ कार्यान्वित व्हावे, यासाठी रुग्णालयांचे बांधकाम ५० टक्के पूर्ण झाल्यावरच पदनिर्मिती करण्याचे धोरण अवलंबण्यात आले आहे.

मानसिक आरोग्यबाबत सुविधा गावपातळीपर्यंत वाढविण्याचे धोरण राबविण्यात येत असून, मानसिक आजारावरील नामांकित संस्था NIMH-NS, बंगळुरूच्या धर्तीवर मानसिक रुग्णालयांमध्ये सेवा पुरविण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत.

### सेवा, सुधारणा व गौरव

आरोग्य व्यवस्थेत सर्वांनी उत्कृष्ट काम करण्यासाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने सरकारी रुग्णालयांमध्ये उत्कृष्ट कार्य करणारे वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी; तसेच नॉर्मल प्रसूतीला प्रोत्साहन देणाऱ्यांचा सत्कार करण्यात आला.

### तंत्रज्ञानाचा वापर व नवे कार्यक्रम

ग्रीन एनर्जी उपक्रमांतर्गत शासकीय रुग्णालयांचा वीज खर्च मोठ्या प्रमाणात कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

बांधकामांच्या सनियंत्रणासाठी सॉफ्टवेअर विकसित करण्यात आले असल्याने आरोग्य केंद्रांच्या बांधकामांना गती आणि पारदर्शकता येणार आहे.

### भूमिपूजन-लोकार्पण-आरोग्य सुविधांची घोषणा

राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत पायाभूत विकास प्रकल्पांतर्गत अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज राज्य कुटुंब कल्याण भवन व प्रशिक्षण केंद्र, पुणे येथे स्थापन करण्यात येत आहे. सर्व राज्यस्तरीय कार्यालये एकाच ठिकाणी, राज्यातील शहरी भागातील गरजू नागरिकांसाठी आणखी नवीन ४३ ठिकाणी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना




अंतर्गत आरोग्यसेवा उपलब्ध, राज्यातील आठ परिमंडळातील ५९३ आरोग्य संस्थांमध्ये यांत्रिक वस्त्र धुलाई सेवा केंद्र; तसेच राज्यात साथरोग उद्रेक काळात जीवाणू व विषाणू चाचणी जलदगतीने करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, पुणे येथे रेण्वीय चाचणी सुविधा निर्माण करण्यात येणार आहे.

### लोकाभिमुख आरोग्य उपक्रम

आषाढी वारीच्या निमित्ताने आरोग्य विभागाकडून देहू-आळंदी ते पंढरपूर मार्गावर 'भक्ती विठोबाची, सेवा आरोग्याची' विशेष उपक्रम राबविण्यात आला व व्यापक अशी जनजागृती करण्यात आली. या उपक्रमांतर्गत एकूण नऊ लाखांपेक्षा जास्त वारकऱ्यांना मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचाराचा लाभ देण्यात आला.

धर्मादाय रुग्णालयांना महात्मा फुले जनआरोग्य योजना अनिवार्य करण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न करण्यात येत असून सर्व धर्मादाय रुग्णालयांना योजना लागू करण्याबाबत आवाहन करण्यात आले आहे. कुष्ठरोग रुग्णांसाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थांचे अनुदान तिप्पट करून ते दोन हजारांवरून सहा हजार रुपये करण्यात आले. त्यामुळे या क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांचा उत्साह वाढणार असून, कुष्ठरोग रुग्णांच्या पुनर्वसनाच्या कामात अधिक परिणामकारकता येणार आहे.

आरोग्य विभागाने अवयवदानाविषयी व्यापक जनजागृतीसाठी 'अंगदान-जीवन संजीवनी अभियान' अंतर्गत ३ ते १५ ऑगस्ट २०२५ या कालावधीत 'अवयवदान जनजागृती पंधरवडा'चे यशस्वीपणे आयोजन केले. त्यानंतर स्वातंत्र्यदिनी राज्यातील अवयवदाते आणि त्यांच्या नातेवाईकांचा प्रत्येक जिल्हास्तरावर सन्मान करण्यात आला. अवयवदान जनजागृती मोहीम राज्यात वर्षभर राबविण्यात येणार आहे. महाराष्ट्र राज्यात एक लाखापेक्षा अधिक नागरिकांनी संकल्प अर्ज भरून दिले आहेत. त्यामुळे महाराष्ट्र देशात पहिल्या क्रमांकावर आले आहे.

गेल्या नऊ महिन्यांत सार्वजनिक आरोग्य विभागाने घेतलेले निर्णय हे केवळ प्रशासकीय सुधारणा नाहीत, तर समाजकल्याणकारी दृष्टीने ऐतिहासिक पावले आहेत. गुणवत्तापूर्ण, सहज आणि सुलभ आरोग्य सेवा नागरिकांच्या दारी पोहोचविण्याचा निर्धार या कामगिरीतून स्पष्ट दिसतो. आरोग्याचा ध्यास - महाराष्ट्राचा विकास या ध्येयाने विभाग कार्यरत असून आगामी काळात महाराष्ट्राला सुदृढ व संपन्न बनविण्याचा विश्वास राज्यातील जनतेला मिळत आहे.

कुंभमेळ्याची नगरी, बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले त्र्यंबकेश्वर, द्राक्ष आणि कांद्यासाठी प्रसिद्ध जिल्हा, उद्योगाचे शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या नाशिक जिल्ह्यात आता एका नव्या प्रकल्पाची भर पडली आहे. तो प्रकल्प म्हणजे केंद्रीय ऊर्जा अनुसंधान केंद्राची (CPRI) प्रादेशिक तपासणी प्रयोगशाळा. या प्रयोगशाळेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय ऊर्जा, गृहनिर्माण मंत्री मनोहरलाल खट्टर यांच्या हस्ते आणि अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, जलसंपदा व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत नुकतेच झाले. नाशिकच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या प्रयोगशाळेविषयी..

# आत्मनिर्भरतेचे प्रतीक!

**विलास बोडके**

केंद्रीय ऊर्जा अनुसंधान संस्था अर्थात सेंट्रल पॉवर रिसर्च इन्स्टिट्यूट (CPRI) ही केंद्र सरकारच्या ऊर्जा मंत्रालयाच्या अंतर्गत १९६० मध्ये स्थापन झालेली एक स्वायत्त आणि वीज क्षेत्रातील प्रमुख राष्ट्रीय चाचणी आणि संशोधन संस्था आहे. विद्युत ऊर्जा उपकरणे आणि प्रणालींच्या संपूर्ण स्पेक्ट्रममध्ये प्रगत संशोधन, चाचणी, प्रमाणन आणि सल्लागार सेवा प्रदान करण्यासाठी ही संस्था कार्यरत आहे. कर्नाटकची राजधानी बेंगळुरू येथे या संस्थेचे मुख्यालय आहे. याशिवाय भोपाळ (मध्यप्रदेश), हैदराबाद (तेलंगणा), नोएडा (उत्तर प्रदेश), कोलकाता (पश्चिम बंगाल) येथेही या संस्थेचे कार्यालय कार्यरत आहे. रायपूर (छत्तीसगड) येथे नवीन युनिटची स्थापना केली जात आहे, तर नागपूर येथील औष्णिक संशोधन केंद्रानंतर नाशिक (नवीन युनिट) हे महाराष्ट्र राज्यातील दुसरे युनिट आहे.

### प्रादेशिक चाचणी प्रयोगशाळेचे दुसरे युनिट

नागपूर येथील औष्णिक संशोधन केंद्रानंतर राज्यात सीपीआरआयने स्थापन केलेली ही प्रयोगशाळा नाशिकपासून जवळच असलेल्या शिलापूर शिवारात उभी राहिली आहे. बाराव्या वित्त आयोगांतर्गत ही प्रयोगशाळा स्थापन करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार २०१९ मध्ये या प्रयोगशाळेचे भूमिपूजन करण्यात आले. एकूण २५० कोटी रुपये प्रयोगशाळेच्या कामावर खर्च होणार आहेत. देशाच्या पश्चिम भागातील उद्योगांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी महाराष्ट्र सरकारने या प्रकल्पासाठी शिलापूर, ता. जि. नाशिक शिवारात १०० एकर जागा उपलब्ध करून दिली आहे.

### नाशिक परिसरातील उद्योगांना पूरक

नाशिकसह परिसरातील औद्योगिक वसाहतींमध्ये विद्युत आधारित उपकरणांचे



विविध उद्योग, व्यवसाय कार्यरत आहेत. ही उपकरणे ग्राहकांपर्यंत पोहोचण्याआधी ते प्रमाणित करून घेणे आवश्यक असते. त्यासाठी नाशिकसह परिसरातील उद्योजकांना यापूर्वी भोपाळ किंवा बंगळुरू येथे जावे लागत असे. आता त्यांना भोपाळ येथे जाण्याची आवश्यकता नाही. त्यांच्या उपकरणांची तपासणी आता नाशिक येथेच होणार आहे. त्यामुळे उद्योजकांचा वेळ आणि पैसा वाचणार आहे. वेळेत प्रमाणिकरणाची सुविधा मिळणार असल्याने वेळेत उत्पादन तयार होऊन त्याला बाजारपेठ मिळणार आहे. या ठिकाणी उद्योजक ट्रान्सफॉर्मर, एनर्जी मीटर, स्मार्ट मीटर, ट्रान्सफॉर्मर ऑइल आणि इतर विद्युत उपकरणांची चाचणी आणि प्रमाणन करू शकतात.



### १०० एकर जागेत प्रयोगशाळा

१०० एकर क्षेत्रात पसरलेल्या या प्रयोगशाळेत पायाभूत सुविधांमध्ये ऑनलाइन शॉर्टसर्किट चाचणी केंद्र, एनर्जी मीटर चाचणी प्रयोगशाळा, ट्रान्सफॉर्मर नियमित चाचणी सुविधा, तापमान वाढ चाचणी सुविधा, ८०० केव्ही ८० केजे इम्पल्स व्होल्टेज चाचणी सुविधा, ट्रान्सफॉर्मर ऑइल चाचणी सुविधा ही या प्रयोगशाळेची ठळक वैशिष्ट्ये आहेत. नाशिकमध्ये स्थित ही सुविधा भारताच्या पश्चिम भागातील उद्योग आणि उपयुक्त सेवा देण्यासाठी निर्माण केली आहे. ही प्रयोगशाळा भारत सरकारच्या आत्मनिर्भरतेच्या दृष्टिकोनाला पाठिंबा देते. स्वदेशी चाचणी आणि प्रमाणन क्षमता वाढवून भारत उत्पादकांसाठी चाचणी आणि प्रमाणन वेळ लक्षणीयरीत्या कमी केला जाईल. यामुळे जलद उत्पादन विकास आणि बाजारपेठ प्रवेशाला प्रोत्साहन मिळणार आहे. ही सुविधा आंतरराष्ट्रीय मानकांचे पालन करणार आहे. जागतिक स्तरावरील कामगिरी आणि विश्वासार्हता बेंचमार्क सुनिश्चित करणार आहे. उद्योग आणि संशोधन संस्थांमध्ये सहकार्य वाढवेल. तसेच वीज क्षेत्रातील उत्पादनांची गुणवत्ता वाढवेल.

### नाशिक उद्योगांचे डेस्टिनेशन

महाराष्ट्र सर्वच क्षेत्रात पुढे जात आहे. नाशिक जिल्हा गुंतवणुकीचे मोठे केंद्र होत आहे. गेल्या सहा महिन्यात सात मोठे गुंतवणूकदार गुंतवणूक करीत आहेत. त्यात खाणकामासाठी आवश्यक उपकरणे तयार करणाऱ्या कंपनीचाही समावेश आहे. समृद्धी महामार्गामुळे आता नाशिकला इन्व्हेस्टमेन्ट डेस्टिनेशन म्हणून भूमिका बजवावी लागणार आहे. एवढेच नव्हे, तर नाशिक हे आता उद्योजकांचे जंक्शन होत आहे. त्यामुळे राज्य सरकार नाशिकला उद्योगांचे डेस्टिनेशन करण्यासाठी कटिबद्ध आहे.

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

### महत्त्वाची प्रयोगशाळा

प्रादेशिक चाचणी केंद्र नाशिक येथे कार्यान्वित होत असल्यामुळे देशाच्या वीज क्षेत्रातील पायाभूत सुविधा वाढविण्याच्या प्रयत्नांमध्ये एक महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. ही सुविधा गुणवत्ता, सुरक्षितता सुनिश्चित करण्यात योगदान देईल आणि महत्त्वपूर्ण वीज उपकरणांची विश्वासार्हता, परदेशी चाचणी सेवांवरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होईल. यामुळे औद्योगिक विकासाला गती मिळेल. नवोपक्रमाला चालना मिळेल आणि देशभरातील विजेच्या जाळ्याच्या विस्ताराला पाठिंबा मिळेल. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील विकसित भारत आणि आत्मनिर्भर भारत या संकल्पनेची पूर्तता करण्यास उपयुक्त ठरणार आहे. मुंबई-नवी दिल्ली रेल्वे मार्ग, मुंबई-आग्रा महामार्ग, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग नाशिकपासून जवळ आणि तो पुढे देशात तयार होणाऱ्या सर्वांत मोठ्या वाढवण आणि जेएनपीटी बंदराला जोडला जाणार आहे. त्यामुळे नाशिक जिल्हा उद्योगांचे नेक्स्ट डेस्टिनेशन ठरेल हे निश्चित.

(जिल्हा माहिती अधिकारी, नाशिक.)

**राज्याचे लक्ष्य आगामी दशकात एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होण्याचे आहे आणि 'मैत्री' हा या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. हा पुढाकार भारताच्या 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. मैत्री ही केवळ प्रशासकीय सुधारणा नाही, तर उद्योगसुलभ महाराष्ट्राच्या नव्या युगाची सुरुवात आहे.**

# उद्योगजगतात डिजिटल क्रांती

**दीपेंद्रसिंह कुशवाह**



भारताच्या औद्योगिक नकाशावर महाराष्ट्राचे स्थान नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे. देशाच्या एकूण जीडीपीमधील १४ टक्के हिस्सा, ४० टक्क्यांहून अधिक परकीय गुंतवणूक (एफडीआय) आणि १७ टक्के राष्ट्रीय निर्यात या आकडेवारीतून महाराष्ट्राच्या सामर्थ्याची कल्पना येते. केवळ आकडेच नव्हे, तर २.५ लाख एकरांवर विस्तारलेल्या ३००हून अधिक औद्योगिक वसाहती, वाईन, इलेक्ट्रॉनिक्स, टेक्सटाइलपासून ते एरोस्पेसपर्यंतचे विशेष उद्योग उदयास येणे हे राज्याच्या प्रगत औद्योगिक पायाभूत सुविधांचे द्योतक आहेत.

महाराष्ट्राचे सकल राज्य उत्पादन (जीएसडीपी) तब्बल ५३० अब्ज अमेरिकन डॉलर्स इतके असून इस्रायल, स्वीडन, बेल्जियमसारख्या जागतिक अर्थव्यवस्थांशी ते तोलामोलाचे आहे. या पार्श्वभूमीवर गुंतवणूकदारांना पारदर्शक व गतिमान सेवा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासनाने 'मैत्री' (Maharashtra Industry, Trade and Investment Facilitation Cell) या डिजिटल यंत्रणेची उभारणी केली आहे.

## मैत्री कायदा आणि मैत्री नियम २०२५

महाराष्ट्र उद्योग, व्यापार व गुंतवणूक सुलभता कायदा (मैत्री कायदा) ३ जुलै २०२३ रोजी अधिनियमित करण्यात आला. या कायद्याचा उद्देश शासनाची भूमिका केवळ नियामक न ठेवता 'सुविधादाता' बनवण्याचा होता. ५ ऑगस्ट २०२५ रोजी 'मैत्री नियम २०२५' अधिसूचित करण्यात आल्याने ही संकल्पना अधिक सशक्त व गुंतवणूकदारांसाठी अनुकूल बनली आहे.

या कायद्यानुसार गुंतवणूकदारांना सर्व परवानग्या एकाच खिडकीतून व पूर्णपणे ऑनलाइन मिळतात. यात प्रत्येक विभागाला वेळेचे बंधन असून मुदत ओलांडल्यास सशक्त समिती निर्णय घेते. यामुळे विभागीय समन्वय, संयुक्त तपासण्या व डेटा सुरक्षा यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास वाढतो.

## पोर्टलवरील सुविधा

'मैत्री' पोर्टल हे केवळ अर्ज सादरीकरणाचे माध्यम नसून गुंतवणूकदारांसाठी संपूर्ण डिजिटल मार्गदर्शक आहे. यात १२५ सेवा सध्या पोर्टलवर उपलब्ध असून त्या १४ विभागांशी थेट जोडल्या आहेत. ऑनलाइन पेमेंट गेटवेद्वारे सर्व शुल्क डिजिटल मार्गाने भरता येतात. आणखी ५० नवी G2B सेवा लवकरच समाविष्ट होणार आहेत.

याशिवाय इन्व्हेस्टर विझार्डमध्ये कोणकोणत्या परवानग्या आवश्यक आहेत याचे स्वयंचलित मार्गदर्शन मिळते. इन्सेन्टिव्ह कॅलक्युलेटरद्वारे मिळणाऱ्या अनुदान व सवलतींचा अंदाज देण्यात येतो. रिअल-टाईम ट्रॅकिंग व डॅशबोर्ड्सवरून अर्जाची प्रगती त्वरित पाहता येते. तसेच AI चॅटबॉट 'उद्योग मित्र' - २४ x ७ साहाय्य, राष्ट्रीय सिंगल विंडो सिस्टिमशी (NSWS) जोडणी (राज्य व केंद्र मंजुरी एका ठिकाणी), तक्रार निवारण (गुंतवणूकदारांचा विश्वासार्ह साथीदार) हे मैत्रीअंतर्गत तक्रार निवारण यंत्रणा विशेष लक्षवेधी ठरली आहे. त्याचबरोबर गुंतवणूकदार ई-मेल वा वेबसाईटद्वारे तक्रार नोंदवू शकतात, यासाठी ठरावीक वेळेत निवारण करण्याची जबाबदारी विभागांवर टाकली गेली आहे. या संदर्भात साप्ताहिक बैठका उद्योग आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली होत असून आतापर्यंत तीन हजारांहून अधिक तक्रारींचे निवारण करण्यात आले आहे.

## ठोस यश – आकडेवारी बोलकी

३,६२,००० अर्जांची प्रक्रिया १ जानेवारी २०२३ पासून आजपर्यंत पूर्ण झाली आहे. यापैकी ९५.७७% अर्ज वेळेत निकाली काढण्यात यश आले असून उत्कृष्ट कामगिरीबद्दल मैत्रीला प्रतिष्ठेचा स्कॉच पुरस्कार प्राप्त झाला आहे.

## मोबाइलवरूनही गुंतवणुकीची सोय

राज्य शासनाचा मैत्री सिस्टिमला आणखी व्यापक करण्याचा उद्देश आहे. त्याचबरोबर पर्यटन, माहिती तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग, खाणकाम यांसारख्या सर्व G2B सेवा यात समाविष्ट करण्यात येणार असून हे पोर्टल लवकरच मोबाइल ॲपच्या स्वरूपात उपलब्ध होणार आहे.

## 'विकसित भारत'कडे वाटचाल

जास्तीत जास्त सुशासन आणि कमीत कमी सरकार या घोषवाक्याला मूर्तस्वरूप देणारे मैत्री महाराष्ट्राला देश-विदेशातील गुंतवणूकदारांसाठी आकर्षक गंतव्य बनवत आहे. राज्याचे लक्ष्य आगामी दशकात एक ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था होण्याचे आहे आणि मैत्री हा या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा ठरत आहे. हा पुढाकार भारताच्या 'विकसित भारत २०४७' या राष्ट्रीय दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. मैत्री ही केवळ प्रशासकीय सुधारणा नाही, तर उद्योगसुलभ महाराष्ट्राच्या नव्या युगाची सुरुवात आहे. डिजिटल सोयी, पारदर्शकता, तक्रार निवारण आणि वेगवान मंजुरी या माध्यमातून राज्य सरकारने गुंतवणूकदारांसाठी विश्वासाचे दार उघडले आहे. महाराष्ट्राचा औद्योगिक प्रवास आता जागतिक स्तरावर आणखी ठसा उमटवण्याच्या तयारीत आहे.

(विकास आयुक्त, (उद्योग))

**महाराष्ट्र-आयोवा भागीदारी ही कृषी, शिक्षण, नवीकरणीय ऊर्जा आणि गुंतवणूक या क्षेत्रांत मोठी संधी आहे. राज्य शासन आणि अमेरिकेतील आयोवा राज्य यांनी सिस्टर-स्टेट / पार्टनर-स्टेट करार केला आहे. या करारातून कृषी, तंत्रज्ञान, शिक्षण, ऊर्जा आणि गुंतवणूक यांसारख्या क्षेत्रांत सहकार्य वाढवण्याचे उद्दिष्ट आहे.**

# महाराष्ट्र-आयोवा भागीदारीतून समृद्धीचा नवा सेतू!

**वर्षा फडके-आंधळे**

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमेरिकेतील आयोवाच्या गव्हर्नर किम रेनॉल्ड्स यांनी १२ सप्टेंबर रोजी मुंबई येथील 'महाराष्ट्र सरकार आणि अमेरिकेतील आयोवा राज्य' यांच्यातील ऐतिहासिक सामंजस्य करारावर स्वाक्षरी केली. या सामंजस्य करारामुळे कृषी व कृषी तंत्रज्ञान, डिजिटलायझेशन, आरोग्य, पर्यटन, क्रीडा, जैवतंत्रज्ञान, वित्तीय सेवा, अक्षय ऊर्जा, नवोन्मेष आणि तंत्रज्ञान या क्षेत्रांमध्ये दोन्ही राज्य एकत्रित काम करणार आहेत. विशेषतः कृषी क्षेत्रात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), यांत्रिकीकरण आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी आयोवा विद्यापीठ आणि महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठ एकत्र संशोधन करणार आहेत.

महाराष्ट्राने याआधी जपान व जर्मनीसोबत सिस्टर-स्टेट करार करून व्यापार, उद्योग व सांस्कृतिक देवाण-घेवाणीला गती दिली आहे. अमेरिकेतील एखाद्या राज्यासोबत हा पहिलाच करार असून तो भारत-अमेरिका संबंधांना अधिक बळकट करेल. गव्हर्नर किम रेनॉल्ड्स यांनी महाराष्ट्राशी दीर्घकालीन भागीदारी करण्याची इच्छा व्यक्त केली असल्याने दरवर्षी आयोवाचे शिष्टमंडळ भारतात येईल, तर महाराष्ट्राचे शिष्टमंडळ आयोवाला भेट देईल. परस्पर राज्यातील विविध क्षेत्रातील ज्ञानाचा उपयोग दोन्ही राज्याच्या विकासासाठी होणार आहे. हा करार प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'जागतिक सहकार्य आणि राज्यांची आंतरराष्ट्रीय भागीदारी' या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. यामुळे राज्यातील शेतकरी, विद्यार्थी, उद्योजक आणि संशोधकांना नवे मार्ग खुले होतील आणि महाराष्ट्राच्या प्रगतीला गती मिळेल.

## आयोवाविषयी...

आयोवा हे अमेरिकेचे 'फुड बास्केट' म्हणून ओळखले जाते आणि या सहकार्यातून महाराष्ट्रातील शेती आणि अन्नप्रक्रिया उद्योगाला मोठा फायदा होणार आहे. क्लायमेट-रेझिलियंट ॲग्रीकल्चर, बायोफ्युएल्स आणि नवीकरणीय ऊर्जा या क्षेत्रांत दोन्ही राज्ये सर्वोत्तम पद्धतींची देवाण-घेवाण करणार आहे. नवी मुंबईतील एज्युसिटी प्रकल्प, व्यावसायिक प्रशिक्षण, इनोव्हेशन आणि स्टार्टअप्ससाठी निर्माण होणारे वातावरण या करारामुळे अधिक बळकट होईल. आयोवा व महाराष्ट्राचे शिष्टमंडळ परस्पर राज्यातील विविध क्षेत्रांना भेट देऊन त्या ज्ञानाचा उपयोग दोन्ही राज्याच्या विकासासाठी होऊन दीर्घकालीन भागीदारीला गती मिळेल.

**सामंजस्य करार :** महाराष्ट्र शासन आणि आयोवा राज्याने सिस्टर-स्टेट/पार्टनर स्टेट करार केला आहे. या करारातील महत्त्वाची क्षेत्रे :

- कृषी (Agriculture) आणि कृषी-तंत्रज्ञान (Agri-tech)
- जैवप्रौद्योगिकी (Biotechnology)
- वित्तीय सेवा (financial services)
- पायाभूत सुविधा (Infrastructure)
- अक्षय ऊर्जा (Renewable Energy)
- शिक्षण, संशोधन (Education, Academic Research Linkages)

## उद्दिष्टे

- कृषी उत्पादन क्षमता वाढवणे, तंत्रज्ञानाचा वापर करणे (उदा. AI - चलित शेती)
- निर्यात वाढवणे, आंतरराष्ट्रीय व्यापार व गुंतवणूक (Investment) वाढवणे
- मानवी आदान-प्रदान (people-to-people exchange), विद्यार्थी व संशोधन संस्थांमधील सहकार्य.

## महाराष्ट्र-आयोवा भागीदारी : नवी संधी, नवी क्षितिजे!

**सामंजस्य कराराची महत्त्वाची क्षेत्रे :**

### १) कृषी तंत्रज्ञान सुधारणा

- आयोवा हे अमेरिकेत कॉर्न बेल्ट म्हणून ओळखले जाते. त्यांचा शेतीतील यंत्रीकरण, प्रिसिजन ॲग्रीकल्चर, बायोटेक्नॉलॉजीचा अनुभव महाराष्ट्राला उपयोगी पडेल.



- महाराष्ट्रातील दुष्काळग्रस्त भागांना आधुनिक सिंचन तंत्रज्ञान, पीक विविधीकरण याचा फायदा होईल.
- दुष्काळ, पाणीटंचाई आणि हवामान बदल यांचा सामना करणाऱ्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी हे सहकार्य नवी आशा ठरेल.
- प्रिसिजन ॲग्रीकल्चर, पिकांचे विविधीकरण आणि जलसंपदा व्यवस्थापन यात आयोवाची तज्ज्ञता महत्त्वाची ठरेल.

## २) निर्यात आणि गुंतवणूक वाढीस मदत

- महाराष्ट्रातील प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ, दुग्धोत्पादने आणि औद्योगिक उत्पादनांना अमेरिकेत नवा बाजार मिळेल.
- अमेरिकन गुंतवणूक महाराष्ट्रात कृषी-प्रोसेसिंग, अक्षय ऊर्जा, पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये येईल.



- निर्यात व गुंतवणुकीच्या संधी वाढतील.
- विद्यार्थ्यांना आणि संशोधकांना आंतरराष्ट्रीय संधी मिळतील.

## ३) शिक्षण व संशोधन

- आयोवातील विद्यापीठे कृषी व बायोटेक संशोधनात प्रसिद्ध आहेत. महाराष्ट्रातील विद्यापीठांबरोबर संशोधन सहयोग वाढेल.
- विद्यार्थी व संशोधक देवाणघेवाण कार्यक्रम.
- महाराष्ट्रातील विद्यार्थी व संशोधकांना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संधी उपलब्ध होतील.

## ४) नवीकरणीय ऊर्जा

आयोवा अक्षय ऊर्जेत अमेरिकेत आघाडीवर आहे. महाराष्ट्रात सौर व नवीकरणीय ऊर्जा संयुक्त प्रकल्पांची शक्यता.

## ५) व्यापार व गुंतवणुकीच्या संधी

या करारातून परस्पर व्यापार आणि गुंतवणुकीचे नवीन मार्ग खुलतील. महाराष्ट्रातील प्रक्रिया उद्योग, अन्नप्रक्रिया, औद्योगिक उत्पादनांना अमेरिकेतील विस्तृत बाजारपेठ मिळण्याची शक्यता आहे. त्याचवेळी आयोवातील उद्योगांना महाराष्ट्रातील मोठा ग्राहकवर्ग आकर्षित करू शकेल.

## कराराचे फायदे

- **शेतीत प्रगत तंत्रज्ञानाचा वापर -** आयोवाची आधुनिक कृषी तंत्रज्ञान यंत्रणा व संशोधन महाराष्ट्रात आणता येईल, ज्यामुळे उत्पादनक्षमता वाढेल.
- **अन्नप्रक्रिया उद्योग वाढ -** शेतमालाला अधिक मूल्य मिळेल, निर्यात संधी वाढतील.
- **डिजिटलायझेशन व तंत्रज्ञानात सहकार्य -** स्मार्ट गव्हर्नन्स, ई-सेवा व डिजिटल शेतीसाठी नवीन उपाय महाराष्ट्रात लागू होतील.
- **आरोग्य क्षेत्रातील सुधारणा -** आयोवाच्या आरोग्यसेवा प्रणाली, संशोधन व प्रशिक्षणामुळे ग्रामीण व शहरी आरोग्य सेवा सुधारतील.
- **कौशल्य विकास व नोकऱ्या -** व्यावसायिक प्रशिक्षण, नवीन कौशल्ये व औद्योगिक सहकार्यामुळे रोजगाराच्या संधी निर्माण होतील.
- **अक्षय ऊर्जा व पर्यावरण संरक्षण -** स्वच्छ ऊर्जेच्या प्रकल्पांमुळे वायूप्रदूषण कमी होईल व शाश्वत विकासाला चालना मिळेल.
- **पर्यटन व क्रीडा विकास -** दोन्ही राज्यांमध्ये सांस्कृतिक देवाणघेवाण, पर्यटन व्यवसाय आणि क्रीडा स्पर्धांना प्रोत्साहन मिळेल.
- **आर्थिक गुंतवणूक व औद्योगिक वाढ -** अमेरिका व भारतातील कंपन्यांमध्ये थेट भागीदारी, गुंतवणूक व व्यापार वाढेल.
- **शिक्षण व संशोधन सहकार्य -** विद्यापीठे व संशोधन केंद्रांमधील संयुक्त प्रकल्पांमुळे विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवरील अनुभव मिळेल. सांस्कृतिक व शैक्षणिक आदान प्रदान वाढेल.
- **आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा -** महाराष्ट्राचा जागतिक नकाशावर औद्योगिक व तंत्रज्ञान भागीदार म्हणून दर्जा वाढेल.

महाराष्ट्र-आयोवा भागीदारी ही केवळ दोन राज्यांमधील करार नाही, तर ती ज्ञान, तंत्रज्ञान आणि संस्कृतीची देवाण-घेवाण घडवणारी महत्त्वाची पायरी आहे. या सहकार्यामुळे कृषी, ऊर्जा, शिक्षण आणि गुंतवणूक या क्षेत्रांत मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण होतील. आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या नव्या क्षितिजांचा शोध घेत महाराष्ट्राने अमेरिकेतील आयोवा राज्याशी सिस्टर-स्टेट करार केला आहे. दोन भिन्न भौगोलिक, सांस्कृतिक आणि हवामानाच्या परिस्थितीत असलेल्या या राज्यांनी परस्पर सहकार्याचा हात मिळवणे, ही विकासाच्या नव्या संधी उघडणारी एक ऐतिहासिक पायरी ठरणार आहे.

(उपसंचालक (वृत्त))

**नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी अवघ्या दोन वर्षांचा कालावधी राहिला आहे. पुढील वर्षी कुंभमेळ्याचे ध्वजारोहण होणार असल्याने राज्य शासनाने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्याच्या विकासकामांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: कुंभमेळ्याच्या निमित्ताने विकासकामांवर लक्ष ठेवून आहेत. याबाबत त्यांनी मुंबई, नाशिक येथे बैठकांमधून आढावा घेतला आहे. कुंभमेळ्यातील विकास कामे जलदगतीने आणि कुंभमेळ्यापूर्वी होण्यासाठी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे.**

# तयारी भक्तिमेळ्याची!

**गोपाळ साळुंखे**

आध्यात्मिक, भक्तीचा मेळा नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये कुंभमेळ्याच्या माध्यमातून फुलणार आहे. यानिमित्त देशासह जगभरातून येणारे साधू, संत, महंत आणि भाविकांना पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन तत्पर असून कार्यवाही सुरू आहे. एवढेच नव्हे, तर 'साधू संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' असे म्हटले जाते. त्यामुळे साधू, संतांना कोणत्याही सुविधांची उणीव भासू देणार नाही, असे नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे साधू-महंतांच्या विविध आखाड्यांना भेट देत आश्वस्त केले आहे.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये कुंभमेळा होईल. या कुंभमेळ्यासाठी आता अवघ्या दोन वर्षांचा कालावधी राहिला आहे. पुढील वर्षी कुंभमेळ्याचे ध्वजारोहण होईल. त्यामुळे राज्य शासनाने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथील कुंभमेळ्याच्या विकासकामांना सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वत: कुंभमेळ्याच्या निमित्ताने विकासकामांवर लक्ष ठेवून आहेत. यासाठी त्यांनी मुंबई, नाशिक येथे बैठकांमधून आढावा घेतला आहे. कुंभमेळ्यातील विकासकामे जलदगतीने आणि कुंभमेळ्यापूर्वी होण्यासाठी नाशिक - त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे. या प्राधिकरणाचे अध्यक्षपद नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्याकडे सोपविले आहे. त्यानुसार कुंभमेळ्याची पहिल्या टप्प्यातील व दीर्घ कालावधी लागणारी विविध विकासकामे गतिमान होताना दिसत आहेत.

नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे गोदावरी नदीच्या काठावर दर १२ वर्षांतून होणाऱ्या कुंभमेळ्यासाठी देशाच्या वेगवेगळ्या






आखाडा, श्री लक्ष्मी नारायण मंदिर, तपोवनातील कपिला संगम येथे भेट देत तेथील साधू, महंत, राष्ट्रीय आखाडा परिषदेचे प्रवक्ते महंत डॉ. रामकिशोर शास्त्री, दिगंबर आखाड्याचे महंत भक्तीचरणदास महाराज, रामस्नेहीदास महाराज, महंत शंकरदास महाराज, माधवदास राठी यांच्याशी संवाद साधला.

नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे आगामी काळात होणारा कुंभमेळा साधू, महंत आणि नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळे कुंभमेळ्याशी संबंधित सर्व विकासकामे वेळेत पूर्ण होतील, यासाठी प्रशासन नियोजन करीत असून दीर्घ कालावधी लागणारी कामे यंदाचा पावसाळा संपताच सुरू करण्यात येतील, असे जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी साधू-महंतांना सांगितले. एवढेच नव्हे, तर भागातून साधू, महंत आणि भाविकसुद्धा येतात. या सर्वांना आवश्यक रस्ते, पाणी, स्वच्छता, वीज, आरोग्य, दळणवळण आदी सोयी-सुविधांची उपलब्धता व्हावी, त्यांच्या अडी-अडचणी समजून घेत त्यांचे निराकरण व्हावे, म्हणून विभागीय आयुक्त डॉ. गेडाम, जिल्हाधिकारी श्री. शर्मा, महानगरपालिका आयुक्त श्रीमती खत्री यांनी आगळा-वेगळा उपक्रम सुरू केला आहे.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांच्यासह विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, जिल्हाधिकारी श्री. शर्मा, पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अतिरिक्त पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर आदींनी त्र्यंबकेश्वर येथे भेट देत तेथील महानिर्वाणी, आनंद, बडा उदासीन, नया उदासीन, निर्मल, अटल, जुना आखाडा, निरंजनी, आवाहन व अग्नी या दहा शैव आखाड्यांना भेट देऊन आखाड्यांच्या महंतांशी त्यांचे अभिप्राय व मागण्यांबाबत संवाद साधला. यावेळी स्वामी शंकरानंद सरस्वती, महंत भारद्वाज गिरी, महंत शिवगिरी व अन्य आखाड्यांच्या प्रमुख महंतांनी आपले म्हणणे मांडले. साधू, महंत, आखाडे; तसेच त्र्यंबकेश्वर येथील पुरोहित आणि स्थानिक नागरिक आणि भाविकांच्या सहकार्याने आगामी सिंहस्थ कुंभमेळा सुरक्षित, पर्यावरणपूरक आणि




आनंददायी करण्याचा विश्वास यावेळी विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी दिला.

या संवादभेटीनंतर जिल्हाधिकारी श्री. शर्मा यांनी नाशिक महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, कुंभमेळा विकास प्राधिकरणाच्या आयुक्त करिश्मा नायर, उपविभागीय अधिकारी अर्पिता ठुबे, उपजिल्हाधिकारी रवींद्र भारदे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांसमवेत पंचवटीतील पंचमुखी हनुमान मंदिर, श्री दिगंबर अनी तपोवन परिसर, कपिला संगम परिसराची संपूर्ण पाहणी केली. त्यामुळे साधू-महंतांनी समाधान व्यक्त करीत कामे लवकर पूर्ण होऊन साधू-महंतांसह कुंभमेळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना सुविधा वेळेत उपलब्ध होतील, अशी अपेक्षा व्यक्त केली.

**(माहिती अधिकारी, नाशिक.)**

**राज्यातील प्रत्येक घटकाचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सामाजिक, आर्थिक सक्षमीकरण व शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. मराठा, कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास असलेल्या घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्र शासनाने २०१९ पासून 'सारथी' ही संस्था सुरू केली आहे. मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था म्हणून 'शाहू विचारांना देऊ या गती, साधू या सर्वांगीण प्रगती' या बोधवाक्याखाली छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी), पुणे ही संस्था शिक्षण, मार्गदर्शन, कौशल्य विकास, रोजगार, उद्योजकता, संशोधन आणि सांस्कृतिक वारसा संवर्धन या सर्व क्षेत्रांत ६३ विविध उपक्रम राबवत आहे.**

# मराठा समाजाच्या स्वप्नांना पंख देणारी संस्था : सारथी

**संध्या गरवारे-खंडारे**

सारथी संस्थेमधील सन २०२१-२२ ते २०२४-२५ या एकूण चार वर्षांमध्ये ८ लाख ३८,४७७ लाभार्थ्यांनी सहभाग घेतला असून अनेक विद्यार्थी या संस्थेमार्फत मार्गदर्शन घेऊन विविध क्षेत्रात यश संपादन करत आहेत. या संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षण आणि मार्गदर्शनावर आतापर्यंत ६४७ कोटी रुपयांचा खर्च झालेला आहे. सारथी संस्थेमधील विद्यार्थी दरवर्षी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये निवडून येण्याचा नवीन उच्चांक निर्माण करत आहेत.

## शैक्षणिक संधी व शिष्यवृत्ती योजना

सारथीमार्फत विद्यार्थ्यांना केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षांसाठी पूर्व प्रशिक्षण, मुलाखतीची तयारी, मार्गदर्शन यासाठी आर्थिक साहाय्य दिले जाते. सारथीच्या स्थापनेपासून २०२० ते २०२४ या कालावधीत केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या विविध परीक्षांमध्ये ११२ विद्यार्थी निवडून शासनामध्ये सेवा बजावत आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगामध्ये २०२० ते २०२३ या कालावधीत १,०४८ विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले असून वर्ग-एक मध्ये २२९, तर वर्ग दोनमध्ये ८१९ विद्यार्थ्यांची निवड झालेली आहे.

## कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम

छत्रपती संभाजी महाराज सारथी युवा व्यक्तिमत्त्व विकास व संगणक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम हा महाराष्ट्र राज्यातील सर्व तालुकास्तरावर राबवण्यात येतो. या योजनेमध्ये कालानुरूप विविध अभ्यासक्रम शिकवले जातात. सन २०२२ ते २०२५ या कालावधीत एक लाख २० हजार लाभार्थ्यांना प्रशिक्षित करण्यात येणार होते, त्यापैकी ९७,२८६ लाभार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतला असून ३४,३०४ लाभार्थ्यांनी आपले प्रशिक्षण पूर्ण केले आहे. यापैकी ७,३६५ लाभार्थ्यांना नोकरी मिळाली असून ९,४१८ लाभार्थ्यांची मुलाखत प्रक्रिया सुरू आहे. सध्या महाविद्यालयांमध्ये १७,२५१ लाभार्थी प्रशिक्षण घेत आहेत.

## श्रीमंत मालोजीराजे भोसले प्रशिक्षण उपक्रम

या उपक्रमांतर्गत छत्रपती संभाजीनगर, नागपूर, पुणे, कोल्हापूर येथे आयटीआय,



पदविका व अभियांत्रिकी पदवी प्राप्त १,०१२ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येत आहे. यापैकी ६५७ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले असून, ३१४ विद्यार्थ्यांना नोकरी लागली आहे.

### परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना

महाराजा सयाजीराव गायकवाड सारथी गुणवंत मुलामुलींना परदेश शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये एकूण ५० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना आज अखेर एकूण सहा कोटी रुपयांच्या शिष्यवृत्ती रकमेचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेंतर्गत एकूण ७५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. सन २०२५ करिता ७५ जागांसाठी दिनांक १६ जून २०२५ पर्यंत अर्ज मागविण्यात आले होते. यामध्ये निवड प्रक्रिया सुरू आहे.

### डॉ. पंजाबराव देशमुख शिष्यवृत्ती

देशातील नामवंत २०० विद्यापीठात शिकणाऱ्या ३०० विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती देण्यात येते. यामध्ये शिक्षण शुल्क, लायब्ररी शुल्क, परीक्षा शुल्क, वसतिगृह शुल्क व भोजन शुल्काची १०० टक्के रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. सन २०२२-२३ व २०२३-२४ मध्ये या योजनेंतर्गत ४४१ विद्यार्थ्यांची निवड करण्यात येऊन पाच कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे. सन २०२४-२५ मध्ये या योजनेसाठी २७० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली आहे. या योजनेसाठी मार्च २०२५ अखेर सहा कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला आहे.

### शैक्षणिक शुल्क प्रतिकृती योजना

वसंतदादा साखर संस्था, पुणे येथील इंडस्ट्रियल फर्मिनेशन ॲण्ड अल्कोहोल टेक्नॉलॉजी (IFAT) आणि Wine Brewing and Alcohol Technology (WBAT) विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजना असून या अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळालेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांना १०० टक्के शैक्षणिक शुल्क रक्कम प्रतिपूर्ती स्वरूपात देण्यात येते. IFAT मधील एकूण ८० विद्यार्थ्यांना ४९.४० लाख व WBAT मधील एकूण २८ विद्यार्थ्यांना ३४.५४ लाख रुपये शैक्षणिक शुल्क अदा करण्यात आले. यापैकी २०२२-२३ मधील पास झालेल्या विद्यार्थ्यांपैकी एकूण सात विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

### शेतकऱ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी

सेनापती धनाजी जाधव सारथी शेतकरी ड्रोन पायलट प्रशिक्षण योजनेमध्ये राहुरी येथील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, परभणी येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ येथे शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये ३३० शेतकऱ्यांनी ड्रोन पायलट प्रशिक्षण पूर्ण केले आहे. शेतकरी मावळा सारथी कौशल्य विकास प्रशिक्षण अंतर्गत मधुमक्षिका पालन प्रशिक्षण देण्यात येते. यामध्ये वार्षिक लाभार्थी ५०० असून २०२५ पासून हे प्रशिक्षण सुरू झाले आहे. पशुधन संगोपन व मुरघास निर्मिती प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत वर्षभरात १,००० लाभार्थ्यांना उरळी कांचन येथील बायफ या संस्थेमार्फत ३० दिवसीय निवासी प्रशिक्षण, ६० दिवसीय प्रक्षेत्रीय प्रशिक्षण ८९ दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

### करिअर मार्गदर्शन

महाराणी सईबाई सारथी रोजगार व स्वयंरोजगार कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम पुणे, वाशिम, कोल्हापूर, गडचिरोली, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, नागपूर, नाशिक, पालघर, बीड, रत्नागिरी या जिल्ह्यात राबवला जातो. या सर्व जिल्ह्यांत एकूण १,४१९ अभ्यासक्रम राबविले जात असून, त्यापैकी ९८९ अभ्यासक्रम पूर्ण झालेले आहेत. सरदार सूर्याजी काकडे सारथी वाहन चालक कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत आय.डी.टी.आर. भोसरी पुणे येथे हलकी व जड वाहने चालवण्याचे ३० दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येते. सन २०२५ मध्ये या प्रशिक्षणास सुरुवात झाली असून आतापर्यंत ४९ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण पूर्ण केले आहे.

सरसेनापती हंबीरराव मोहिते सारथी मोडी लिपी प्रशिक्षण योजनेंतर्गत २६० विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय करिअर मार्गदर्शन व समुपदेशन शिबिरामध्ये सन २०२२ पासून ते २०२५ मध्ये १९,१९१ विद्यार्थ्यांनी करिअर मार्गदर्शनाचा लाभ घेतला आहे.



## निबंध स्पर्धांचे आयोजन

राजर्षी छत्रपती शाहू महाराज तालुकास्तरीय निबंध स्पर्धा योजनेमध्ये इयत्ता तिसरी ते पाचवी विद्यार्थी आणि इयत्ता सहावी ते दहावी विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा घेतली जाते. या स्पर्धेत सन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधीत तीन लाख १६ हजार ५९२ इतके विद्यार्थी सहभागी झाले असून, त्यापैकी ९४४४ इतक्या विद्यार्थ्यांनी पारितोषिके प्राप्त केली आहेत. या स्पर्धांसाठी १७ लाख ९३ हजार रुपयांची पारितोषिके ठेवण्यात आली होती.

## छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती

आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळविण्याच्या दृष्टिकोनातून ही योजना राबविली जाते. छत्रपती शाहू महाराज राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती योजनेंतर्गत सन २०१९ पासून ते २०२३ पर्यंत ३,०७८ विद्यार्थी योजनेसाठी पात्र होते. त्यापैकी ३९४ विद्यार्थ्यांनी पीएचडी पूर्ण केली असून, १०३ विद्यार्थ्यांना नोकरी लागलेली आहे.

## सरसेनापती संताजी घोरपडे उद्योजकता विकास कार्यक्रम

सरसेनापती संताजी घोरपडे सारथी उद्योजकता विकास कार्यक्रमांतर्गत इनक्युबेशन हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. या माध्यमातून स्टार्टअप कल्पनांना मूर्तरूप देण्यासाठी व्यवसाय मार्गदर्शन व विद्यावेतन स्वरूपात आर्थिक साहाय्य दिले जाते. महाराष्ट्रातील शासनमान्य यादीपैकी १३ इनक्युबेशन केंद्रांनी सारथी संस्थेबाबत सामंजस्य करार केला आहे. सारथीमार्फत लाभार्थ्यांना एक वर्षासाठी इनक्युबेशन केंद्राकडे प्रायोजित केले जाते. सन २०२५ या वर्षी १२० लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला.

## सोयी–सुविधायुक्त छत्रपती शिवाजी महाराज संकुल

सारथी संस्थेमार्फत पात्र विद्यार्थ्यांना प्राधान्याने सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी राज्यभरात छत्रपती शिवाजी महाराज संकुल उभारण्यात येत आहेत. या इमारत बांधकामासाठी शासनाने मोफत जमिनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. प्रत्येक संकुलामध्ये ५०० मुलांचे वसतिगृह, ५०० मुलींचे वसतिगृह, ३०० विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका, सारथी विभागीय कार्यालयांचा समावेश आहे. सारथीच्या पुणे येथील मुख्यालयाचे बांधकाम पूर्ण झाले असून नवीन इमारतीमध्ये प्रशासकीय कामकाज सुरू झाले आहे. इतर विभागीय कार्यालयांची कामे प्रगतिपथावर असून लवकरात लवकर ती पूर्ण करण्यात येत आहेत. विभागीय कार्यालय पुणे, सारथी उपकेंद्र कोल्हापूर, विभागीय कार्यालय खारघर नवी मुंबई, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, सारथी उपकेंद्र लातूर, विभागीय कार्यालय नागपूर, अमरावती यासाठी आठ जिल्ह्यांमध्ये वसतिगृह, अभ्यासिका, कौशल्य विकास केंद्रे उभारण्यात येणार आहेत.

### ‘सारथी’ची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी विविध उपक्रम

सारथीच्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी सारथीचे संकेतस्थळ https://www.sarthi-maharashtragov.in/ सारथी अँड्रॉइड ॲप्लिकेशन https://play.google.com/store/apps/details?id=com.srthinew, फेसबुक पेज facebook.com/sarthimaharashtra, यु-ट्यूब चॅनल sarthipune178, इंस्टाग्राम अकाऊंट https://www.instrgram.com/sarthi.pune?igsh=MTjob3g5MzNneXdoO-== आणि सारथी व्हॉट्सॲप चॅनेल https://whatsapp.com/channel/0029VaELiPmJUM2hyekQ6R1R सुरू आहे. ज्या द्वारे सारथीच्या योजनांची माहिती सर्वसामान्यांना मिळत आहे. विविध युवा शिबिरे, सारथी दिनदर्शिका वाटप यांसारख्या उपक्रमातून लाभार्थ्यांपर्यंत माहिती पोहोचविण्यात येत आहे.

## नरवीर तानाजी मालुसरे दस्तऐवज जतन योजना

सारथीमार्फत सरनोबत नरवीर तानाजी मालुसरे ऐतिहासिक दस्तऐवज जतन योजना राबवण्यात येत असून यामध्ये छत्रपती शाहू महाराज यांच्या कार्यकाळातील प्रकाशित कागदपत्रे, आदेश, हुकूमनामा इत्यादी दस्तऐवज पुराभिलेख संचालनालयाकडून डिजिटल स्वरूपात प्राप्त केले आहेत. या ऐतिहासिक दस्तऐवजाच्या विषयावर पुस्तके प्रकाशित करण्यात येणार आहेत. सारथी संस्थेमार्फत शिवराज्याभिषेक अभियान, किल्ले संवर्धन, वृक्षारोपण, जनजागृती अभियान राबवण्यात येत आहे. यामध्ये पीएच.डी. करणाऱ्या १,०८६ विद्यार्थ्यांनी एक लाख १८ हजार ८३४ सीड बॉल, तर अधिकारी-कर्मचारी यांनी १३,६०० सीड बॉल तयार केले. हे सीड बॉल २०२४ मध्ये ७५ किल्ल्यांच्या परिसरात टाकण्यात आले. सरदार शिरोजी इंदलकर सारथी किल्ले संवर्धन अभियानांतर्गत ३८ किल्ले व दोन छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यांच्या परिसरात स्वच्छता उपक्रम राबविण्यात आला. यामध्ये ८,५८६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. चावडी वाचन अभियानामध्ये पाच हजार विद्यार्थ्यांद्वारे ग्रामसभांमध्ये योजनांची माहिती प्रसारित करण्यात आली आहे.

मराठा समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत असलेल्या सारथी संस्थेमुळे हजारो विद्यार्थी, शेतकऱ्यांना मार्गदर्शन व शैक्षणिक बळ मिळत आहे. या समाजातील मागास घटकांना सक्षम, स्वावलंबी आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करणारा व नवयुगाची आव्हाने पेलणारा समाज तयार करण्यामध्ये सारथी मोलाची भूमिका बजावत आहे. योग्य शिक्षण, दिशा आणि संधी मिळाल्यास यश मिळवता येते. हे स्वप्न सत्यात उतरवण्याचे काम सारथी संस्था करत आहे. मराठा समाजातील गरजू, होतकरू युवक व युवती या संस्थेच्या माध्यमातून स्पर्धेच्या युगात दरवर्षी मोठ्या प्रमाणात यश संपादन करत आहेत. मराठा समाजातील प्रत्येक घटकाला विकासाच्या समान संधी उपलब्ध करून विकासाच्या प्रवाहात अग्रेसर ठेवणारी सारथी नक्कीच या समाजासाठी एक दीपस्तंभ ठरत आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा सुरू करून समाजाला एकत्र येण्याचा धाडसी मार्ग दाखवला. त्या छोट्या सुरुवातीने आज दीडशे वर्षांचा प्रवास केला आहे. महाराष्ट्र शासनाने या परंपरेला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे, हे गणेशभक्तांसाठी अभिमानाचे पाऊल आहे. यासोबतच शासन निर्णयात राज्य महोत्सवामध्ये अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाज घटकांना सामाजिक सलोख्यासाठी एकत्रित आणणे, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणे, विविध सांस्कृतिक विषयांचे जतन व संवर्धन करण्याला प्राधान्य दिले आहे.**

# गणेशोत्सव आता राज्य महोत्सव

**प्रवीण टाके**

भारतीय संस्कृतीतील सर्वाधिक लोकप्रिय उत्सवांपैकी एक म्हणजे गणेशोत्सव. महाराष्ट्राच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात हा उत्सव जल्लोषात, भक्तिभावात आणि सामूहिकतेच्या भावनेत साजरा होतो. हा सण सर्व समाजात आणि घराघरात लोकप्रिय आहे. या उत्सवाचा इतिहास केवळ धार्मिकतेशी जोडलेला नसून, त्यामध्ये सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि आर्थिक आयामही गुंफलेले आहेत.

लोकमान्य टिळकांनी जुलमी ब्रिटिश सत्तेविरुद्ध जनजागृती व जनतेला संघटित करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची प्रथा सुरू केली. या माध्यमातून सामाजिक एकोपा, संघटनात्मक चळवळी तसेच कला व सांस्कृतिक उपक्रम सुरू करण्याचे त्यांचे धोरण होते. महाराष्ट्र शासनाने आता एक पाऊल पुढे टाकत या गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून मान्यता दिली आहे.

## टिळकांचा दूरदृष्टीपूर्ण निर्णय

लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी १८९३ साली गणेशोत्सवाला सार्वजनिक स्वरूप दिले. त्या काळात ब्रिटिश सत्तेखाली भारतीय समाज उभारी घेऊ शकत नव्हता. सामूहिक संघटनेला दडपशाही होती, परंतु टिळकांनी गणेश उत्सव हा घराघरातील कौटुंबिक वातावरणातून बाहेर आणला आणि त्याला सार्वजनिक व्यासपीठ दिले. हा निर्णय केवळ धार्मिक नव्हता, तर सामाजिक एकात्मता आणि राजकीय जागृती घडवून आणणारा होता. मंदिरात किंवा घरात मर्यादित राहिलेला आनंद लोकांच्या, समूहांच्या विविध जाती-पंथांच्या मान्यतेला उतरला. उत्सवाचे सार्वत्रिकीकरण झाले. पुढे हळूहळू समाजाला एकत्र आणणारा हा उपक्रम बनला.



## गणेशोत्सवाचे प्रादेशिक स्वरूप

महाराष्ट्रातील विविध भागांत गणेशोत्सव वेगवेगळ्या पद्धतींनी साजरा केला जातो. कोकणात हा उत्सव संस्कृतीला उजाळा देणारा असतो. गावी जाऊन कुटुंबासोबत उत्सव साजरा करणे ही कोकणातील वैशिष्ट्यपूर्ण परंपरा आहे. नारळी पौर्णिमा ते विसर्जनापर्यंत निसर्ग, समुद्रकिनारे आणि पारंपरिक घरगुती पूजा यामध्ये एक विलक्षण उत्साह व एकोप्याचे वातावरण अनुभवता येते. या भागातील मूळ कला संस्कृतीची जोपासना व सादरीकरण या काळामध्ये केली जाते. विदर्भ, मराठवाड्यात नाटक, कला, संस्कृती, कविसंमेलन आणि विविध गुण प्रदर्शनांचे आयोजन करणारा महोत्सव म्हणजे गणेश महोत्सव. नागपूर, अमरावती, चंद्रपूर यांसारख्या शहरांमध्ये गणेशोत्सवाला विसर्जन मिरवणुकीला अनेक वर्षांची परंपरा आहे. विदर्भातील अनेक नामवंत व्याख्यानमाला या काळामध्ये आयोजित केल्या जातात. सांस्कृतिक कार्यक्रमांची सर्वाधिक रेलचेल या काळात असते.

पुण्यातील अनेक ऐतिहासिक गणपती मंडळांना १०० वर्षांहून अधिक काळची परंपरा आहे. अनेक मानाची मंडळे आजही परंपरेचे जतन करतात. सांस्कृतिक स्पर्धा, नाटकं, कीर्तनं आणि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम हे वैशिष्ट्य येथे जपले जाते. देश विदेशातील कलाकारांना स्थान देणारे अनेक फेस्टिव्हल, उत्सव, कार्यक्रम या काळात पुण्यामध्ये साजरे होतात. पुण्यातला गणेशोत्सव बघायला देशभरातून नागरिक या काळात पुण्यामध्ये येत असतात.

मुंबई म्हणजे गणेशोत्सवाचा महासागर, गिरगावातून सुरू झालेला हा सार्वजनिक उपक्रम या महानगराची ओळख झाला आहे. चाकरमान्यांची सुट्टी, बाजारपेठेत वाढलेली उलाढाल आणि कला-उद्योगाला मिळणारी चालना यामुळे मुंबईतील गणेशोत्सवाला खास आर्थिक महत्त्व आहे. महाराष्ट्रातील सिने, नाट्य कलावंतांचे शहर असणाऱ्या मुंबईमध्ये कला जगतानेदेखील गणेश उत्सवाला चालना दिली आहे. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानीदेखील या काळात बाप्पा

विराजमान असतात. प्रत्येक सोसायटीत होणारा गणेशोत्सव, सार्वजनिक सहभागाचे आदर्श उदाहरण ठरते. शिवाय सांस्कृतिक देवाणघेवाण आणि देशभराच्या खाद्य संस्कृतीलाही चालना मिळते.

### धार्मिकतेपासून आनंदोत्सवापर्यंत

गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे पूजा किंवा कर्मकांडामध्ये कोणतीही अनिवार्यता नाही. कोणत्याही जाती, धर्मातील व्यक्ती या उत्सवात सहभागी होऊ शकतात. म्हणूनच हा उत्सव एका धार्मिक मर्यादेपलीकडे जाऊन सामूहिक वार्षिक आनंदोत्सवाचे स्वरूप धारण करतो. दीड दिवस, अडीच दिवस, पाच दिवस, दहा दिवस अशा विविध कालावधीत हा उत्सव आपआपल्या पद्धतीने साजरा केला जातो. शेकडो बालगणेश मंडळे, सार्वजनिक कार्यक्रमांच्या बीजारोपणासाठी प्रेरणास्रोत होऊन जातात. मुलांमध्ये संघटन शक्ती, कला, कौशल्य, नेतृत्वविकासासाठी हा महोत्सव पुढे येतो. महाराष्ट्रामध्ये घडलेल्या शेकडो कलाकारांना गणेश महोत्सवाच्या व्यासपीठानेच पहिली संधी दिली आहे. हा जागर आताही कायम आहे.

### समाजप्रबोधनाचे व्यासपीठ

गेल्या १०० वर्षांत गणेशोत्सवाने हजारो कलाकार, कवी, नकलाकार, दिग्दर्शक, नेपथ्यकार, शिल्पकार यांना व्यासपीठ दिले. सामाजिक समस्यांवर देखावे, शैक्षणिक संदेश, पर्यावरणपूरक मूर्ती यामुळे या उत्सवात जागरूकता आणि प्रबोधन घडते. गणेशोत्सव हे नेतृत्व विकसित करणारी शाळाच म्हणावी लागेल. स्वयंसेवकांचे संघटन, व्यवस्थापन, आर्थिक नियोजन, सार्वजनिक कार्यक्रमांचे आयोजन या सर्व गोष्टी किशोरवयातील शाळकरी मुलांना, तरुणांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देतात.

### शासन निर्णय : राज्य उत्सवाचा दर्जा

गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक ओळखीचा अविभाज्य भाग बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने २०२५ पासून गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री यांनी विधिमंडळात १८ जुलैला या संदर्भातील घोषणा केली. हा निर्णय घेताना राज्य शासनाने सांस्कृतिक कार्य संचालनालय, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, दादासाहेब फाळके चित्रनगरी गोरेगाव; तसेच प्रत्येक जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांनाही कार्य विभागून दिले आहे.

राज्य शासनाने आपल्या शासन निर्णयात राज्य महोत्सवामध्ये अधिकाधिक व्यक्ती, संस्था आणि विविध समाजघटकांना सामाजिक सलोख्यासाठी एकत्रित आणणे, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील गणेशोत्सवाला प्रोत्साहन देणे, विविध सांस्कृतिक विषयांचे जतन व संवर्धन करण्याला प्राधान्य दिले आहे. राज्य महोत्सवांतर्गत उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांना तालुका, जिल्हा व राज्यस्तरावर पुरस्कृत करण्याचे नियोजनही राज्य शासनाने केले आहे. राज्यस्तरीय सोहळा आयोजित करण्याची जबाबदारी पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीला दिली आहे. विविध स्पर्धांसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले आहे.

### पर्यावरणपूरकतेला प्राधान्य

राज्य महोत्सवामुळे गणेशोत्सवातील विधायकतेला महत्त्व आले आहे. राज्य शासनाने या उत्सवात आपला सहभाग अधिक सक्रिय केल्यामुळे आता ध्वनी, वायू, जल प्रदूषणविरहित परिसर, एक गाव एक गणपतीसारख्या उपक्रमाला प्रोत्साहन, यासोबतच पर्यावरणपूरक मूर्तीसह सजावट व आयोजनातून पर्यावरणाला कोणताही धोका होणार नाही, याची काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. शाडू मातीच्या मूर्ती, विसर्जनासाठी कृत्रिम तलाव, हरित उत्सव अशा उपक्रमांना शासनाकडून सहकार्य दिले जात आहे. शिल्पकार, नृत्य, नाटक, संगीत, चित्रकला या क्षेत्रांतील कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यस्तरीय योजना राबवण्यात येत आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत भजनी मंडळांना अनुदान, राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या गणेश उत्सवांना प्रोत्साहन हे कार्य महत्त्वपूर्ण ठरत आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे यामध्ये जिल्हाधिकारी यांनादेखील अधिकार देण्यात आले आहे. गणेश महोत्सवासाठी तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय समित्या गठित करण्यात आल्या आहेत. यामुळे सर्व गणेश मंडळांशी जिल्हाधिकाऱ्यांचा अधिक व्यापक संपर्क होणार असून, या महोत्सवाची सार्वजनिक उपयुक्तता व पर्यावरणपूरकता वाढविण्यात येत आहे. या निर्णयामुळे गणेशोत्सवाची परंपरा मर्यादित न राहता संपूर्ण राज्याच्या ओळखीचा आणि अभिमानाचा उत्सव म्हणून गौरविला गेला आहे.

### महाराष्ट्राबाहेर गणेशोत्सव

कधीकाळी केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित असलेला गणेशोत्सव आज देशासोबतच विदेशातही पोहोचला आहे. कर्नाटक, गोवा, गुजरात, मध्य प्रदेश, दिल्ली अशा ठिकाणी मराठी समाजाच्या प्रेरणेने गणेशोत्सव सार्वजनिकरीत्या साजरा होतो. विशेष म्हणजे, मुंबई वा पुण्यात राहणारा इतर राज्यातील कामगार, व्यापारी किंवा कर्मचारी हा उत्सव अनुभवतो आणि आपल्या गावी जाऊन त्याची परंपरा नेतो. अशा प्रकारे गणेशोत्सवाने राष्ट्रीय स्तरावर सामूहिकतेचे बंध निर्माण केले आहेत.

लोकमान्य टिळकांनी १८९३ मध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची परंपरा सुरू करून समाजाला एकत्र येण्याचा धाडसी मार्ग दाखवला. त्या छोट्या सुरुवातीने आज दीडशे वर्षांचा प्रवास केला आहे. महाराष्ट्र शासनाने या परंपरेला राज्योत्सवाचा दर्जा दिला आहे, हे गणेशभक्तांसाठी अभिमानाचे पाऊल आहे. गणेशोत्सव आता केवळ धार्मिक श्रद्धेपुरता न राहता, तो कला, संस्कृती, समाजजागृती, नेतृत्व आणि आर्थिक चैतन्याचा अविभाज्य भाग बनला आहे. टिळकांचा हा वारसा आज राज्याच्या गौरवाचा उत्सव बनला आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने गणपती बाप्पा मोरया!

(उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर.)

**राष्ट्राची खरी ताकद समाजातील प्रत्येक घटकाच्या आरोग्य, शिक्षण आणि सक्षमीकरणात असते. समाजाच्या केंद्रस्थानी असलेल्या महिलांचे आरोग्य, शिक्षण आणि स्वावलंबन हे संपूर्ण राष्ट्राच्या विकासाचे मूलभूत स्तंभ आहेत. कारण महिला ही केवळ कुटुंबाची धुरीण नसून समाजाची आणि भावी पिढ्यांची घडण घडविणारी शिल्पकार आहे. म्हणूनच स्वस्थ नारी – सशक्त परिवार हे ध्येय केवळ एक घोषवाक्य नसून विकसित भारताचा आराखडा आहे.**

# स्वस्थ नारी, सशक्त परिवार!

**संजय ओरके**

केंद्र सरकारने १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ या पंधरवड्यात संपूर्ण देशभर 'स्वस्थ नारी, सशक्त परिवार' हे अभियान राबविण्याचा निर्णय घेतला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसाच्या औचित्याने मध्यप्रदेशातील धार येथून या अभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ झाला. हे केवळ औपचारिक उद्घाटन नव्हते, तर महिलांच्या निरोगी आरोग्याच्या दिशेने देशव्यापी जनआंदोलनाची सुरुवात आहे.

## राज्यस्तरीय शुभारंभ

राज्यात या अभियानाचा शुभारंभ उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण केंद्र, मुंबई येथे झाला. या प्रसंगी आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव, केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांसारखे मान्यवर उपस्थित होते. शुभारंभावेळी राज्यातील विविध जिल्ह्यांमधून आलेल्या महिलांनी, आरोग्य सेवकांनी आणि स्वयंसेवी संस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.




## अभियानाचा उद्देश

या अभियानाचा प्रमुख उद्देश महिलांच्या आरोग्याकडे संपूर्ण दृष्टिकोनातून पाहणे, त्यांना योग्य वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देणे, त्यांचे पोषण व मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी ठोस पावले उचलणे आणि त्यामुळे सक्षम कुटुंबे व सक्षम समाज तयार करणे हा आहे. आरोग्यपूर्ण महिला म्हणजे आरोग्यपूर्ण परिवार. आरोग्यपूर्ण परिवार म्हणजे प्रगतीकडे वाटचाल करणारा समाज. आणि असा समाजच विकसित भारताची पायाभरणी करू शकतो.

## अभियानाची प्रमुख वैशिष्ट्ये

या अभियानात महिलांच्या आरोग्याकडे एकात्मिक दृष्टिकोनातून पाहिले जाते. भारतात वाढत्या जीवनशैलीजन्य आजारांचा विचार करता हृदयरोग व मधुमेह तपासणीची मोठी आवश्यकता आहे. यासोबतच महिलांमध्ये स्तन व गर्भाशय मुख कर्करोगाचे प्रमाण वाढत असल्याने याबाबत लवकर शोध लावल्यास त्यावरील उपचार सहज शक्य होतात. भारताने २०२५ पर्यंत क्षयरोग निर्मूलनाचे ध्येय ठेवले आहे, त्यासाठी महिलांची तपासणी महत्त्वाची आहे. किशोरवयीन मुली व महिलांमध्ये रक्तक्षय मोठ्या प्रमाणावर आढळतो. यावर उपाय म्हणून लोहयुक्त आहाराविषयी मार्गदर्शन, पूरक गोळ्या देणे, समुपदेशन इत्यादी उपक्रम राबवले जात आहेत. आदिवासी भागांमध्ये हा आजार मोठ्या प्रमाणावर असल्याने विशेष शिबिरे आयोजित केली जात आहेत.

## माता व बाल आरोग्य सेवा

कुटुंबाच्या आरोग्याचा पाया म्हणजे माता आणि बालकांचे आरोग्य. गर्भवती महिलांची प्रसूतीपूर्व तपासणी, हिमोग्लोबिन तपासणी आणि योग्य आहाराविषयी मार्गदर्शन, बालकांचे नियमित लसीकरण, त्यांचा वाढीचा वेग

तपासणे स्तनपानाविषयी जनजागृती, मातांना पोषणपूरक आहाराविषयी सल्ला देणे.

### आयुष सेवा

भारतीय पारंपरिक वैद्यकशास्त्रालाही या अभियानात योग्य स्थान देण्यात आले आहे. योग व प्राणायाम शिबिरे आयुर्वेद व होमिओपॅथी उपचार सल्लामसलत निसर्गोपचार पद्धतीद्वारे तणाव कमी करणे यावरदेखील भर देण्यात येत आहे.

### पोषण संवर्धन आणि जनजागृती

किशोरवयीन मुलींसाठी मासिक पाळी स्वच्छतेवर सत्रे, महिला बचतगटांमार्फत पोषण जनजागृती, व्यसनमुक्ती आणि मानसिक आरोग्यविषयक समुपदेशन, गावपातळीवर आरोग्य मेळावे व चर्चासत्रे.

### रक्तदान शिबिरे

१ ऑक्टोबर या राष्ट्रीय स्वेच्छा रक्तदान दिनानिमित्त १ लाख युनिट रक्तसंकलनाचे लक्ष्य निश्चित करण्यात आले. रक्तदानाचे सामाजिक महत्त्व लक्षात घेऊन अधिकाधिक तरुणांना सहभागी करून घेण्याचा प्रयत्न होत आहे.

### डिजिटल आरोग्य नोंदी


आयुष्मान भारत डिजिटल मिशन अंतर्गत प्रत्येक व्यक्तीची आरोग्य आयडी तयार केली जात आहे. ज्यामुळे भविष्यात उपचारप्रक्रियेत सुलभता येणार आहे.

### क्षयरोग निर्मूलन

‘क्षयरोग मित्र’ स्वयंसेवकांची नोंदणी करून क्षयरुग्णांना पोषण साहाय्य दिले जात आहे. ही संकल्पना समाजातील जबाबदारीची भावना बळकट करते.

### महाराष्ट्रातील ७५ विशेष उपक्रम

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्रात तब्बल ७५ पेक्षा अधिक आरोग्यविषयक उपक्रम राबवले जात आहेत. ग्रामीण व शहरी आरोग्य केंद्रांमध्ये आरोग्य शिबिरे, मधुमेह, हृदयरोग, कर्करोग तपासणी, नेत्र तपासणी




व मोफत चष्मे वाटप, दंत तपासणी व मोफत उपचार, माता व बाल आरोग्य शिबिरे, योग व आयुष शिबिरे, रक्तदान व अवयवदान प्रोत्साहन कार्यक्रम, मोफत औषध वितरण व प्रयोगशाळा तपासण्या, मानसिक आरोग्य समुपदेशन व व्यसनमुक्ती मोहिमा, शालेय आरोग्य तपासणी व स्वच्छता अभियान या सर्व उपक्रमात १०,७६६ उपकेंद्रे, १९३९ प्राथमिक आरोग्य केंद्रे, ७९७ शहरी प्राथमिक आरोग्य केंद्रे, १०४० समुदाय आरोग्य केंद्रे, जिल्हा व उपजिल्हा रुग्णालये, खासगी रुग्णालये आणि स्वयंसेवी संस्था यांचा सक्रिय सहभाग आहे.

या अभियानामुळे महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढणार असून आजारांचे लवकर निदान होऊन उपचार वेळेत सुरू होतील. आरोग्यविषयक राबविण्यात येणाऱ्या मोहिमांना वेग येईल. तसेच रक्तदान, अवयवदानासारख्या उपक्रमात समाजाचा मोठा सहभाग होणार आहे.

‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ हे केवळ आरोग्य अभियान नाही, तर एक सामाजिक चळवळ आहे जी महिलांना शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या सबळ बनवते. केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, स्वयंसेवी संस्था आणि जनतेच्या एकत्रित प्रयत्नांतून हे अभियान निश्चितच यशस्वी होईल आणि विकसित भारताच्या दिशेने एक भक्कम पाऊल पडेल.

**(माहिती अधिकारी, डहाणू.)**

**भौगोलिकदृष्ट्या भारताचे हृदय अर्थात झिरो माईल्सचे शहर व मध्य भारतातील सर्वात मोठे, महाराष्ट्राची उपराजधानी, टायगर कॅपिटल, विदर्भाचे मुख्यालय आणि राज्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे शहर आदी बिरुदावल्यांसह गौरवशाली सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, राजकीय व संस्कृतिक वारसा असणारे नागपूर शहर. नागपूरसह विदर्भाला प्रगतिपथावर घेऊन जाण्यासाठी 'नवीन नागपूर' या महत्त्वाकांक्षी आंतरराष्ट्रीय व्यवसाय व वित्तीय केंद्र उभारणीच्या दिशेने नुकतेच महत्त्वाचे निर्णय व सामंजस्य करार झाले आहेत. या प्रकल्पाचे नामाभिधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.**

# मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतील 'नवीन नागपूर'च्या निर्मितीकडे!

**रितेश भुयार**

महाराष्ट्र राज्याने विविध क्षेत्रात विकासाची घोडदौड सुरू ठेवली आहे. राज्यातील शहरी व ग्रामीण भागाच्या विकासाचा समतोल साधण्यासही यात प्राधान्य आहे. महाराष्ट्राचा औद्योगिक त्रिकोण, पुणे येथे आयटी क्षेत्राची भरभराट तसेच कोकण, नाशिक, कोल्हापूर, छत्रपती संभाजीनगर, नागपूर येथील औद्योगिक विकासातून त्या-त्या भागातील उद्योगांना चालना देण्याचे कार्यही जोमाने सुरू आहे. नवे आव्हान व नव्या संधी यांची सांगड घालत नव्या युगाच्या अपेक्षांना पूर्ण करून विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्याच्या दिशेने महाराष्ट्रानेही आपली जबाबदारी स्वीकारली आहे. याच दिशेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात अग्रेसर होत नागपूरसह विदर्भाला प्रगतिपथावर घेऊन जाण्यासाठी 'नवीन नागपूर' या महत्त्वाकांक्षी आंतरराष्ट्रीय व्यवसाय व वित्तीय केंद्र उभारणीच्या दिशेने नुकतेच महत्त्वाचे निर्णय व सामंजस्य करार झाले आहेत. या प्रकल्पाचे नामाभिधान मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले आणि त्यांच्याच अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ बैठकीत प्रकल्पास मंजुरी मिळाली आणि त्यांच्याच उपस्थितीत ६,५०० कोटींचा सामंजस्य करारही झाला. विदर्भासह महाराष्ट्राला विकासाच्या मार्गावर पुढे घेऊन जाण्यासाठी हा प्रकल्प मैलाचा दगड ठरणार आहे. देशातील एक अत्याधुनिक आणि जागतिक पातळीवरील वित्तीय व व्यवसाय केंद्र बनण्याच्या दिशेने पडलेले हे एक निर्णायक पाऊल आहे. नागपूरच्या आर्थिक नकाशावर हा प्रकल्प गेमचेंजर ठरणार आहे.

भौगोलिकदृष्ट्या भारताचे हृदय अर्थात झिरो माईल्सचे शहर व मध्य भारतातील सर्वात मोठे, महाराष्ट्राची उपराजधानी, टायगर कॅपिटल, विदर्भाचे मुख्यालय आणि राज्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने तिसऱ्या क्रमांकाचे शहर आदी बिरुदावल्यांसह गौरवशाली सामाजिक, आर्थिक, ऐतिहासिक, राजकीय व संस्कृतिक वारसा असणारे नागपूर शहर आता समृद्धी महामार्गाचा झिरो माईल, मेट्रो ट्रेन, ग्रीन बसेस, उड्डानपूल, एलिवेटेड मार्ग, विमानतळ आणि रेल्वेसह सर्वोत्तम वैद्यकीय सुविधा, महत्त्वाची प्रशासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्थांनी समृद्ध झाले आहे. देशातील पहिले प्रायोगिक तत्त्वावरील स्मार्ट व इंटेलिजंट गाव उभारण्याचा मानही नागपूरला नुकताच मिळाला आहे. याच श्रृंखलेत शहराच्या विकासाला गती देत जागतिक दर्जाच्या सुविधांनी युक्त असे महत्त्वाचे व्यवसाय व वित्तीय केंद्र बनण्याच्या दिशेने 'नवीन नागपूर'च्या रूपाने महत्त्वाचे पाऊल टाकले गेले आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या द्रष्ट्या नेतृत्व व मार्गदर्शनात नागपूरला कॉर्पोरेट ऑफिसेसचे राष्ट्रीय केंद्र बनविण्यासह व्यवसाय, निवासी आणि सामाजिक बाबींचा अंतर्भाव असलेल्या जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधा निर्माण करणे; तसेच शहराला मध्य भारतातील तंत्रज्ञान व नवोपक्रम केंद्र म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने 'नवीन नागपूर' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाची उभारणी होत आहे. महाराष्ट्रातील भावी आंतरराष्ट्रीय व्यवसाय आणि वित्तीय केंद्र (आयबीएफसी) म्हणून नवीन नागपूर या भव्य प्रकल्पासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ८ सप्टेंबर २०२५ रोजी नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरण (एनएमआरडीए) आणि केंद्र शासनाच्या नवरत्न दर्जाच्या राष्ट्रीय इमारत बांधकाम महामंडळ लिमिटेड (एनबीसीसी-इंडिया लि.) व गृह आणि नगर विकास महामंडळ लिमिटेड (हुडको) यांच्यात दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले.

एनएमआरडीए आणि एनबीसीसी (इंडिया) लि. यांच्यात झालेल्या करारानुसार एकूण १,७१० एकरावरील ग्रीन फिल्ड कृषी जमिनीवर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. प्रती पाच वर्षांनुसार एकूण तीन टप्प्यात या प्रकल्पाच्या विकासासाठी १,००० एकर जमिनीचा उपयोग करण्यात येणार असून, उर्वरित ७१० एकर जमीन भविष्यातील विस्तारासाठी राखीव ठेवण्यात येणार आहे. हा विकास प्लग-ॲण्ड-प्ले मॉडेलवर आधारित असेल. यात समाविष्ट होणाऱ्या सुविधांमध्ये समाकलित भूमिगत उपयुक्तता टनेल्स, डिस्ट्रिक्ट कूलिंग सिस्टम, स्वयंचलित कचरा संकलन व वर्गीकरण प्रकल्प, स्टार्ट-अप्स, एमएसएमई, आयटी कंपन्या, व्यावसायिक केंद्रे; तसेच निवासी व मिश्र वापर प्रकल्प यांचा समावेश आहे. यासाठी एनएमआरडीएच्या आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक सक्षम समिती स्थापन करण्यात येणार आहे.

दुसरा महत्त्वाचा करार एनएमआरडीए आणि हुडको यांच्यात करण्यात आला. या करारांतर्गत हुडको ६,५०० कोटी रुपये नवीन नागपूर प्रकल्पाच्या भूसंपादनासाठी देण्यात आले आहे. या निधीमुळे हा प्रकल्प वेगाने आकार घेणार आहे व या भागीदारीत कार्यशाळा, प्रशिक्षण व क्षमतावृद्धी कार्यक्रमांचाही समावेश आहे.

नागपूर महानगर प्रदेशांतर्गत हिंगणा तहसिलच्या लाडगाव-रिठी आणि गोधणी-रिठी परिसरात समृद्धी महामार्गालगतच्या एकूण १,७१० एकरावरील ग्रीन फिल्ड कृषी जमिनीवर बाह्य रिंगरोड पासून दोन कि.मी. अंतरावर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. प्रती पाच वर्षांनुसार एकूण तीन टप्प्यात या प्रकल्पाच्या विकासासाठी १,००० एकर जमिनीचा उपयोग करण्यात येणार असून उर्वरित ७१० एकर जमीन भविष्यातील विस्तारासाठी वापरण्यात येणार आहे. दळणवळणाच्या दृष्टीने हा प्रकल्प समृद्धी महामार्गाला लागून आंतरराष्ट्रीय विमानतळापासून १५ मिनिटांच्या तर रेल्वे स्थानकापासून ३० मिनिटांच्या अंतरावर, तर लवकरच विस्तारित मेट्रो मार्गाच्या लगत असणार आहे.

## कॉर्पोरेट क्षेत्रासाठी कुशल मनुष्यबळ

राज्याचे ज्ञान कॉरिडॉर म्हणून हा प्रकल्प नावारूपाला येणार आहे. भौगोलिकदृष्ट्या लगत असल्याने नागपूरच्या परिसरातील ४१ अभियांत्रिकी महाविद्यालये, २८ खासगी शैक्षणिक संस्था, सर्वात जास्त अभियांत्रिकी महाविद्यालये असणारा राज्यातील दुसऱ्या क्रमांकाचा विभाग व त्यामुळे येथील विद्यार्थ्यांना नोकरीची नामी संधी असणार आहे. महत्त्वाचे म्हणजे विदर्भातून वर्षाकाठी अभियांत्रिकी पदवी घेऊन उत्तीर्ण होणाऱ्या जवळपास १६,००० विद्यार्थ्यांनाही यातून संधीची दारे उघडी होणार आहेत. भरीस भर म्हणून या प्रकल्पासाठी नागपुरातील आयआयएम, एम्स, ट्रीपल आयआयटी, व्हिएनआयटी, व्यवस्थापन व तंत्रज्ञान संस्था (आयएमटी), महाराष्ट्र राष्ट्रीय विधि विद्यापीठ (एन. एल.यु.) यांच्यासह निम्स व सिम्बॉयसिस या भारतीय व जागतिक शैक्षणिक संस्थांसोबत करार करण्यात येणार आहे.

## डिजिटल समाधान व एकल खिडकी मंजुरी

या प्रकल्पात समाविष्ट होण्यासाठी कॉर्पोरेट क्षेत्र आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग; तसेच स्टार्टअप्सचे एकाच ठिकाणी डिजिटल समाधान होणार असून एकल खिडकी मंजुरी मिळणार आहे. या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध मान्यता, आंतरराष्ट्रीय व्यापार व आर्थिक केंद्र (आयबीएफसी) मंजुरी; तसेच आरबीआय, सेबी आणि इरडईकडून ना हरकत प्रमाणपत्र, जीएसटी नोंदणी, अर्जाची रियल टाईम स्थिती, शुल्काचा ऑनलाईन भरणा आणि पॅन, डिन व सीन यांचे रियल टाईम पडताळणी एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. विविध मान्यता सुलभ होण्यासाठी नगर रचना, वीज व सार्वजनिक सुविधा, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (आवश्यक पर्यावरणीय मंजुरी), कामगार व कर विभाग, ऊर्जा विभाग आणि नोंदणी, मुद्रांक व महसूल विभागाच्या सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत.

## प्रकल्पातील महत्त्वाचे टप्पे

या प्रकल्पाच्या उभारणीसाठी नोव्हेंबर २०२४ मध्ये गुजरात राज्यातील गांधीनगर जिल्ह्यातील गिफ्ट इंटरनॅशनल फायनान्शियल सर्व्हिसेस सेंटर (गिफ्ट सिटी), बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स मुंबई आणि पंजाब राज्यातील मोहाली येथील आयटी सिटी तथा स्टार्टअप हबला भेटी देऊन पाहणी करण्यात आली. डिसेंबर २०२४ मध्ये नागपूर विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी आणि नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता यांच्या समक्ष प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूल मंत्री तथा नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रकल्पास प्राथमिक मान्यता दिली. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला 'नवीन नागपूर' हे समर्पक नाव दस्तूरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २५ फेब्रुवारी २०२५ रोजी दिले. या सर्व प्रकल्प उभारणीसाठी आर्थिक पाठबळ मिळण्याबाबत एप्रिल-मे २०२५ मध्ये केंद्र शासनाच्या नवरत्न दर्जाच्या राष्ट्रीय इमारत बांधकाम महामंडळ लिमिटेड (एनबीसीसी-इंडिया लि.) आणि गृह व नगरविकास महामंडळ लिमिटेड (हुडको लि.) यांच्यासोबत प्राथमिक स्तरावरील बैठका पार पडल्या.

जून महिन्यात या प्रकल्पास गती



देण्याच्या दृष्टीने महत्त्वाच्या घडामोडी घडल्या. त्यानुसार नागपूर महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाने (एनएमआरडीए) महाराष्ट्र प्रादेशिक आणि नगर रचना कायद्याच्या कलम ३७ अंतर्गत नवीन नागपूरसाठी भूमी आरक्षित करण्यास मंजुरी दिली. २४ जून २०२५ रोजी राजपत्र प्रकाशित करण्यात आले व स्थानिक वृत्तपत्रामध्येही ते प्रसिद्ध झाले. याअंतर्गत याबाबत ७/१२ उताऱ्यावरून एकूण ७३८ व्यक्तिगत सूचना देण्यात आल्या. याच महिन्यात प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार संस्था म्हणून एनबीसीसीची चार टक्के शुल्काने नेमणूक करण्यात आली व हुडकोला ८.६० टक्के त्रैमासिक व्याजदराने निधी उपलब्ध करून देण्याबाबत मान्यता देण्यात आली. जुलै २०२५ मध्ये विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्था, नागपूर (व्हीएनआयटी)च्या मदतीने सामाजिक व पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन अभ्यास करण्यात आला. याच महिन्यात हुडकोने या प्रकल्पासाठी भूमी अधिग्रहणाकरिता ८.६० टक्के व्याजदराने तीन हजार कोटींच्या निधीस मंजुरी दिली. या सर्वांचा परिपाक म्हणून ३ सप्टेंबर २०२५ रोजी राज्याच्या मंत्रिमंडळात या प्रकल्पास मंजुरी देण्यात आली. येथून पाच दिवसांनी म्हणजे ८ सप्टेंबर २०२५ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नवीन नागपूरच्या विकासासाठी एनएमआरडीए, एनबीसीसी आणि हुडको यांच्या दरम्यान दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार झाले.

## अंदाजित ५ लाख कामकरी आणि एक लाख रोजगार

'नवीन नागपूर' हा प्रकल्प एकूण ६९२ हेक्टर (१,७१० एकर) परिसरात उभारला जाणार असून येथे एक लाख निवासी, तर पाच लाख कामकरी असण्याचा; तसेच जवळपास १५ अब्ज अमेरिकन डॉलर अर्थ निर्मितीचा अंदाज आहे. एकूण उपलब्ध क्षेत्रापैकी ४५ टक्के क्षेत्र व्यावसायिक कार्यासाठी, २० टक्के क्षेत्र दळणवळणासाठी तर निवास, सेवा-सुविधा आणि हरित व मोकळ्या क्षेत्रासाठी प्रत्येकी १० टक्के भूभागाचा उपयोग होणार आहे. तसेच पाच टक्के क्षेत्रावर सामाजिक पायाभूत सुविधा उभारण्यात येणार आहेत.

प्रकल्पाद्वारे सुरुवातीच्या पाच वर्षांपर्यंत सरासरी प्रतिवर्षी २५,७२१ लोकांना रोजगार उपलब्ध होणार आहे. सरासरी ३० हजार मासिक वेतनानुसार १८,५१९ कोटी रुपये वेतनावर खर्ची पडणार आहेत. एकूण प्रकल्पापैकी ४५ टक्के म्हणजेच ४५० एकर भूमी ही व्यावसायिक परिसर म्हणून वापरण्यात येणार असून येथे २०,९१६ कार्यालये उभारण्यात येणार आहेत. रिअल इस्टेट क्षेत्रामध्ये जवळपास ७४ हजार कोटींची गुंतवणूक होऊ शकेल. कॉर्पोरेट क्षेत्र आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग; तसेच स्टार्टअप्स यांची योग्य सांगड घालण्यात येणार आहे. याअंतर्गत कॉर्पोरेट क्षेत्रासाठी ५० टक्के, तर सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी ३० टक्के विभागणी होऊन मॉड्युलर युनिटसह बिझनेस पार्क उभारण्यात येईल आणि १०० टक्के प्लग-ॲण्ड-प्ले को वर्किंग स्पेसनुसार २० टक्के क्षेत्र स्टार्टअप्ससाठी देण्यात येणार आहे.

## अशी होणार आर्थिक उलाढाल

जागतिक दर्जाचे आर्थिक केंद्र उभारताना योग्य आर्थिक घडी बसविण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. यानुसार पहिल्या पाच वर्षांपर्यंत ९८,८६० कोटींचा महसूल निर्माण होणार आहे. मुख्यत्वे व्यावसायिक युनिट विक्रीच्या माध्यमातून ८४,६८०.६४ कोटी रुपये उभारण्यात येणार आहेत. निवासी युनिट विक्रिद्वारे ११,२९१ कोटी, तर सोयी-सुविधांसाठी २,०९१ कोटी आणि विकास कार्य मंजुरींच्या मोबदल्यात ७९८ कोटींचा महसूल निर्माण होणार आहे. तुलनेत एकूण खर्च ११,३५६ कोटी होणार असून यातील ५७ टक्के खर्च पायाभूत सुविधांवर, २६ टक्के खर्च जमीन अधिग्रहणासाठी, रस्ते निर्माणासाठी ५ टक्के, पर्यावरणीय मंजुरीसाठी एक टक्के आणि सोयी-सुविधांसाठी दोन टक्के खर्च येणार आहे. यासोबतच सल्लागार सेवेसाठी चार टक्के आणि विपणन आणि आकस्मिक खर्चापोटी पाच टक्के खर्च होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दावोस येथील जागतिक आर्थिक परिषदेत नागपूरसह विदर्भामध्ये उद्योग आणण्यासाठी विविध कंपन्यांसोबत केलेले सामंजस्य करार, गडचिरोली जिल्ह्याला विकासाच्या मार्गावर अग्रणी करण्याकरिता घेतलेले निर्णय व त्याची होत असलेली अंमलबजावणी, विदर्भात विमानतळ उभारण्यासाठी घेतलेला सक्रिय पुढाकार आणि नळगंगा-वैनगंगा नदी जोड प्रकल्पाद्वारे विदर्भातील दुष्काळी भागात सिंचनाद्वारे शेतीच्या विकासासाठी घेतलेला पुढाकार आता या विकास प्रवासाला 'नवीन नागपूर' प्रकल्पाच्या माध्यमातून अधिक बळ मिळून विकासाची गती ही वाढणार आहे.

**(माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नागपूर)**

**शालेय शिक्षणाचा विद्यार्थी हा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षणासह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्याचबरोबर शिक्षक आणि शाळांच्या सक्षमीकरणासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत विविध उपक्रम, योजना, उपाययोजना राबविल्या जात आहेत. विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण आनंददायी शिक्षण देण्यावर भर, विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता, आदर्श शाळा / स्मार्ट वर्ग, पवित्र पोर्टलच्या माध्यमातून शिक्षक भरती प्रक्रिया, शाळांमध्ये उत्कृष्ट भौतिक सुविधा, शाळा व्यवस्थापन समितीची पुनर्रचना करून त्यांचे बळकटीकरण अशा विविध निर्णयांचा यामध्ये समावेश आहे.**

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय!

**ब्रिजकिशोर झंवर**

शालेय शिक्षण मंत्री म्हणून पदभार स्वीकारताना विद्यार्थी हेच या विभागाच्या केंद्रस्थानी असतील, याची प्रचिती मंत्री दादाजी भुसे यांनी दाखवून दिली होती. त्यावेळी त्यांच्यासमवेत नाशिक जिल्ह्यातील ५० विद्यार्थी मंत्रालयात उपस्थित होते. मंत्री श्री. भुसे यांच्यामार्फत या विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि अपेक्षा थेट समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. पदभार स्वीकारल्यानंतर शाळांना अचानक भेट देऊन शाळांची वास्तविक स्थिती, अडचणी आणि विद्यार्थ्यांची अध्ययन स्थिती समजून घेण्याचा प्रयत्न मंत्री दादाजी भुसे यांच्याकडून सातत्याने केला जात आहे.

## विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवणारा प्रवेशोत्सव

विद्यार्थ्यांना शाळेत येण्यासाठी प्रोत्साहन मिळावे, त्यांचा उत्साह वाढावा, यासाठी शासनाच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांचे पहिल्या दिवशी स्वागत करण्यात आले. यासाठी संपूर्ण राज्यभर सर्व माध्यमाच्या व व्यवस्थापनाच्या शाळांमध्ये प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. या कार्यक्रमांतर्गत मान्यवरांसह विभागातील अधिकाऱ्यांनी एकूण ६,१८६



शाळांना भेटी दिल्या. विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, खाऊ, शाळा उपयोगी साहित्य वाटप करण्यात आले. अनेक ठिकाणी बैलगाडी, ट्रॅक्टर याद्वारे ढोल-ताशांच्या गजरात लेझीम पथकांच्या संचलनात विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली.

## वैयक्तिक स्वच्छता, आरोग्य तपासणी

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे आरोग्य उत्तम राहावे, यादृष्टीने त्यांच्या वैयक्तिक स्वच्छतेवर भर देण्यात येत आहे. त्याचबरोबर त्यांची आरोग्य तपासणीही गरजेची असल्याने सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राज्यातील सर्व विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी राष्ट्रीय बालस्वास्थ कार्यक्रम राबविला जात आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आरोग्य तपासणीसाठी वर्षभराची दिनदर्शिका तयार करावी आणि शाळांना पूर्वकल्पना देऊन पालकांच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करावी, यासाठी मंत्री दादाजी भुसे यांच्या निर्देशानुसार विभागाच्या वतीने प्रयत्न केले जात आहेत. विद्यार्थ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी विशेष हेल्थ ॲप व हेल्थ कार्ड तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.

## आधार वैधता

विद्यार्थ्यांना भविष्यात विविध शासकीय योजनांचा लाभ मिळावा, स्पर्धा परीक्षा आणि विद्यापीठ परीक्षांमध्ये नोंदणी करताना अडचणी येऊ नयेत, यासाठी सर्व विद्यार्थ्यांच्या आधार क्रमांकाची वैधता तपासून अनिवार्य बायोमेट्रिक अद्ययावतीकरण करण्यात येत आहे. आतापर्यंत यातील सुमारे ९४ टक्के काम पूर्ण झाले आहे.

## सैनिकी शिक्षण

विद्यार्थ्यांना बालवयापासूनच मूल्य शिक्षण, स्वावलंबन, शिस्त, संस्कारांच्या माध्यमातून देशाविषयी आदर निर्माण होणे; तसेच उत्तम भावी नागरिक घडविण्यात एनसीसी, स्काऊट, गाईड या अभ्यासक्रमांची भूमिका महत्त्वपूर्ण आहे.

यासाठी एनसीसीच्या धर्तीवर प्रशिक्षण देण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच इच्छुक विद्यार्थ्यांना स्काऊट गाईडमध्ये सहभागी होता यावे, यासाठी जास्तीत जास्त शाळांमध्ये याची अंमलबजावणी करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शाळेत पहिलीपासून सैनिकी शिक्षण दिले जाणार असून, यासाठी माजी सैनिकांना शाळेत शिकविण्यासाठी संधी दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या मनामनात राष्ट्रप्रेम रुजवणे, अनुशासन, राष्ट्रीयत्व व एकतेची बीजे पेरण्याच्या उद्देशाने सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीपर गीतांवर आधारित कवायत संचलन हा उपक्रम राबविण्यात आला. शाळा ही राष्ट्रनिर्मितीची पहिली पायरी आहे, हे अधोरेखित करणारा आणि विद्यार्थीमनाला मूल्यांची दिशा देणारा असा हा उपक्रम मंत्री दादाजी भुसे यांच्या संकल्पनेतून राबवला गेला.

## मोफत गणवेश योजना

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून केंद्र शासनाच्या समग्र शिक्षा व राज्य शासनाच्या मोफत गणवेश योजनेची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेच शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्याचा निर्णय घेण्यात आला असून गणवेशाचे कापड चांगल्या दर्जाचे असल्याची दक्षता घेण्यात आली.

## सीबीएसई अभ्यासक्रमाशी सुसंगत

राज्यातील सरकारी आणि अनुदानित शाळांमध्ये केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (सीबीएसई) धर्तीवर अभ्यासक्रमाचा पॅटर्न लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला असून राज्य बोर्डाचा अभ्यासक्रम एनसीईआरटी/ सीबीएसई पॅटर्नशी सुसंगत केला जात आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत मराठी भाषा, महाराष्ट्राचा स्थानिक इतिहास, भूगोल, संस्कृती यांचा विशेष पुरवणी अभ्यासक्रम तयार केला जात आहे. याद्वारे राज्यातील स्थानिक ओळख जपली जाईल. राज्यातील राज्यबोर्डाच्या सर्व शाळांमध्ये २०२५-२६ पासून क्रमिक पद्धतीने १२वी पर्यंत टप्प्याटप्प्याने हा अभ्यासक्रम लागू करण्यात येणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार अनुभवजन्य पद्धतीवर विशेष भर दिला जात आहे. याअंतर्गत विद्यार्थी प्रत्यक्ष क्षेत्रभेटी करून शिकत असून हे शिक्षण विद्यार्थ्यांना जीवनाशी जोडणारे ठरणार आहे.

## सीएम श्री शाळा/आदर्श शाळा

पीएम श्री शाळा योजनेच्या धर्तीवर प्रत्येक केंद्रामधून एका शाळेचा सीएम श्री शाळा म्हणून विकास केला जाणार आहे. शाळांना गुणवत्तेनुसार रँकिंग देण्यात येणार असून एका केंद्रात किमान एका शाळेत दहावीपर्यंत शिक्षण व्यवस्था निर्माण करून त्या शाळा आदर्श शाळा, तर त्यातील एक वर्ग स्मार्ट वर्ग केला जाणार आहे.

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजना

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना १२ प्रकारच्या वैविध्यपूर्ण पाककृतींच्या स्वरूपात पोषण आहाराचा लाभ देण्यात येत आहे. या योजनेंतर्गत प्रतिदिन प्रतिलाभार्थी दरामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. सर्व पात्र शाळांमध्ये परसबागा निर्मितीस प्रोत्साहन मिळण्यासाठी परसबागांमध्ये उत्पादित ताज्या भाजीपाल्याचा पोषण आहारामध्ये समावेश करण्याबरोबरच उत्कृष्ट परसबागांमध्ये स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.



## अकरावी ऑनलाइन प्रवेश

प्रवेशात सुलभता, पारदर्शकता आणि सुसूत्रता आणण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इयत्ता ११वी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची व्याप्ती राज्यभर वाढवण्यात आली आहे. या प्रक्रियेद्वारे १३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतला आहे.

## समित्यांचे एकत्रीकरण

शालेय कामकाजासंदर्भात शासनाच्या विविध विभागांनी दिलेल्या निर्देशानुसार शालेयस्तरावर सुमारे १५ समित्या कार्यरत होत्या. या समित्यांचे एकत्रीकरण करून शाळा व्यवस्थापन समिती, सखी सावित्री समिती, महिला तक्रार निवारण / अंतर्गत तक्रार समिती आणि विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकसन समिती अशा केवळ चार समित्यांची स्थापना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामुळे शिक्षकांचे अनावश्यक काम कमी होऊन अध्ययन/ अध्यापन यासाठी पुरेसा वेळ देणे शक्य होत आहे.

## शिक्षक भरती

खासगी अनुदानित शाळेतील शिक्षक भरतीप्रक्रिया पारदर्शक व्हावी आणि शाळेला गुणवत्ताधारक शिक्षक मिळावे यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांतील; तसेच खासगी अनुदानित शाळातील शिक्षकांची भरती अभियोग्यता चाचणी घेऊन पवित्र पोर्टलद्वारे गुणवत्तेनुसार करण्याचा निर्णय घेतलेला आहे. २०१७ पासून पवित्र पोर्टलद्वारे आतापर्यंत ३६,३५१ उमेदवारांची निवड करण्यात आली आहे.

## टप्पा अनुदान मंजूर

राज्यातील खासगी विनाअनुदानित व अंशतः अनुदानित शाळा व तुकड्या व त्यावरील कार्यरत शिक्षक / शिक्षकेतर कर्मचारी यांना टप्पा अनुदान मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये सध्या २० टक्के, ४० टक्के आणि ६० टक्के टप्पा अनुदान घेत असलेल्या शासन मान्य खासगी अंशतः अनुदानित शाळांना २० टक्के अनुदानाचा वाढीव टप्पा निधीसह मंजूर करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शासनस्तरावर अशोषित असलेल्या २३१ पात्र शाळा, ६९५ तुकड्या/ शाखा, आणि २७१४ शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना

२० टक्के अनुदानासाठी पात्र करण्यात आले आहे.

### राज्यगीत गायन सक्तीचे

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. या पार्श्वभूमीवर राज्यात मराठी भाषेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. शाळांमध्येदेखील मराठी भाषा विषय अनिवार्य करण्यात आला असून, सर्व शाळांमध्ये राष्ट्रगीतानंतर राज्यगीत गायन सक्तीचे करण्यात आले आहे.

### शाळाबाह्य मुलांसाठी मोहीम

वीटभट्टीवरील कामगार, ऊसतोड कामगार, शेतीकाम करणारे कामगार आदींच्या शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नियोजन करण्यात येत आहे.

### संस्थाचालक आणि शिक्षकांशी सुसंवाद

संस्थाचालक आणि शिक्षकांचे प्रश्न सोडविण्यासाठी मंत्री दादाजी भुसे यांनी त्यांच्याशी प्रदीर्घ चर्चा करून त्यांच्या समस्या आणि सूचना जाणून घेतल्या आहेत. त्यातून निघालेले सकारात्मक निष्कर्ष स्वीकारून काम केले जात आहे.

### केंद्रप्रमुख भरती

शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी प्रेरक, जागरूक आणि मार्गदर्शक नेतृत्वाची उणीव अनेक शाळा, केंद्रांमध्ये जाणवत होती. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ऐतिहासिक निर्णय घेत महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (सेवा प्रवेश) (सुधारणा) नियम २०२५ ही प्रवेश अधिसूचना प्रकाशित केली आहे. हा निर्णय शिक्षकांसाठी प्रशासकीय नेतृत्वाच्या दिशेने उभारलेला एक सुवर्णपूलच मानावा लागेल. ही सुधारित अधिसूचना शिक्षण व्यवस्थेतील आमूलाग्र परिवर्तनाची सुरुवात असल्याचा विश्वास मंत्री दादाजी भुसे यांनी व्यक्त केला आहे.

### एक पेड माँ के नाम

या मोहिमेची शालेय शिक्षण विभागाच्या वतीने प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. विभागास दिलेल्या ४० लाख वृक्षारोपणाच्या उद्दिष्टापैकी २७ लाखांचे उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे.

### शाळांची बँक

राज्यातील प्रत्येक मुलास दर्जेदार व गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी संपूर्ण आयुष्य शाळा व विद्यार्थी विकासाकरिता देणाऱ्या शिक्षकांच्या अनुभवाचा उपयोग राज्यातील अन्य शाळांना, शिक्षकांना, विद्यार्थ्यांना व पालकांना व्हावा; तसेच इतर शिक्षकांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी या शिक्षकांचा, शैक्षणिक संस्था व शाळांचा गौरव केला जाणार आहे. या शिक्षक आणि संस्थांची कामगिरी इतरांसमोर आदर्श म्हणून मांडली जाईल. आयडॉल शिक्षक व शाळांची बँक तयार करण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत मूल्यमापनाचे निकष ठरविण्यात आले आहेत.

### अंशकालीन निदेशकांची नियुक्ती

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता सहावी ते आठवीमधील अंशकालीन निदेशकांच्या नियुक्तीसंदर्भात सुधारित धोरण निश्चित केले आहे. १०० पेक्षा अधिक विद्यार्थी संख्या असलेल्या शाळांमध्ये कला, शारीरिक शिक्षण व आरोग्य; तसेच कार्यानुभव या विषयांसाठी प्रत्येकी एक अशा तीन अंशकालीन निदेशकांची पदे कायम संवर्गात निर्माण करण्यात येणार आहेत. ही नियुक्तीप्रक्रिया शाळा व्यवस्थापन समितीमार्फत केली जाईल. या निर्णयामुळे शाळांमध्ये कला, क्रीडा व कार्यानुभव या विषयांचे अध्यापन नियमितपणे सुरू राहील, नियुक्तीप्रक्रिया पारदर्शक बनेल आणि शिक्षकांना ठरावीक मानधन मिळाल्याने कार्यात स्थिरता येईल.

### विशेष शिक्षकांचे समायोजन

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी १९७८ पासून एकात्मिक शिक्षण योजना सुरू आहे. त्यानंतर २००९-१० पासून समावेशक शिक्षण योजना (माध्यमिक स्तरावर) लागू झाली. या योजनेंतर्गत जिल्हा समन्वयक, विशेष शिक्षक, फिरते विशेष शिक्षक इ. पदे कार्यरत होती. आता न्यायालयामार्फत राज्यात कार्यरत शिक्षकांपैकी एक शिक्षकावर एक याप्रमाणे ४,८६० पदे विशेष शिक्षकांसाठी राखीव ठेवण्याचे आदेश देण्यात आले होते. यातील २,९६० कार्यरत विशेष शिक्षकांचे समायोजन करण्यात येत आहे. काही जिल्ह्यांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण झाली असून, काही जिल्ह्यांमध्ये ती अंतिम टप्प्यात आहे.

### सिंगापूर अभ्यास दौरा

आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षण क्षेत्रात राबविण्यात येणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची/ योजनांची माहिती घेऊन त्यांची आपल्या राज्यात अंमलबजावणी करण्याची शक्यता पडताळण्यासाठी स्टार्स प्रकल्पांतर्गत सिंगापूर येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला. यामुळे शिक्षक व अधिकाऱ्यांना आंतरराष्ट्रीय शिक्षण पद्धती विषयी थेट शिकण्याची संधी मिळाली. या दौऱ्यानंतर संबंधित ४८ शिक्षकांनी प्रशिक्षण व शाळाभेटीद्वारे जाणून घेतलेले नवीन तंत्रज्ञान आणि पद्धतींची अंमलबजावणी आपल्या दैनंदिन शैक्षणिक कामकाजात करण्यास सुरुवात केली आहे.

### निपुण महाराष्ट्र अभियान

राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० नुसार, प्राथमिक स्तरावर २०२६-२७ पर्यंत पायाभूत भाषिक व गणितीय कौशल्य प्राप्त करण्यास सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले आहे. त्यानुसार पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त करण्यासाठी निपुण महाराष्ट्र अभियानाची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. एकूणच शालेय शिक्षणातील अडचणी दूर करून आणि शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जात आहेत, यासाठी घेण्यात आलेले निर्णय आणि केल्या जात असलेल्या उपाययोजनांमुळे राज्यातील शालेय शिक्षण व्यवस्थेत सकारात्मक बदल होतील, असा विश्वास आहे.

**वरिष्ठ सहायक संचालक**

**नागपूर जिल्ह्यातील अमरावती मार्गावर वसलेलं सातनवरी गाव. लोकसंख्या अवघी १,८७१! गाव लहानसं, आकाराने छोटं वाटणारं हे गाव; पण कामगिरी मात्र इतकी मोठी की, आज संपूर्ण देशाचं लक्ष याच्याकडे लागलं आहे. जिथं अजून अनेक ग्रामीण भाग रस्ते, पाणी, वीज, तंत्रज्ञानाच्या मूलभूत सोयींसाठी धडपडत आहेत, तिथं सातनवरीनं स्वतःची वाट वेगळी करून दाखवली.**

# स्मार्ट व इंटेलिजंट 'सातनवरी'

**बालाजी देवर्जनकर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पायलट प्रकल्पांतर्गत देशातील पहिलं 'स्मार्ट इन्टेलिजंट गाव' म्हणून मिळालेला मान हा फक्त कागदोपत्री टप्पा नाही, तर ग्रामीण भारताच्या भविष्याचं नवं दालन उघडणारं पाऊल आहे. इथल्या शेतकऱ्यांनी, तरुणांनी, महिलांनी मिळून घेतलेला हा बदल म्हणजे गावकुसापुरता मर्यादित न राहता इतर गावांना प्रेरणा देणारा ठरतोय. सातनवरी दाखवून देतेय की, आधुनिक तंत्रज्ञान, शाश्वत विकास आणि सामूहिक प्रयत्नांनी अगदी छोटं गावसुद्धा भारताच्या विकास नकाशावर उजळून निघू शकतं.

## गाव घडतंय, चित्र बदलतंय...

आपल्या डोळ्यांसमोर गाव आलं की, गाव म्हणजे धुळीचे रस्ते, पाणी आणण्यासाठी मैलोन्मैल चालणाऱ्या बाया, बँकेसाठी तालुक्याला धावणारे शेतकरी, औषधांसाठी शहर गाठणारे रुग्ण; पण सातनवरीनं या प्रतिमेला कायमचा पूर्णविराम दिला आहे. आज येथे फायबर-टू-द-होम इंटरनेट आहे, वाय-फाय घराघरात पोहोचतंय, ग्रामपंचायतीपासून शेतापर्यंत तंत्रज्ञानानं हातभार लावला आहे. गावात पाऊल टाकताच जाणवतो तो चेहऱ्यांवरील बदलाचा, आत्मविश्वासाचा आणि भविष्य घडविण्याच्या जिद्दीचा उत्साह. ग्रामस्थ प्रभाकर गोतमारे सांगतात, 'पूर्वी तालुक्याला धावावं लागायचं. आता डॉक्टर, बँक, शाळा सगळं गावात आलंय. खरं सांगू, आमचं गाव आता गाव राहिलेलं नाही, ते भविष्य झालंय.'




## स्मार्ट शेती : ड्रोनपासून सेन्सरपर्यंत

पूर्वी खतं किंवा कीटकनाशकं शेतात फवारणं म्हणजे अक्षरशः पराक्रमी काम! उन्हात तासन्‌तास पाठ काढून चालावं लागे, हातदुखी-डोळ्यांची जळजळ ही रोजचीच. पावसाळ्यात तर चिखलात पाय रुतून कंबर मोडे; पण आता चित्र पूर्ण बदललंय. काही मिनिटांत आकाशात ड्रोन झेप घेतो, शेतभर फेऱ्या मारतो आणि अचूक प्रमाणात फवारणी करून काम संपवतो. कमी वेळ, कमी श्रम आणि जास्त परिणाम. एवढंच नाही, तर मातीची तपासणी करण्यासाठी सेन्सर बसवले आहेत. त्यातून मातीला कोणते पोषणद्रव्य कमी आहेत, किती पाणी द्यायचं, हे सगळं मोबाइलवर समजतं. पाण्याचं नियोजन रिअल टाइममध्ये होतंय, म्हणजे प्रत्येक थेंबाचं योग्य मोल केलं जातंय.

## तरुण शेतकऱ्यांचा नवा अनुभव

तरुण शेतकरी सुशांत तिमाने अभिमानानं सांगतो, 'आधी आम्हाला खतं किंवा औषधं फवारायला अंगणभर शेत फिरावं लागायचं. कधी अंगावर ताप यायचा, कधी हातपाय दुखायचे. आता काय, ड्रोन उडवला की काही मिनिटांत काम पूर्ण! थोडं तंत्रज्ञान शिकायला लागलं; पण आता खूप सोपं झालंय. आमच्या पिढीनं श्रमांचं ओझं वाहिलं; पण पुढच्या पिढीला हे सगळं तयार मिळणार आहे. त्यांना कष्टापेक्षा ज्ञान वापरून शेती करता येईल.' सुशांतच्या डोळ्यांतला आत्मविश्वास बघून लक्षात येतं. सातनवरीनं खरंच ग्रामीण शेतीला एक नवा चेहरा दिलाय.

फक्त शेतीपुरतंच नव्हे, तर मत्स्यपालन आणि गोवंश निरीक्षणातही तंत्रज्ञान आलं आहे. तलावातील पाण्याची गुणवत्ता तपासणारी सेन्सर प्रणाली उभारली गेली आहे. त्यामुळे मासेपालन अधिक वैज्ञानिक पद्धतीनं होतंय. गोवंशाच्या आरोग्याची देखरेख करणारी स्मार्ट उपकरणं शेतकऱ्यांच्या मदतीला येत आहेत.

‘गाव बदललं तरच देश खऱ्या अर्थानं बदलतो. सातनवरी हा त्याचा पुरावा आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी मांडलेली आत्मनिर्भर भारताची संकल्पना इथे प्रत्यक्षात दिसतेय. ड्रोनपासून टेलिमेडिसीन, स्मार्ट शिक्षणापासून स्मार्ट बँकिंगपर्यंत, सगळ्या सुविधा भारतीय कंपन्यांनी पुरवल्या आहेत. सातनवरी हा केवळ प्रारंभ आहे; पुढे हजारो गावे अशाच प्रकारे स्मार्ट आणि इंटेलिजंट होतील, हीच आपली दिशा आहे. ग्रामीण भारताला नव्या तंत्रज्ञानाची ताकद मिळाली, तर देशाच्या विकासाला कोणी रोखू शकत नाही.’

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

### स्क्रिनवरून ज्ञानाची मैत्री

गावातील शाळेत प्रोजेक्टर, डिजिटल बोर्ड, ऑनलाइन धडे यामुळे मुलं आता फक्त पुस्तकापुरती अडकली नाहीत. गणित, विज्ञान यांची अवघड उदाहरणं स्क्रीनवर रंगीत ॲनिमेशनमध्ये समजतात. सरपंच वैशाली चौधरी सांगतात, ‘आता आमच्या मुलांना शहरातल्या मुलांसारखंच शिकायला मिळतंय. शिक्षणातील अंतर मिटतंय, ही आमच्यासाठी खरी क्रांती आहे.’ पालकांचं म्हणणं आहे की, मुलं आता अभ्यासाला घाबरत नाहीत, उलट त्यांना शाळेत जावसं वाटतं. अंगणवाड्याही डिजिटल झाल्या आहेत. ‘डिजिटल ईसीसीई’ मार्गदर्शन पुस्तक, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित रिमोट क्लासरूम यामुळे लहान मुलं खेळता-खेळता शिकतात. गावात ई-स्किल सेंटर उभारण्यात आलं आहे, जे तरुणांना नवी कौशल्यं शिकवून रोजगारक्षम बनवतंय.

### डॉक्टर थेट मोबाइलवर...

पूर्वी एखाद्याला ताप आला, डोकेदुखी झाली, दमा बळावला तर गावकऱ्यांना थेट तालुक्याला धाव घ्यावी लागे. काही वेळा रुग्णाला घेऊन जाण्यातच महत्त्वाचा वेळ वाया जाई; पण आता परिस्थिती पूर्ण बदलली आहे. टेलिमेडिसीनच्या सुविधेमुळे सातनवरीकर थेट नागपूरमधील तज्ज्ञ डॉक्टरांशी मोबाइलवर व्हिडिओ कॉल करतात. डॉक्टर स्क्रिनवर दिसतो, आजार ऐकतो आणि लगेच सल्ला देतो. इतकंच नव्हे तर ईसीजी, बीपी, रक्त तपासणी यांसारख्या प्राथमिक तपासण्या गावातच होतात. औषधांची यादी ही डिजिटल स्वरूपात मिळते. आरोग्य आता अक्षरशः हाताशी आलं आहे. हे सातनवरीचं मोठं यश मानलं जातंय.

### गावकऱ्यांचा आत्मविश्वास

गावातील सुमतीबाई ठामपणे सांगतात, ‘पूर्वी माझ्या मुलाला ताप आला की अंग थरथर कापायचं. रात्रभर विचार सुरू असायचा की सकाळी कसं न्यायचं तालुक्याला? आता मोबाइलवरच डॉक्टर दिसतो, बोलतो. औषधांची चिठ्ठी मिळते. भीती वाटेनाशी झाली आहे. घरबसल्या उपचार मिळतात.’ गावात ‘हेल्थ कार्ड’ योजना सुरू झाली आहे. प्रत्येक ग्रामस्थाच्या आरोग्याची नोंद संगणकात भरलेली आहे. कोणाला मधुमेह, कोणाला दमा, कोणाला हृदयविकाराचा धोका हे सगळं डॉक्टरांच्या स्क्रीनवर लगेच दिसतं. त्यामुळे आपत्कालीन प्रसंगी उपचार जलद होतात. गावकऱ्यांच्या भाषेत सांगायचं तर, ‘आता डॉक्टर आणि दवाखाना दोन्ही बोटांच्या टोकावर आलेत.’

### बँक तालुक्यात नाही, गावातच!

लहानसहान व्यवहारासाठीही आधी तालुक्याला धाव घ्यावी लागायची. आता ‘बँक ऑन व्हिल्स’ थेट गावात येते. मोबाइल बँकिंगचा वापर वाढतोय. अजून सर्वांनी ते आत्मसात केलेलं नाही; पण सुरुवात झाली आहे. गावाच्या अंगणातच अर्थकारण उभं राहतंय. महिला बचतगटांसाठीही डिजिटल व्यवहार सुरू होत आहेत. स्वयंसाहाय्यता गट ऑनलाइन व्यवहार शिकत आहेत. कमलताई हसून म्हणतात, ‘पूर्वी आम्हाला बँक म्हणजे फक्त वहीतली नोंद. आता मोबाइलवर आमचं खातं दिसेल. ही आमच्यासाठी मोठी क्रांती आहे.’

### सुरक्षिततेची नवी वाट

सातनवरीमध्ये आता काळोख्या रात्रीचं भय उरलं नाही. गावभर सीसीटीव्ही कॅमेरे बसवले गेले आहेत. प्रत्येक गल्ली-रस्त्यावर नजर ठेवणारे हे डोळे कुणीही खोड्या काढू नयेत याची काळजी घेतात. त्याचबरोबर बसवलेल्या स्मार्ट स्ट्रिट लाइट्स आपोआप उजेडाची प्रखरता नियंत्रित करतात. कोणी रस्ता धरला की, दिवे झगमगून उठतात आणि माणसं नाहीत तिथे आपोआप मंद होतात. या छोट्याशा बदलानं गावकऱ्यांच्या सुरक्षेबरोबरच आत्मविश्वासही दुणावला आहे.



## शेतकऱ्यांचा अनुभव

शेतकरी दामोदरभाऊ सांगतात, 'पूर्वी रात्री उशिरा कोणी बाहेर पडलं तर धाकधूक वाटायची. कुठं चोरी, कुठं फसवणूक याच्या बातम्या ऐकायला यायच्या; पण आता दिवे आपोआप लागतात, रस्ते उजळतात. कॅमेऱ्यामुळे कुणीही संशयास्पद माणूस गावात शिरण्याआधीच पकडला जातो. आमचं गाव आता सुरक्षित झालंय.' गावकऱ्यांच्या चेहऱ्यावरचं समाधान पाहिलं की लक्षात येतं, सुरक्षेची नवी वाट सातनवरीनं खरी करून दाखवली आहे.

## प्रशासन, सहभाग, तंत्रज्ञानाची त्रिसूत्री

विभागीय आयुक्त डॉ. विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर आणि जिल्हा परिषदेचे सीईओ डॉ. विनायक महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रवास शक्य झालाय. शासनाची साथ, गावकऱ्यांचा सक्रिय सहभाग आणि तंत्रज्ञानाचा स्पर्श या त्रिसूत्रीवर सातनवरी उभी आहे. यामुळे हा प्रकल्प केवळ प्रयोग राहिला नाही, तर यशस्वी वास्तव बनत आहे.

## तंत्रज्ञानाच्या साथीने ग्रामविकास

सातनवरीमध्ये सौरऊर्जेवर चालणारे स्ट्रिट लाइट्स आहेत, शेतांवर ड्रोन उडतात, फायबर इंटरनेट घराघरात पोहोचत आहे, शाळा व अंगणवाड्या डिजिटल होत आहेत, आरोग्य केंद्रात स्मार्ट उपकरणं आली आहेत. स्मार्ट कचरा व्यवस्थापन, स्मार्ट अग्निशमन, स्मार्ट गव्हर्नन्स यामुळे गाव आता केवळ 'गाव' न राहता आदर्श बनतंय. ग्रामपंचायतीच्या कामातही संगणकाचा वापर वाढलाय. कर वसुलीपासून पाणीपुरवठ्याच्या नोंदीपर्यंत सगळं डिजिटल झालंय. त्यामुळे कामात पारदर्शकता आली आहे आणि वेळही वाचतो आहे.

## ही विचारांची वाटचाल

राष्ट्रपिता महात्मा गांधींनी 'खेड्यांकडे चला' म्हणत ग्रामीण भारताचं महत्त्व अधोरेखित केलं. संत तुकडोजी महाराजांनी 'गाव करी ते राव न करी' म्हणत ग्रामगीतेतून आदर्श गावाचं स्वप्न दाखवलं. आज त्याच विचारांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सातनवरीनं ग्रामीण भारताला नवा चेहरा दिला आहे. व्हाईस ऑफ इंडियन कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी एंटरप्रायजेस या संस्थेने देशी कंपन्यांना एकत्र आणून हा प्रकल्प उभा केला. प्रशासन आणि कंपन्यांच्या संयुक्त प्रयत्नातून सातनवरीनं आदर्श घडवला आहे. सातनवरीसारखी गावे निर्माण झाली, तर ग्रामीण भागातून शहरांकडे होणारी पलायनाची गरज उरणार नाही. रोजगार, शिक्षण, आरोग्य, सुविधा सगळं गावातच मिळेल. हेच खरं 'समृद्ध भारत' घडवण्याचं स्वप्न आहे. सातनवरीची कहाणी केवळ एका गावाची नाही, तर ग्रामीण भारताच्या क्षमतेची आहे. एक छोटं गाव, पण मोठं स्वप्न. हे स्वप्न पूर्ण झालं तर भारताच्या लाखो गावांचं भविष्य बदलू शकतं. सातनवरी हा प्रवास सुरू झाला आहे आणि त्यानं दाखवलेली दिशा आता इतर गावांनी स्वीकारणं हीच खरी वेळ आहे.

बदल हा एका दिवसात घडत नाही. त्यासाठी सातत्य, धीर आणि लोकांचा खरा सहभाग लागतो. सातनवरीनं दाखवून दिलंय की, गावकऱ्यांनी एकदिलानं ठरवलं, तर कोणताही बदल अशक्य नाही. सरकारी योजना किंवा तंत्रज्ञान हे फक्त साधनं आहेत; पण खरी ताकद लोकांच्या सहभागात आहे. प्रत्येक शेतकरी, महिला, तरुण आपापला वाटा उचलतो तेव्हा गाव आपोआप बदलतं. सातनवरी हे केवळ प्रकल्पाचं उदाहरण नाही, तर ग्रामीण भारताला दिशा देणारं मॉडेल आहे. सातनवरी अजून बदलतंय, अजून शिकतंय, अजून उभारतंय; पण प्रवास सुरू झालाय. उद्या परगावचे लोक येऊन विचारतील. 'तुमच्या सातनवरीचं रहस्य काय?' तेव्हा उत्तर असेल, सहभाग, तंत्रज्ञान आणि दूरदृष्टी.

**- विनायक महामुनी, सीईओ, जिल्हा परिषद.**



## इतर गावांचे वास्तव

आजही महाराष्ट्रात कित्येक गावांचे हाल बघायला नकोत. पावसाळा आला की चिखलात पाय रुतून बसतात, रस्ते नावालाच आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी बाया डोक्यावर घागरी घेऊन मैलोन्‌मैल फिरतात. शाळा आहेत; पण शिक्षक दिसत नाहीत. दवाखाना आहे; पण औषधं नाहीत. सरकारचा पैसा आहे; पण तो अर्धवट प्रकल्पात अडकून बसतो. अशा गावांमध्ये लोकांच्या तोंडावरच प्रश्न 'काय होणार आहे बदल?' या सगळ्या अनास्थेच्या पार्श्वभूमीवर सातनवरी उठून दिसतं. इकडच्या लोकांनी ठरवलं, तर बदल आपोआप झाला. एकजुटीची ताकद काय असते, ते दाखवून दिलं. खरं सांगायचं तर, 'सगळे मिळून' असं मन झालं, तर कोणतंही गाव मागे राहणार नाही.

(लेखक हे नागपूर येथील ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

**२०१४ मध्ये राज्याचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १२ मे २०१५ ला कॅबिनेटचा ठराव उच्च न्यायालयाला पाठवून त्यानंतर सतत ते सर्किट बेंचसाठी प्रयत्नरत होते. खंडपीठ निर्मितीपर्यंत त्यांचा पाठपुरावा कायम असणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या विभागात नागपूर, छत्रपती संभाजीनगर, गोवा खंडपीठांनंतर आता कोल्हापूरचे सर्किट बेंच न्यायदानाचे नवे दालन झाले आहे.**

# कोल्हापूर सर्किट बेंच, न्यायदानाचे नवे दालन!

**प्रवीण टाके**

कोल्हापूरच्या न्यायिक इतिहासात १७ ऑगस्ट हा दिवस सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला. या दिवशी मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर येथील सर्किट बेंचचे उद्घाटन झाले आणि कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर, सिंधुदुर्ग व रत्नागिरी या जिल्ह्यांसाठी कोल्हापूर येथेच उच्च न्यायालयाचे कामकाज सुरू झाले आहे. या निमित्ताने झालेला सोहळा या सर्किट बेंचमधील सहा जिल्ह्यांना कायम स्मरणात राहणारा भावनिक सोहळा ठरला आहे.

या सोहळ्याला सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश भूषण गवई, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश आलोक अराधे, कोल्हापूरचे पालकमंत्री तथा राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, खासदार छत्रपती शाहू महाराज यांच्यासह मंत्रिमंडळातील ज्येष्ठ मंत्री, खासदार, आमदार तीन खंडपीठाचे न्यायमूर्ती, सर्किट बेंचचे न्यायमूर्ती, विधि क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. हा सोहळा केवळ कोल्हापूरच्या दृष्टीनेच नव्हे, तर महाराष्ट्रासाठी ऐतिहासिक ठरला. यामुळे पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण परिसरातील हजारो न्याय प्रविष्टांना मोठा दिलासा मिळणार आहे. न्यायप्रक्रियेच्या माध्यमातून कोल्हापूरच्या पायाभूत सुविधांसोबतच सर्वांगीण विकासाला यामुळे चालना मिळणार आहे.




## पाच दशकांची मागणी पूर्ण

कोल्हापुरातील सर्किट बेंचची मागणी मागील पाच दशकांपासून सुरू होती. विविध वकील संघटना, सामाजिक संघटना, विविध क्षेत्रातील मान्यवर, माध्यमांनी आणि स्थानिक नेत्यांनी या मागणीला सातत्याने पाठिंबा दिला. २०१४ मध्ये राज्याचे नेतृत्व स्वीकारल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी १२ मे २०१५ ला कॅबिनेटचा ठराव उच्च न्यायालयाला पाठवून त्यानंतर सतत ते सर्किट बेंचसाठी प्रयत्नरत होते. खंडपीठ निर्मितीपर्यंत त्यांचा पाठपुरावा कायम असणार आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या विभागात नागपूर, छत्रपती संभाजीनगर, गोवा खंडपीठांनंतर आता कोल्हापूरचे सर्किट बेंच न्यायदानाचे नवे दालन झाले आहे.

## सहा जिल्ह्यांना दिलासा

या सर्किट बेंचचा लाभ पश्चिम महाराष्ट्र व कोकणातील कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी या सहा जिल्ह्यांना होणार आहे. आतापर्यंत या सहा जिल्ह्यांतील न्यायप्रविष्ट खटल्यांसाठी मुंबई गाठावी लागत होती; परंतु कोल्हापूर बेंचमुळे प्रवासखर्च, वेळ आणि श्रम यांची मोठी बचत होणार आहे. तसेच यानुसार दरवर्षी साधारणतः ४० हजार खटले येथूनच निपटता येतील, असा अंदाज आहे.

## खंडपीठाची नवी इमारत उभी होणार!

सर्किट बेंचच्या कामकाजामुळे कोल्हापूर येथे मोठे न्यायालयीन संकुल उभारण्यात येणार आहे. सर्किट बेंचचे रूपांतर खंडपीठात होणार हे लक्षात घेऊन ही इमारत तयार केली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लवकरच कोल्हापूरच्या इतिहासाला साजेशी इमारत उभी राहील, असे सूतोवाच आपल्या संबोधनात केले. सुसज्ज न्यायदानाच्या इमारतीसोबतच न्यायमूर्तींसाठी स्वतंत्र कक्ष, वकिलांसाठी वसतिगृह व अन्य पायाभूत सुविधांचा विकास होणार आहे.

यासाठी शासनाने १०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. शुभारंभ सोहळ्यात शेंडा पार्क येथील २७ एकर जागेचे हस्तांतरण मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्याकडे कोल्हापूरकरांच्या साक्षीने करण्यात आले.

## राधाबाई बिल्डिंगचे भाग्य उजाळले

सर्किट बेंच उभारायचे कुठे हा प्रश्न होता. मात्र दूरदृष्टीचे राजे, समतेचे पुरस्कर्ते राजर्षी शाहू महाराजांच्या काळातच राजाराम महाराजांनी उभारलेल्या व ज्या ठिकाणी न्यायालय उभारले गेले होते, तीच भाऊ सिंगजी मार्गावरील जुनी न्यायालयाची इमारत यासाठी पुढे आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले व त्यांच्या अधिकाऱ्यांनी अवघ्या २५ विक्रमी दिवसांत या इमारतीचे रूप पालटले. १८ तारखेपासून या इमारतीमध्ये न्यायदान सुरू झाले आहे. या इमारतीचे जुने स्वरूप जसेच्या तसे ठेवल्यामुळे ही इमारत कोल्हापूरच्या हेरिटेज दालनामध्ये देखणी इमारत म्हणून पुढे आली आहे. महत्त्वाचे म्हणजे याच राधाबाई बिल्डिंगमध्ये न्यायालयीन प्रक्रियेत लोकमान्य बाळ गंगाधर टिळक आणि स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकर सहभागी झाले आहेत.

## कोल्हापुरातील न्यायदानाची परंपरा

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांमुळे न्याय, नीती, समता, न्यायदान यासाठी कोल्हापूर शहराचे दायित्व मोठे आहे. या शहराने १८६७ पासून न्यायव्यवस्थेला आपलेसे केले आहे. या शहरात पूर्वी 'राजा ऑफ कोल्हापूर' या सहीने न्यायदान होत होते. महादेव गोविंद रानडे हे कोल्हापूरला लाभलेले पहिले न्यायाधीश होते. ब्रिटिश राजवटीतील काही ऐतिहासिक नोंदींनुसार १८९३ मध्ये 'कोल्हापूर स्टेट रूल्स' म्हणून स्वतंत्र कायद्याचे पुस्तक होते. राजाराम महाराजांच्या काळात १९३१ मध्ये कोल्हापुरात स्वतंत्र हायकोर्ट व सुप्रीम कोर्ट स्थापन झाले होते.

## कोल्हापुरी स्वागताने भारावले सरन्यायाधीश

कोल्हापूरच्या दोन दिवसांच्या भेटीवर आलेले सरन्यायाधीश स्वागताने भारावले. खरे तर त्यांच्या स्वागतासाठी छत्रपती शाहू महाराज यांच्यासह न्याय व विधि विभागातील सर्व वरिष्ठ, मंत्रिमंडळातील वरिष्ठ मंत्री यांनी विमानतळावर हजेरी लावली होती. सोबतच सामान्य कोल्हापूरकरांनी त्यांच्या वाहनांवर पुष्पवृष्टी करीत त्यांचे स्वागत केले. अगदी सामान्यातला सामान्य माणूस विश्रामगृहावर त्यांना भेटला. सरन्यायाधीशांनी सर्वांना वेळ दिला. त्यांच्या ५५ मिनिटांच्या भाषणामध्ये त्यांच्या सन्मानार्थ पाच ते सहा हजार प्रेक्षक पाच वेळा अभिवादनास उभे राहिले. मोबाइलचा टॉर्च दाखवून त्यांना अभिवादन करण्यात आले. एवढेच नाही तर सुप्रसिद्ध शाहीर आझाद नायकवडी यांनी त्यांच्यावर पोवाडाही सादर केला. सरन्यायाधीशांनी त्यांच्यावरील या प्रेमासाठी सर्वांची जाहीर कृतज्ञता व्यक्त केली.

## मुख्यमंत्र्यांकडून सरन्यायाधीशांना श्रेय

कोल्हापुरातील सर्किट बेंच सुरू करणे माझ्यासाठी भावनिक कार्य होते, अशा शब्दात सरन्यायाधीशांनी कोल्हापूरचे महत्त्व आपल्या भाषणात सांगितले. मात्र तत्पूर्वी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कोल्हापूरचे सर्किट बेंच करण्यासाठी सरन्यायाधीशांनी प्रत्येक दिवशी कसा पाठपुरावा केला आणि त्यासाठी



मुख्यमंत्र्यांनीदेखील स्वतः राजभवन गाठून एका दिवसात अध्यादेश कसा निघाला याची पूर्ण माहिती दिली.

केवळ सरन्यायाधीशपदावर भूषण गवई असल्यामुळेच हे कार्य होऊ शकले, असे टाळ्यांच्या कडकडाटात त्यांनी सांगितले. सर्किट बेंचचे संपूर्ण श्रेय त्यांनी सरन्यायाधीश भूषण गवई यांना दिले.

## शाहू – आंबेडकरांचा गजर

समतेचे राज्य आणण्यासाठी न्यायव्यवस्था उभारणारे राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि संविधानाची पोलादी चौकट निर्माण करून सामान्य माणसाला समान संधीचे अभिवचन देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सरन्यायाधीशांनी आपल्या ३२ मिनिटांच्या भाषणात ३० वेळा नामोल्लेख केला. शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मदत केल्यामुळेच ते पुन्हा विदेशात जाऊन शिक्षण घेऊ शकले. शाहू महाराजांचे आमच्यावर अगणित उपकार आहेत, सरन्यायाधीशांच्या क्षणभर स्तब्ध होऊन उच्चारलेल्या या भावनिक वाक्याने अनेकांच्या डोळ्याच्या कडा ओल्या झाल्या. व्यासपीठावरील छत्रपती शाहू महाराजही या वाक्याने हेलावले.

## सर्किट बेंच आणि खंडपीठ – काय फरक?

सर्किट बेंच म्हणजे उच्च न्यायालयाचे एक तात्पुरते ठिकाण. जेथे उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती ठरावीक कालावधीत येऊन प्रकरणे चालवतील. राज्याच्या उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती सर्कीट बेंच निर्माण करतात. त्याचे नोटिफिकेशन राज्यपाल प्रसिद्ध करतात.

खंडपीठ मात्र कायमस्वरूपी असते. यासाठी घटनात्मक प्रक्रिया आवश्यक असून, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती प्रस्ताव तयार करून सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवतात. त्यास मंजुरी मिळाल्यावर राष्ट्रपती नोटिफिकेशन काढतात.

दोन्ही ठिकाणी न्यायदानाची पद्धत आणि प्रक्रिया सारखीच असते. मात्र सर्किट बेंचमध्ये न्यायमूर्तींची नियुक्ती तात्पुरती असते, तर खंडपीठात ती कायमस्वरूपी असते. कोल्हापूरचे सध्याचे सर्किट बेंचही लवकरच खंडपीठात रूपांतरित होणार आहे.

उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर.

**निसर्गात वातावरणीय बदल लाखो वर्षांपासून घडत आले आहेत; पण हे बदल नैसर्गिक होते. आज औद्योगिक क्रांतीनंतर होत असलेला हवामान बदल मात्र मानवनिर्मित आहे. कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनांपासूनची ऊर्जानिर्मिती त्याला कारक आहे. स्वस्तात आणि सहज उपलब्ध होणारी जीवाश्म इंधने जाळून वेगवान आर्थिक प्रगती करण्याच्या मोहापायी आपण हे कर्ब उत्सर्जन करीत आहोत. यात चांगली गोष्ट एकच आहे की, हे संकट मानवनिर्मित आहे आणि म्हणूनच यावर उपाय करणेही मानवाच्याच हातात आहे.**

# वातावरणीय बदलाचे आव्हान आणि उपाययोजना

**अभिजीत घोरपडे**

वातावरणीय बदलाचे संकट हे २१व्या शतकातील मानवजातीसमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. २०२४ हे वर्ष मानव जातीच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण वर्ष होते. खरेतर २०१५ पासून २०२४ पर्यंतची वर्षे मानव जातीच्या इतिहासातील सर्वाधिक उष्ण १० वर्षे होती.

संपूर्ण राज्य चालू वर्षी फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात उष्मा लाटेच्या प्रभावाखाली आले. पारा ४० अंशांच्या वर चढला. अरबी समुद्रात आणि बंगालच्या उपसागरात कमी दाबाचा पट्टा तयार झाल्याने विदर्भ, मराठवाड्यात अवकाळी पावसाने थैमान घातले. अनेक तालुक्यांमध्ये गारपीट झाली. यावर्षी मान्सून मे महिन्यातच म्हणजे १५ दिवस आधीच सुरू झाला. निसर्गाचा हा प्रकोप होण्याचे कारण आहे, ग्लोबल वॉर्मिंग आणि त्याचा परिणाम आहे वातावरणीय बदल!

निसर्गात वातावरणीय बदल लाखो वर्षांपासून घडत आले आहेत; पण हे बदल नैसर्गिक होते. आज औद्योगिक क्रांतीनंतर होत असलेला हवामान बदल मात्र मानवनिर्मित आहे. कोळसा, पेट्रोल, डिझेल अशा जीवाश्म इंधनांपासूनची ऊर्जानिर्मिती त्याला कारक आहे. स्वस्तात आणि सहज उपलब्ध होणारी जीवाश्म इंधने जाळून वेगवान आर्थिक प्रगती करण्याच्या मोहापायी आपण हे कर्ब उत्सर्जन करीत आहोत. यात चांगली गोष्ट एकच आहे की, हे संकट मानवनिर्मित आहे आणि म्हणूनच यावर उपाय करणेही मानवाच्याच हातात आहे.

वातावरणीय बदलाच्या संकटाला तोंड देण्यासाठी भारत कटिबद्ध आहे. २०१५ मध्ये झालेल्या पॅरिस करारावर भारताने स्वाक्षरी केली आहे. पॅरिस कराराने २१व्या शतकाच्या अखेरीस जागतिक तापमान वाढ २ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्याचा आणि ती उद्योगपूर्व काळाच्या तुलनेत १.५ अंश सेल्सिअसपर्यंत मर्यादित ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याचा संकल्प केला आहे. ग्लासगो येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत (COP 26) प्रधानमंत्र्यांनी २०५० पर्यंत देशाला नेट झीरो करण्याचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे.

देशातील सर्वात मोठी राज्य अर्थव्यवस्था महाराष्ट्राची आहे. सकल राष्ट्रीय उत्पन्नामध्ये सर्वाधिक योगदान महाराष्ट्राचे आहे. २०२८ पर्यंत एक ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था साकार करण्याचे राज्याचे उद्दिष्ट आहे; पण याचबरोबर देशाच्या एकूण कर्ब उत्सर्जनामध्ये महाराष्ट्राचा वाटाही सर्वाधिक म्हणजे १० टक्के इतका आहे.

## राज्य वातावरणीय कृतिआराखडा

महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्याने कर्बमुक्तीच्या लढ्यातही देशाचे नेतृत्व केले पाहिजे, म्हणूनच राज्य वातावरणीय कृतिआराखड्यामध्ये २०५० पर्यंत नेट झीरो होण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. राज्य वातावरणीय बदल कृतिआराखड्यामध्ये गेल्या ५० वर्षांतील वातावरणीय बदलांचे विश्लेषण करण्यात आले आहे. पुढील ३० वर्षांसाठी भविष्यातील वातावरणीय बदलांचे अंदाज बांधण्यात आले आहेत. या विश्लेषणात काय दिसून आले? तर राज्यामध्ये उष्ण आणि अतिउष्ण दिवसांची संख्या दुपटीने वाढलेली आहे, पावसाचे प्रमाण आणि अनियमितता सातत्याने वाढत आहे. गेल्या दशकामध्ये दुष्काळाचे प्रमाण तिप्पट,



पुराचे प्रमाण चौपट आणि चक्रीवादळांचे प्रमाण तिप्पट वाढले आहे.

राज्य वातावरणीय कृतिआराखड्यामध्ये कृषी, जलसंधारण, वने, सार्वजनिक आरोग्य, पर्यटन, आदिवासी विकास व आपत्ती व्यवस्थापन या क्षेत्रांशी संबंधित अनुकूलन उपाययोजना (Adaptation Strategies), तर ऊर्जा, परिवहन, उद्योग इत्यादी क्षेत्रांशी संबंधित शमन उपाययोजना (Mitigation Strategies) सुचविलेल्या आहेत.

नॅशनल कूलिंग ॲक्शन प्लॅन २०१९ वर आधारित स्टेट कूलिंग ॲक्शन प्लॅन राज्य वातावरणीय कृती आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. सर्वाधिक कर्ब उत्सर्जन शहरांमधून आणि शहरांतील सर्वाधिक कर्ब उत्सर्जन हे इमारतींमधून होते. त्यामुळे स्टेट कूलिंग ॲक्शन प्लॅनमध्ये मोठ्या प्रमाणावर परवडणारी घरे पुरविणाऱ्या संस्थांच्या (उदा. म्हाडा, सिडको, एसआरए) इमारतींच्या कूलिंगवर भर दिला आहे.

कृषी क्षेत्रासाठी शीतगृहांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ग्रामीण भागात शीतगृहांच्या अभावी सुमारे ३० टक्के फळे आणि भाजीपाल्याचे नुकसान होते असा अंदाज आहे. त्यामुळे ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर शीतगृहांची साखळी उभी करण्याबद्दल या आराखड्यामध्ये शिफारस करण्यात आली आहे. राज्याची निम्मी लोकसंख्या आजही उपजीविकेसाठी शेतीवर अवलंबून आहे; पण शेतीचे सकल राज्य उत्पन्नामधील योगदान अवघे १२ टक्के आहे. त्यामुळेच विकेंद्रित अक्षय ऊर्जा आधारित उपजीविका (DRE based Livelihoods) तयार करण्यासाठी सौर ऊर्जा तंत्रज्ञानावर चालणाऱ्या उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढविण्याचा कार्यक्रम कृती आराखड्यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. सोलर पंप्स, सोलर ड्रायर्स, मिल्क चिलर्स, मायक्रो प्रोसेसर्स इत्यादी उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणावर; पण विकेंद्रित पद्धतीने केल्यास सौर ऊर्जेच्या प्रसारासोबतच शेतकऱ्यांना उपजीविकेचे साधन उपलब्ध होणार आहे, शिवाय शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत होणार आहे. या व्यतिरिक्त वातावरणीय वित्त पुरवठ्यावर (Climate Finance) एक स्वतंत्र अध्याय कृती आराखड्यात समाविष्ट करण्यात आला आहे. राज्याचे स्वतंत्र क्लायमेट बजेट असावे, अशी त्यात शिफारस आहे.

## शहर, जिल्हा वातावरणीय कृती आराखडे

राज्य वातावरणीय कृती आराखड्याच्या धर्तीवर राज्यातील सर्व जिल्ह्यांसाठी आणि अमृत शहरांसाठी वातावरणीय कृती आराखडे तयार करण्यात येणार आहेत. शहरांवर विशेष लक्ष देण्याचे कारण महाराष्ट्र हे देशातील तिसरे सर्वाधिक नागरीकरण झालेले राज्य आहे. मुंबई, सोलापूर, नाशिक आणि छत्रपती संभाजी नगर या शहरांचे वातावरणीय कृती आरखडे तयार झाले असून कोल्हापूर, सांगली-मिरज-कुपवाड, पुणे, मीरा-भाईंदर आणि नवी मुंबई या शहरांचे कृती आराखडे बनविण्यात येत आहेत.

## शहर व जिल्हा वातावरणीय कृती कक्ष

शहरांचे व जिल्ह्यांचे वातावरणीय कृती आराखडे तयार करून त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी अमृत शहरे आणि जिल्ह्यांमध्ये वातावरणीय कृती कक्ष स्थापन करण्यात आले आहेत. जिल्हा आणि शहर कृती कक्षांवर संनियंत्रण ठेवण्यासाठी विभागीय वातावरणीय कृती कक्ष तयार करण्यात आले आहेत.

## इमारत क्षेत्राच्या कर्बमुक्तीचा आराखडा

शहरांमधील इमारतींतून सुमारे ४० टक्के कर्ब उत्सर्जन होते. म्हणून राज्यातील अमृत शहरांच्या इमारत व ऊर्जा क्षेत्रासाठी कर्बमुक्तीचा आराखडा तयार केला आहे. त्यामध्ये सौर ऊर्जेचा वापर वाढवून ऱ्हास टाळणे, ऊर्जा वापराची कार्यक्षमता वाढवणे, जीवाश्म इंधनाचा वापर टाळणे, पर्यावरणपूरक बांधकाम साहित्याचा वापर, इमारतींची डागडुजी, स्वच्छ ऊर्जा वापरणारे स्वयंपाकघर इत्यादी घटकांचा समावेश आहे.

## राज्याचे विद्युत वाहन धोरण २०२५

सुमारे एक तृतीयांश कर्ब उत्सर्जन हे परिवहन क्षेत्रातून म्हणजेच रस्त्यांवरील वाहनांतून होते. म्हणूनच महाराष्ट्राने आपले विद्युत वाहन धोरण २०२१ मध्ये जाहीर केले. सार्वजनिक वाहतूक बळकट करण्याचे शासनाचे धोरण असून मुंबईमधील बहुतेक बेस्ट बसेस या विजेवर चालणाऱ्या आहेत. स्टेट ट्रान्सपोर्ट कार्पोरेशनने पाच हजार विद्युत बसेसची मागणी नोंदवली आहे. आज देशात सर्वाधिक ई-बसेसची संख्या महाराष्ट्रात आहे. विद्युत वाहन धोरणामध्ये चार्जिंग धोरणसुद्धा अंतर्भूत आहे. सहकारी गृहनिर्माण संस्था, शॉपिंग मॉल, रेल्वे स्टेशन, एसटी स्टँड, पेट्रोल पंप येथे चार्जिंग सुविधा निर्माण करण्याचे धोरण आहे. या प्रागतिक धोरणामुळे देशातील सर्वाधिक म्हणजे ३,७०० इतकी चार्जिंग स्टेशन्स महाराष्ट्रात आहेत. २०२१च्या विद्युत धोरणात सुधारणा करून नवीन विद्युत धोरण नुकतेच लागू करण्यात आले आहे. त्यामध्ये विद्युत वाहन खरेदीवर सूट देण्यात आली असून पथकर व नोंदणी शुल्क माफ करण्यात आले आहे. विद्युत वाहनांना टोल माफी देण्यात आली आहे. तसेच दर २५ कि.मी. अंतरावर चार्जिंग सुविधा उभारण्यात येणार आहे.

## जस्ट ट्रांझिशन रोडमॅप

महाराष्ट्र हे देशातील औद्योगीकरण झालेले प्रमुख राज्य आहे. कोळसा खाणी, औष्णिक ऊर्जा निर्मिती केंद्रे, लोह आणि पोलाद, सिमेंट, वाहन उद्योग, खते आणि रसायने, फौंडरी उद्योग यांतून सर्वाधिक कर्ब उत्सर्जन होते. महाराष्ट्र राज्याचा जीवाश्म इंधन ऊर्जास्रोतांच्या वापराकडून अक्षय

ऊर्जास्रोतांच्या वापराकडे होणारा प्रवास न्याय्य, सर्वसमावेशक व कल्याणकारी करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने राज्याचा जस्ट ट्रांझिशन रोडमॅप तयार केला आहे. त्यामध्ये अस्तित्वातील पायाभूत सुविधांचा नव्याने वापर, कौशल्य विकास व सामाजिक सुरक्षा या घटकांचा समावेश आहे. जीवाश्म इंधनाचा वापर करणारे उद्योग मोठ्या प्रमाणावर असलेल्या

### पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स

वातावरणीय बदलाच्या संकटाला तोंड देऊन शाश्वत विकास साधण्यासाठी राज्यामध्ये मोठ्या प्रमाणात बांबू लागवडीस शेतकऱ्यांना उद्युक्त करण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पर्यावरण व शाश्वत विकास टास्क फोर्स गठित करण्यात आला आहे. बांबूचे रोप कमी पाण्यात झपाट्याने वाढणारे व इतर झाडांच्या तुलनेत अधिक कार्बन शोषून घेणारे आहे. बांबूपासून बनविण्यात येणाऱ्या वस्तूंसाठी मोठी बाजारपेठ शक्य असून बांबू लागवड ही शेतकऱ्यांसाठी उदरनिर्वाहाचे उत्तम साधन ठरू शकते.

टास्क फोर्सच्या माध्यमातून राज्यातील पडीक जमिनीवर, नदीकाठांवर, धरण क्षेत्रात, रस्त्यांच्या कडेला, सामुदायिक वनहक्क जमिनींवर; तसेच खासगी जमिनींवर मनरेगा योजनेतून मोठ्या प्रमाणात बांबू लागवड करण्यात येणार असून ७ लाख रुपयांपर्यंत हेक्टरी अनुदान देण्यात येणार आहे.

राज्यातील १४ जिल्ह्यांचा समावेश असणाऱ्या पाच औद्योगिक संकुलांसाठी न्याय्य ऊर्जा संक्रमण आराखडे (Just Transition plans) तयार करण्यात येणार आहेत.

### सर्क्युलर इकॉनॉमी

आपले विकासाचे प्रारूप काय आहे? उच्चभ्रू वसाहतीमध्ये आलिशान घर, गाडी, विमान प्रवास, महागडे फोन, इलेक्ट्रॉनिक वस्तू, एसी, अन्य ऊर्जा साधनांची मालकी असणे म्हणजे विकास असे मानले, तर अमेरिकेतील न्यूयॉर्कमधील मॅनहॅट्टन सर्वाधिक विकसित म्हणावे लागेल. संयुक्त राष्ट्रांच्या मानव विकास अहवालात म्हटले आहे की, जर भारत आणि चीन यांनी मॅनहॅट्टनप्रमाणे विकसित व्हायचे ठरविले तर एक, दोन नाही, तब्बल नऊ पृथ्वी इतकी खनिजसंपदा आपल्याला लागेल. पृथ्वीवरची निसर्गसंपत्ती मर्यादित आहे. तिथे अमर्याद उपभोगाला जागा नाही. म्हणून साधनसंपत्तीचा वापर जपून करायला हवा. Refuse, reduce, reuse, recycle and refurbish हा आपला जीवनमंत्र बनायला हवा.

शहरातून मोठ्या प्रमाणावर कचरा तयार होतो. प्लास्टिक, इलेक्ट्रॉनिक वस्तू, बॅटरी, रबर, बांधकाम-पाडकाम, वाहने यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने Recyclers सोबत करार केले आहेत. औद्योगिक कचऱ्याचा पुनर्वापर करण्यासाठी राज्यात पुणे, मुंबई, नाशिक, जालना, नागपूर आणि रत्नागिरी अशा सहा ठिकाणी सर्क्युलर इकॉनॉमी पार्क्स विकसित करण्यात येत आहेत. सर्क्युलर इकॉनॉमीमधील उद्योगांना चालना मिळावी, यासाठी नवीन धोरण आणण्यात येत आहे.




### मानवनिर्मित देवराई व घनवने

मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करून वातावरणाचा समतोल राखणे शक्य आहे. त्यानुषंगाने राज्यात मानवनिर्मित देवराया व घनवने तयार करण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने वनीकरण क्षेत्राचा अनुभव असणाऱ्या देवराई फाऊंडेशन, पुणे या संस्थेसोबत सामंजस्य करार केला आहे. या कराराद्वारे राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक मानवनिर्मित देवराई व घनवन तयार करण्यात येणार आहे.

### 'माझी वसुंधरा' अभियान

महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी सुरुवात झालेल्या 'माझी वसुंधरा' अभियानाचे हे पाचवे वर्ष आहे. निसर्गातील पंचमहाभूतांशी संबंधित पाच क्षेत्रांमध्ये ग्रामीण आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांची स्पर्धा आयोजित करण्यात येते. आज राज्यातील सर्वच ग्रामपंचायती, नगरपालिका, नगरपरिषदा व महानगरपालिका या उपक्रमात सहभागी झाल्या आहेत. गेल्या चार वर्षांत अभियानातून सुमारे तीन कोटी वृक्षांची लागवड केली असून यातून ५२ हजार हरित क्षेत्रे तयार झाली आहेत. सहा लाखांहून अधिक इलेक्ट्रिक वाहनांची नोंदणी राज्यामध्ये झाली, मोठ्या प्रमाणात जलसंधारण झाले आणि सौर ऊर्जेची क्षमता निर्माण झाली. लाखो नागरिकांनी पर्यावरणाचे रक्षण करण्याची प्रतिज्ञा घेतली. अशा प्रकारे 'माझी वसुंधरा' ही एक लोक चळवळ बनते आहे.

वातावरणीय बदलाचे संकट हा केवळ परिणाम आहे. मानवाने पर्यावरणाचा केलेला विनाश हा वातावरणीय बदलाचे कारण आहे. पर्यावरण वाचले तर आपण वाचू. या अनंत ब्रह्मांडात जीवसृष्टी असलेला पृथ्वी हा एकमेव ग्रह आहे, मानवाचे घर आहे. आपले हे घर वातावरणीय बदलाच्या संकटापासून वाचविण्याचा निर्धार आपण करू या.

(संचालक, राज्य वातावरणीय कृती कक्ष,
पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग.)

**अर्थार्जनासाठी कृतिशील असलेल्या या महिलांचा गावाच्या निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला आहे. ग्रामीण अर्थशास्त्र नव्याने समजून घेताना महिलांच्या स्वयंसाहाय्यता गटांनी त्यांच्या सदस्यांच्या कुटुंबातील प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी गटातच व्यवस्था उभी केली आहे. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत उमेद उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या प्रयत्नांना व्यापक संधी मिळत असून आर्थिक उन्नतीच्या दिशेने राज्यातील महिला स्वयंसाहाय्यता गटांची यशस्वी घोडदौड सुरू आहे.**

# ग्रामीण महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाची उमेद!

**वंदना थोरात**

ग्रामीण महिला एकत्र येऊन स्वयंरोजगारासाठी काही उद्योग व्यवसाय उभारण्याच्या प्रयत्नांना उमेद अभियानाच्या माध्यमातून शासन प्रोत्साहन आणि पाठिंबा देत आहे. त्यामुळे आजघडीला राज्यात ग्रामीण भागातील महिला स्वयंसाहाय्यता बचतगटांचे कार्यक्षेत्र अधिक व्यापक होत असल्याचे दिसत आहे. या स्वयंसाहाय्यता बचतगटांच्या माध्यमातून महिलांना स्वतःचे अस्तित्व निर्माण होत असल्याचा आत्मविश्वास वृद्धिंगत होत आहे, जो त्यांच्या कामाला यशस्वी होण्यासाठी पूरक ठरत आहे. राज्यभरातील ग्रामीण महिलांचे लाखो व्यवसाय सद्य:स्थितीत उभे राहिले आहेत. उत्पादनामध्येही दर्जा राखला जात आहे.

अर्थार्जनासाठी कृतिशील असलेल्या या महिलांचा गावाच्या निर्णयप्रक्रियेत सहभाग वाढला आहे. ग्रामीण अर्थशास्त्र नव्याने समजून घेताना महिलांच्या स्वयंसाहाय्यता गटांनी त्यांच्या सदस्यांच्या कुटुंबातील प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठी गटातच व्यवस्था उभी केली आहे.

## अभियानाची व्याप्ती

राज्यातील ३४ जिल्ह्यांतील ३५१ तालुक्यांमध्ये ६ लाख ५३ हजार स्वयंसाहाय्यता गट स्थापन करण्यात आले आहेत. गावपातळीवर स्वयंसाहाय्यता गटांच्या प्रतिनिधींचा ग्रामसंघ तयार होतो. राज्यात एकूण ३३ हजारपेक्षा जास्त ग्रामसंघ स्थापन झालेले आहेत. प्रत्येक जिल्हा परिषद गटस्तरावर ग्रामसंघाच्या प्रतिनिधींचा मिळून एक प्रभाग संघ तयार होतो. आज रोजी राज्यात एकूण १९६० प्रभाग संघ स्थापन झालेले आहेत. अभियानाकडून थेट प्रभाग संघाला निधी वितरित



होतो, प्रभाग संघ ग्रामसंघाला नियमाप्रमाणे निधी वितरित करतो. अभियानांतर्गत महिलांच्या हक्काच्या प्रबळ संस्था उभ्या राहिल्या आहेत.

अभियानाच्या अंतर्गत प्राथमिक खेळते भांडवल आणि समुदाय निधी अभियानाकडून उपलब्ध करून दिला जातो. सुरुवातीचा प्राप्त निधी आणि गटाच्या सदस्याच्या बचतीचा योग्य विनियोग करण्याचे प्रशिक्षण वेळोवेळी अभियानाचे कर्मचारी देतात. त्यातून पुढे बँकांचा विश्वास मिळवून गटांना पतपुरवठा करण्यासाठी प्रस्तावित केले जाते. त्याआधारे बँकांकडून गटांची प्रतवारी केल्यानंतर पतपुरवठा केला जातो.

## पतपुरवठ्याची ऐतिहासिक कामगिरी

राज्यातील सर्व बँकांच्या मदतीने २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात १० हजार ५०० कोटी रुपये पतपुरवठा करण्यात आला. ही कामगिरी ऐतिहासिक ठरली असून एवढा मोठा पतपुरवठा ग्रामीण महिलांना होऊ शकला, हे अभियानाच्या सर्व स्तरावर काम करणाऱ्या यंत्रणेचे मोठे यश आहे. या पतपुरवठ्यातून लाखो महिलांचे व्यवसाय सुरू झाले आहेत.

महिलांना आर्थिक स्वावलंबन मिळून स्वत:चा रोजगार निर्माण व्हावा म्हणून अभियानाच्या माध्यमातून विविध प्रयत्न होत आहेत. याचाच एक भाग म्हणून वेगवेगळ्या योजनांमधून शेतकरी महिला उत्पादक कंपन्या स्थापन केल्या जात आहेत. राज्यात अभियानाच्या माध्यमातून ४०७ शेतकरी उत्पादक कंपन्या स्थापन केल्या आहेत. या कंपन्या सामूहिक शेती, सामूहिक शेतमाल खरेदी, सामूहिक शेतमाल विक्री, शेतमाल प्रक्रिया उद्योग करत आहेत. या महिलांच्या शेतमालाला योग्य भाव मिळावा, म्हणून परदेशात निर्यात करायला सुरुवात झाली आहे.



## ई–कॉमर्स व्यासपीठ

अभियानातील महिलांच्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ मिळावी म्हणून अभियानाने 'ई-कॉमर्स व्यासपीठ' सुरू केले आहे. या पोर्टलचे नाव umedmart.com असे आहे. या ठिकाणी विविध खाद्यपदार्थ, कलाकुसरीच्या वस्तू, खेळणी अशा प्रकारच्या विविध वस्तू उपलब्ध आहेत. देशभरातून कुठूनही ग्राहक या पोर्टलवरून वस्तू किंवा पदार्थांची घरबसल्या ऑनलाईन खरेदी करू शकत आहे. या पोर्टलवरील ग्राहकांच्या खरेदीचे प्रमाण हळूहळू वाढत असून महिलांनी तयार केलेल्या उत्पादनाला ऑनलाइन बाजारपेठ उपलब्ध होण्यास मदत होत आहे.

महिलांच्या उत्पादित मालाला ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभर विविध पातळीवर प्रदर्शने भरवली जातात. जिल्हास्तरावर जिल्हा परिषद आणि विभागीय पातळीवर विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मदतीने सरस प्रदर्शन भरवले जाते, तर राज्यस्तरावर अभियानाच्या राज्य कक्षाच्या पुढाकारातून 'महालक्ष्मी सरस' या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते.

अभियानामार्फत ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था बँकांच्या मदतीने सुरू आहेत. जिल्ह्याच्या ठिकाणी एका बँकेकडून या संस्थांचे संचालन केले जाते. या योजनेमधून ग्रामीण भागातील १८ ते ४५ वयोगटातील युवक आणि युवतींना कौशल्य प्रशिक्षण दिले जाते. यामध्येही अभियानातील महिलांनाच प्राधान्य आहे. मागील आर्थिक वर्षात ४१,१२३ प्रशिक्षणार्थींना याचा लाभ मिळाला.

आपल्या कुटुंबांच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याची जबाबदारी आपण पार पाडत असल्याचे समाधान या महिलांना वाटत असल्याने त्याद्वारे आत्मविश्वास निर्माण होत असून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी उमेद अभियानाची मदत होत आहे. त्यांच्या या प्रयत्नांना ग्रामविकास विभागामार्फत विविध संधीचे व्यासपीठ, आवश्यक सर्व मार्गदर्शन, सहकार्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी मुख्यमंत्र्यांकडे विशेष पाठपुरावा करून राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये स्वयंसाहाय्यता गटाच्या महिलांची उत्पादने असलेले मॉल उभे राहावेत, म्हणून स्वतंत्र योजना सुरू करण्याचा आग्रह धरला. या योजनेला मान्यता मिळाली असून या वर्षीच्या अर्थसंकल्पात मंजुरीसुद्धा मिळाली आहे. या योजनेतून पहिल्या टप्प्यात सुरुवातीला १० जिल्ह्यांमध्ये मॉल सुरू करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

राज्यभरातील महिलांचा उमेद अभियानात काम करण्याचा उत्साह वाढत असून आपल्या स्व-कौशल्याचा वापर करून अर्थार्जन करण्यासाठीची या महिलांची उमेद वृद्धिंगत होत असल्याचे उत्साहवर्धक चित्र राज्यातील ग्रामीण भागात बघायला मिळत आहे. शासन ग्रामविकास विभागाच्या विविध योजनांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान उंचावण्यासाठी कृतिशील आहे.

**विभागीय संपर्क अधिकारी**

**गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांची इस्रो सहल हा केवळ एक प्रवास नाही, तर आकांक्षांना पंख देणारा, सामाजिक समतेचा आणि उज्ज्वल भविष्याची मुहूर्तमेढ रोवणारा एक ऐतिहासिक उपक्रम आहे. हा शासनाचा एक व्यापक दृष्टिकोन दर्शवतो, जिथे केवळ पायाभूत सुविधांचा विकास नव्हे, तर मानवी विकासालाही तेवढेच महत्त्व दिले जाते. यामुळे भविष्यात असे अनेक विद्यार्थी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे नाव उज्ज्वल करतील, यात शंका नाही.**

# गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांचे 'इस्रो'कडे ऐतिहासिक उड्डाण!

**गजानन जाधव**

आज शिक्षण हे केवळ साक्षरतेपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर सामाजिक समतेकडे नेणारे प्रभावी साधन ठरत आहे. राज्य शासनाने दुर्गम व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून शिक्षणाच्या संधी त्यांच्या दारात आणण्याचे धोरण स्वीकारले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाच्या सिरोंचा, वांगेपल्ली (ता. अहेरी) आणि नवेगाव (ता. गडचिरोली) येथील निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांनी नुकतेच शासनाच्या पुढाकारातून थेट विमानाने बंगळुरू येथे 'इस्रो' या भारतीय अवकाश संशोधन संस्थेला भेट दिली. शासनाच्या दूरदृष्टीतून साकारलेली ही संकल्पना केवळ अंतराळात उड्डाण नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाला गगनभरारी देणारी ठरली.

## शासनाचा दूरगामी दृष्टिकोन

गडचिरोली जिल्ह्याने राबवलेला दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना थेट विमानाने इस्रोला नेण्याचा उपक्रम हा केवळ एक शैक्षणिक सहल नसून, सामाजिक समानता, संधींची उपलब्धता आणि शैक्षणिक क्रांतीच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. या उपक्रमातून महाराष्ट्र शासनाचा, विशेषतः सामाजिक न्याय विभागाचा एक व्यापक आणि दूरगामी दृष्टिकोन स्पष्टपणे दिसून येतो. विकासाचे फायदे समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचले पाहिजेत, मग तो कितीही दुर्गम भागात असो, हे यातून स्पष्ट होते.

## संधीच्या समानतेतून स्वप्नांना बळ

अनेकदा दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधांपासूनही वंचित राहावे लागते. अशा परिस्थितीत त्यांना थेट विमानाने प्रवास घडवून आणणे आणि इस्रोसारख्या जागतिक दर्जाच्या संस्थेला भेट देण्याची संधी देणे, हा त्यांच्यासाठी केवळ एक अनुभव नाही, तर आयुष्य बदलवणारा क्षण ठरतो. ज्या विद्यार्थ्यांनी कधी जिल्ह्याचे मुख्यालयही पाहिले नव्हते, त्यांना देशाच्या अंतराळ संशोधन संस्थेत उभे राहण्याची संधी मिळाली, हे त्यांच्या स्वप्नांना बळ देणारे आहे. यामुळे त्यांना भविष्यात मोठे काहीतरी करण्याची प्रेरणा मिळेल आणि त्यांच्यातील सुप्त क्षमतांना वाव मिळेल.





## शिक्षण आणि विज्ञानाप्रति वचनबद्धता

या उपक्रमातून शासनाची शिक्षण आणि विज्ञान क्षेत्रातील प्रगतीप्रति असलेली वचनबद्धता दिसून येते. केवळ पुस्तकी ज्ञान न देता, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देऊन त्यांच्यात वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवला जात आहे. इस्रोसारख्या ठिकाणी भेट दिल्याने त्यांना विज्ञानाचे महत्त्व, अंतराळ संशोधनातील भारताची प्रगती आणि भविष्यातील संधी यांची जाणीव होते. हा उपक्रम ज्ञान-आधारित समाजाच्या निर्मितीसाठी महत्त्वाचा ठरतो.

## सामाजिक न्यायाची अंमलबजावणी

ही सहल संपूर्णपणे शासकीय खर्चातून सामाजिक न्याय विभागाने आयोजित केली होती. आर्थिक परिस्थितीमुळे कोणीही शिक्षणाच्या आणि अनुभवाच्या संधींपासून वंचित राहू नये, याची शासनाने काळजी घेतली आहे. हा उपक्रम सामाजिक न्यायाच्या तत्त्वाची प्रत्यक्ष अंमलबजावणी आहे, जिथे गरजू आणि वंचित विद्यार्थ्यांना समान संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

## प्रेरणादायी नेतृत्वाची भूमिका

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः नागपूर विमानतळावर उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यामुळे विद्यार्थ्यांना केवळ प्रोत्साहन मिळाले नाही, तर या उपक्रमाचे महत्त्वही अधोरेखित झाले. या उपक्रमासाठी वेळेत निधी मंजूर करून त्यांनी केवळ तांत्रिक प्रक्रियेचीच नव्हे, तर मानवी संवेदनशीलतेचीही मोठी भूमिका दर्शविली.

## 'गडचिरोली मॉडेल' राज्यासाठी अनुकरणीय

गडचिरोली जिल्हा हा पहिला जिल्हा ठरला, ज्याने शासनाच्या मदतीने दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना थेट विमानाने इस्रोला नेण्याचा ऐतिहासिक उपक्रम राबवला. समाजकल्याण विभागाच्या निवासी शाळांमधील १२० विद्यार्थ्यांनी १५ जून २०२५ रोजी थेट विमानाने बंगळुरू येथे 'इस्रो' - भारतीय अवकाश संशोधन संस्थेला भेट दिली. सर्वप्रथम ८ एप्रिल २०२४ रोजी देखील गडचिरोलीतील १२० विद्यार्थी इस्रोच्या हैदराबाद येथील केंद्रावर सहलीला गेले होते. हे उड्डाण केवळ अंतराळातले नव्हते, तर प्रगतीच्या दिशेने घेतलेली झेप होती. हे राज्यभरातील आदिवासी व ग्रामीण जिल्ह्यांसाठी एक आदर्श मॉडेल ठरू शकते. शिक्षण हे प्रेरणात्मक, प्रयोगशील आणि अनुभवाधारित कसे असावे, याचे हे जिवंत उदाहरण आहे.

थोडक्यात गडचिरोलीच्या विद्यार्थ्यांची इस्रो सहल हा केवळ एक प्रवास नाही, तर आकांक्षांना पंख देणारा, सामाजिक समतेचा आणि उज्ज्वल भविष्याची मुहूर्तमेढ रोवणारा एक ऐतिहासिक उपक्रम आहे. हा शासनाचा एक व्यापक दृष्टिकोन दर्शवतो, जिथे केवळ पायाभूत सुविधांचा विकास नव्हे, तर मानवी विकासालाही तेवढेच महत्त्व दिले जाते. यामुळे भविष्यात असे अनेक विद्यार्थी विज्ञान आणि तंत्रज्ञान क्षेत्रात भारताचे नाव उज्ज्वल करतील, यात शंका नाही.

(जिल्हा माहिती अधिकारी, गडचिरोली.)

**अनेक दशकांपासून बीडच्या जनतेने प्रतीक्षा केलेली रेल्वे मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाचे औचित्य साधून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते १७ सप्टेंबर २०२५ रोजी हिरवा झेंडा दाखवून अमळनेर (भां) ते बीड नवीन रेल्वेचे उद्घाटन करून बीड ते अहिल्यानगर रेल्वेचा शुभारंभ केला. बीडकरांचे अनेक वर्षांपासूनचे रेल्वेचे स्वप्न पूर्ण झाल्याने त्यांच्यासाठी हा ऐतिहासिक क्षण होता.**

# अहिल्यानगर-बीड रेल्वे : चार दशकानंतरची स्वप्नपूर्ती!

**अरुण सुर्यवंशी**

बीड रेल्वे प्रकल्प मराठवाड्याच्या विकासातील महत्त्वाचा टप्पा असून यामुळे जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात क्रांतिकारी बदल घडणार आहे. यामुळे मराठवाड्यातील प्रवाशांचा प्रवास सोपा आणि सुखकर होणार आहे.

बीड रेल्वेची मागणी मागील ४० वर्षांपासून होत होती. हे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवंगत केशरकाकू क्षीरसागर, दिवंगत गोपीनाथराव मुंडे आदींचा मोठा वाटा होता. बीड रेल्वेच्या प्रश्नावर लोकप्रतिनिधी, रेल्वे कृती समिती, व्यापारी वर्ग, युवा आंदोलने आणि विविध राजकीय पक्ष या सर्वांचे योगदान नाकारता येणार नाही. बीड रेल्वेचा इतिहास हा संघर्ष, दीर्घ प्रतीक्षा आणि स्थानिक नेत्यांच्या प्रयत्नांनी भरलेला आहे. रेल्वेमार्ग बनवण्याचे सर्वात कठीण काम जमीन संपादनाचे होते. या कामात पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांच्यासह जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी योगदान दिले. तसेच जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी ही रेल्वे सुरू व्हावी, याकरिता जिल्हा प्रशासनाच्या वेळोवेळी बैठका घेऊन; तसेच विविध मंजुरीसाठी पाठपुरावा केला.

या रेल्वे प्रकल्पास १९९५ मध्ये तांत्रिक मान्यता देऊन हा रेल्वेमार्ग मंजूर करण्यात आला. या २६१ किलोमीटरच्या मार्गाला सुरुवातीला केवळ ३५३ कोटी रुपये खर्च अपेक्षित होता. पुढे ४,४५० कोटींचा प्रस्तावित निधी एकाच वेळी केंद्राकडून मिळणे शक्य नसल्याने केंद्र व राज्याने प्रत्येकी ५० टक्क्यांची भागीदारी केली.






आतापर्यंत राज्य सरकारने २ हजार कोटींपेक्षा अधिकची गुंतवणूक केली आहे. मागील १० वर्षांत केंद्र सरकारने मराठवाड्यातील रेल्वे प्रकल्पांसाठी २१ हजार कोटी रुपये दिल्याने हे प्रकल्प पूर्ण होऊ शकले आहेत. या प्रकल्पासाठी निधी वाढवण्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा महत्त्वाचा वाटा आहे. विकासाला गती मिळावी म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाला 'वार रूम'मध्ये प्राधान्य दिले आहे. २०२३ मध्ये न्यू आष्टी ते अहिल्यानगर या मार्गाचे काम सुरू झाले आणि आता ते बीडपर्यंत पोहोचले आहे. लवकरच रेल्वेच्या विद्युतीकरणाचे काम पूर्ण होणार असल्याने रेल्वेचा वेग वाढून प्रवासाचा वेळ कमी होणार आहे. मात्र उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बीड जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारताच काही महिन्यांतच आवश्यक त्या मंजुरी घेऊन बीडकरांचे रेल्वेचे स्वप्न पूर्णत्वास नेले.

मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्राला जोडणारा हा महत्त्वाचा २६१ किलोमीटरचा अहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे मार्ग आहे. यात पहिल्या टप्प्यात १६६ किलोमीटर मार्ग पूर्ण करण्यात आला आहे. या मार्गावर एकूण १६ स्थानके आहेत. या प्रवासासाठी १० ते ४५ रुपये तिकीटदर असणार आहे. प्रवासाचा कालावधी साधारणतः पाच तास असून ही रेल्वे आठवड्यातील सहा दिवस नियमित धावणार आहे.

या रेल्वेमुळे बीड जिल्हा देशातील रेल्वेशी जोडला गेला आहे. तसेच जिल्ह्यातील पर्यटन, उद्योग आणि विद्यार्थ्यांसाठी प्रवास सुलभ झाला आहे. स्थानिक रोजगारासाठी, बांधकाम, रेल्वे मालवाहतूक, प्रवासी सेवा आणि स्थानिक उद्योगव्यवसायांना नव्या संधी निर्माण होणार असून जिल्ह्याच्या अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. शिवाय शेतकरी, विद्यार्थी, व्यापार, रोजगाराच्या संधी व आर्थिक विकासाच्यादेखील संधी वाढणार आहेत. येणाऱ्या कालावधीत रेल्वेच्या माध्यमातून बीडच्या सामाजिक-आर्थिक प्रगतीला नवे आयाम प्राप्त होण्यास मदत होणार आहे. परळी ते बीड रेल्वेमार्गाचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. अहिल्यानगर-बीड-परळी या रेल्वेमार्गामुळे परळी येथील 'श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग' हे तीर्थक्षेत्र जोडले जाणार असल्याने देशातील भाविकांची बारा ज्योतिर्लिंगाची यात्रा अधिक सुलभ होणार आहे. बीड रेल्वे प्रकल्प हा जिल्ह्यासाठी इतिहास घडविणारा असून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाची वाहिनी ठरणार आहे.

(जिल्हा माहिती अधिकारी, बीड.)

**समाजातील वंचित, उपेक्षित आणि शोषित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी कार्य करणारी संस्था म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, अर्थात बार्टी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सामाजिक समतेचा विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि या संबंधी अधिक संशोधन व प्रशिक्षण व्हावे, या उद्देशाने २२ डिसेंबर १९७८ रोजी मुंबई येथे समता विचारपीठ या नावाने संस्थेची स्थापना झाली. नंतर १९८५ मध्ये कार्यालय पुणे येथे स्थलांतरित झाले आणि २००८ पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), या नावाने पुणे येथे संस्था कार्यरत आहे.**

# बार्टी : सामाजिक परिवर्तनाची वाटचाल

**शैलजा पाटील**

सध्या पुण्यातील मुख्यालयासह महाड व नागपूर येथे उपकेंद्रे कार्यरत असून, येरवडा संकुल येथे संस्थेच्या माध्यमातून सफाई कामगारांच्या मुलांसाठी पहिली ते दहावीपर्यंतचे मोफत निवासी शिक्षण दिले जाते.

## बार्टीचे संशोधनात्मक कार्य

बार्टी संस्थेच्या माध्यमातून राज्यातील अनुसूचित जातींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि मानववंशशास्त्रीय स्थितीचा सखोल अभ्यास केला जातो. संस्थेमार्फत या समाजघटकांवरील विविध पैलूंचे संशोधन करून अहवाल स्वरूपात शिफारसींसह शासनास सादर केले जातात. बार्टीच्या माध्यमातून अनुसूचित जातींच्या प्रतिनिधींना सहभागी करून कार्यशाळांचे आयोजन केले जाते. चर्चासत्रे, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, माहिती संकलन, विश्लेषण आणि अहवाल लेखन करण्यात येते. शासनाच्या विविध योजनांचे मूल्यांकन करून त्या संदर्भातील शिफारशीही शासनास सादर केल्या जातात.

संस्थेने आजवर कैकाडी, हिंदू खाटीक, मांग-गारोडी, होलार, गोसावी या समाजांवर आधारित सामाजिक, आर्थिक व




शैक्षणिक सर्वेक्षणे केली आहेत. सध्या बार्टीकडून काही महत्त्वाची संशोधने व दस्तऐवजीकरणविषयक कामे प्रस्तावित आहेत. यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय वास्तव्याचे दस्तऐवजीकरण, माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कायदेमंडळातील कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महिलांविषयक कार्य; तसेच आंबेडकरी चळवळीचा चरित्रकोश संपादन यांचा समावेश आहे. या सर्व उपक्रमांचा प्रमुख उद्देश म्हणजे अनुसूचित जातींच्या समाजघटकांमध्ये सामाजिक जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अभ्यासाधारित योगदान देणे.

## प्रशिक्षण उपक्रम

बार्टी ही संस्था अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व व्यावसायिक प्रगतीसाठी कार्यरत आहे. संस्थेच्या माध्यमातून प्रशिक्षणावर मोठ्या प्रमाणात भर दिला जातो. यामध्ये स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी प्रशिक्षण हा एक महत्त्वाचा घटक आहे. त्याचबरोबर अनुसूचित जातीवरील अत्याचार प्रतिबंधक कायदा (ॲट्रॉसिटी कायदा) या संदर्भात जनजागृती आणि संबंधित कायद्याचे प्रशिक्षणही दिले जाते. आतापर्यंत संस्थेने १९९ कार्यशाळांद्वारे एकूण ३१,८३० प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षित केले आहे. बार्टी संस्थेमार्फत यूपीएससी, एमपीएससी, आयबीपीएस, पोलीस भरती, मिलिटरी भरती, बँकिंग, जेईई नीट, वनसेवा व्यक्तिमत्त्व चाचणी, अभियांत्रिकी व्यक्तिमत्त्व चाचणी अशा विविध स्पर्धा परीक्षांसाठी पूर्व आणि मुख्य परीक्षांकरिता योजना राबविल्या जातात. २०११ पासून हजारो विद्यार्थ्यांनी या योजनांचा लाभ घेतला आहे. यामधून विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. यूपीएससीमध्ये आजपर्यंत एकूण २४८ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. मागील

वर्षात यूपीएससीच्या अंतिम यादीमध्ये बार्टी संस्थेचे १४ विद्यार्थी, तर भारतीय वनसेवेमध्ये २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. याशिवाय मागील वर्षी एमपीएससी परीक्षेमध्ये ५० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. बँकिंग आणि आयबीपीएस परीक्षांमध्येही विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. जेईई व नीट परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीदेखील बार्टीने मागील वर्षापासून प्रशिक्षण सुरू केले आहे. या उपक्रमांतर्गत १९ विद्यार्थ्यांना आयआयटी या नामांकित संस्थांमध्ये प्रवेश मिळाला असून ११४ विद्यार्थ्यांची एमबीबीएसकरिता निवड झाली आहे. या सर्व उपक्रमांच्या माध्यमातून बार्टी संस्थेने अनुसूचित जातीतील युवकांना शैक्षणिक व व्यावसायिक संधी उपलब्ध करून देत, त्यांचा आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक क्षमतेत लक्षणीय वाढ घडवून आणली आहे.

### डिजिटल शिक्षण

सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी सेवा व उजळणी प्रशिक्षण प्रदान करणारी ही एक महत्त्वपूर्ण संस्था आहे. याशिवाय, अधिकाऱ्यांच्या विभागीय परीक्षांचे आयोजनही बार्टीच्या माध्यमातून करण्यात येते.

संस्थेमार्फत युवक व युवतींना रोजगाराभिमुख कौशल्य विकास प्रशिक्षणही दिले जाते. विविध क्षेत्रांमध्ये स्वावलंबन आणि उद्यमशीलता निर्माण व्हावी, यासाठी बार्टीने अनेक उपक्रम राबवले आहेत. आतापर्यंत संस्थेमार्फत ३५ हजार युवक-युवतींना कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात आले असून, त्यापैकी ३१ हजार जणांना रोजगार किंवा स्वयंरोजगाराच्या संधी प्राप्त करून देण्यात बार्टीने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. हे प्रशिक्षण शासकीय प्रशिक्षण संस्था; तसेच कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) अंतर्गत आयोजित केले जाते.

जगभरात वाढत असलेल्या कुशल व अकुशल मनुष्यबळाच्या मागणीचा विचार करून, बार्टीने ओव्हरसीज प्लेसमेंट प्रोग्राम नावाचा उपक्रम राबवण्याचे नियोजन केले आहे. याअंतर्गत परदेशात नोकरीसाठी युवकांना प्रशिक्षित करण्यात येणार आहे. जर्मन भाषेचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. याशिवाय, आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) क्षेत्रातील वाढत्या संधी लक्षात घेता, या क्षेत्रातील मोफत प्रशिक्षणदेखील सुरू करण्यात आले आहे. यासोबतच संस्थेमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल रिसर्च फेलोशिप (BANRF) योजना राबवली जाते. सध्या सुमारे तीन हजार विद्यार्थी या फेलोशिपचा लाभ घेत आहेत. ही योजना एकूण पाच वर्षांसाठी राबवली जाते.

बार्टीचा स्वतःचा BARTI Online नावाचा यु-ट्यूब चॅनलही असून, लाखो सबस्क्रायबर्स या चॅनलच्या माध्यमातून संस्थेशी जोडलेले आहेत. या डिजिटल प्लॅटफॉर्मवर विविध स्पर्धा परीक्षांसंदर्भातील व्याख्याने आयोजित केली जातात. विशेष म्हणजे कोविड काळात या चॅनलच्या माध्यमातून हजारो युवक-युवतींना स्पर्धा परीक्षांचे मोफत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आले. ज्याचा मोठ्या प्रमाणात लाभ झाला.

### संविधान प्रचार, प्रसारासाठी व्यापक उपक्रम

बार्टी ही संस्था सामाजिक न्याय, समता, बौद्धिक प्रबोधन आणि सांस्कृतिक जागृतीसाठी सक्रियपणे कार्यरत असलेली अग्रगण्य संस्था आहे. संस्थेच्या माध्यमातून महामानवांनी स्वतः लिहिलेली; तसेच महामानवांवर आधारित इतर नामांकित लेखकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे वितरण ८५ टक्के सवलतीच्या दरात केले जाते. ही योजना राज्यभरातील वाचकांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली असून, हजारो वाचक या योजनेचा लाभ घेत आहेत.


विविध कार्यक्रमांच्या ठिकाणी बार्टीच्या 'समता रथ' उपक्रमाच्या माध्यमातून पुस्तकांचे स्टॉल लावले जातात. याचबरोबर भारतीय संविधानाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठीही बार्टी संस्थेचे विशेष योगदान आहे. संविधानाची प्रतदेखील ८५ टक्के सवलतीच्या दरात उपलब्ध करून दिली जाते, जेणेकरून सामान्य जनतेपर्यंत संविधान पोहोचू शकेल. संस्थेच्या विस्तार व सेवा विभागामार्फत विविध सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यात ग्रंथ प्रदर्शन, शाहिरी जलसे, सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलने इत्यादींचा समावेश असून या सर्व उपक्रमांना नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळतो.

बार्टी संस्थेचा एक उल्लेखनीय उपक्रम म्हणजे पंढरपूर वारीदरम्यान आयोजित केली जाणारी 'संविधान दिंडी'. या उपक्रमाचा उद्देश म्हणजे भारतीय संविधानाचा प्रचार प्रसार करणे आणि संविधानाची मूल्ये जनतेपर्यंत पोहोचवणे हा आहे. संस्थेमार्फत १ जानेवारी शौर्य दिन, १४ जानेवारी नामांतर दिन, २० मार्च चवदार तळे सत्याग्रह दिन, १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, १४ ऑक्टोबर धम्मचक्र प्रवर्तन दिन आणि ६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिन या दिवशी कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

भारतीय संविधानाला ७५ वर्षे पूर्ण झालीत म्हणून या अमृत महोत्सवानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन संस्थेमार्फत केले गेले. या उपक्रमांमुळे संविधानाचा व्यापक प्रचार झाला. विशेषतः दिल्ली येथे पार पडलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बार्टीने सक्रिय सहभाग नोंदवला. संविधानाचे मूल्य सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे, वाचनाची आवड निर्माण करणे आणि सामाजिक समतेचा विचार रुजवणे हे बार्टीच्या कार्याचे मूलभूत उद्दिष्ट आहे.

## राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन

बार्टीमार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायदेशीर आणि आर्थिक क्षेत्रातील बहुमूल्य योगदानावर प्रकाश टाकणाऱ्या विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांचे आयोजन करण्यात आले आहे. मागील वर्षभरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वकील म्हणून नावनोंदणी व सनदीस शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर 'अ जुरिस्ट' या विशेष कार्यक्रमाचे मुंबई विद्यापीठात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल, बार्टी संस्था आणि मुंबई विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. तसेच, Dr. B.R. Ambedkar : An Economist या कार्यक्रमाचे आयोजन नॅशनल स्टॉक एक्सचेंज (NSE), मुंबई येथे करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने, डॉ. आंबेडकर यांनी लिहिलेल्या 'द प्रॉब्लेम ऑफ द रुपी, इट्स ओरिजन ॲण्ड सोल्युशन' (The Problem of the Rupee : Its Origin and Its Solution) या ऐतिहासिक ग्रंथास शंभर वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधून, लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स लंडन येथे इंटरनॅशनल कॉन्फरन्स ऑन सस्टेनेबिलिटी इन्क्लुझिव्ह डेव्हलपमेंट ॲण्ड डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विषयावर दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले. याचबरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बॅरिस्टर ही पदवी प्राप्त करण्यास शंभर वर्षे पूर्ण झाल्याच्या पार्श्वभूमीवर ग्रेज इन लंडन येथे दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली.



## जात पडताळणी समित्यांचे समन्वयन

राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये कार्यरत असलेल्या जात प्रमाणपत्र पडताळणी समित्यांचे मुख्य समन्वयक म्हणून बार्टीचे महासंचालक यांची शासनाने नियुक्ती केली आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यातील जात प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेची जबाबदारी बार्टी संस्थेवर सोपविण्यात आली आहे. अनुसूचित जमाती वगळता इतर सर्व जातींच्या प्रमाणपत्रांची पडताळणी या ३६ समित्यांमार्फत केली जाते. संपूर्ण प्रक्रिया सध्या पूर्णतः ऑनलाइन करण्यात आलेली असून, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (TCS) यांच्या तांत्रिक सहकार्याने पासपोर्टच्या धर्तीवर जात प्रमाणपत्रे जलद व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी विशेष उपक्रम राबवण्यात येत आहे.

शालेय प्रवेश, निवडणुका व नोकऱ्यांसाठी आवश्यक असलेल्या जात वैधता प्रमाणपत्रांसाठी वेळोवेळी विशेष मोहिमांचे आयोजन करून नागरिकांना जात प्रमाणपत्र पडताळणी करून दिली जाते. आतापर्यंत लाखो नागरिकांना बार्टीच्या माध्यमातून जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## सामाजिक परिवर्तनाची चळवळ

बार्टी ही केवळ एक संस्था नसून समतेच्या मूल्यांवर आधारित सामाजिक परिवर्तनाची एक प्रभावी चळवळ आहे. अनुसूचित जातीच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था संशोधन, प्रशिक्षण, धोरणनिर्मिती आणि जनजागृती या चारही अंगांनी महत्त्वपूर्ण कार्य करत आहे. सामाजिक न्याय विभागाच्या; तसेच बार्टीच्या विविध योजना संपूर्ण महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत पोहोचवण्याचे कार्य समतादूतांमार्फत यशस्वीरीत्या पार पाडले जाते. समतादूत हा ग्रामीण भागातील सामाजिक सलोखा व बंधुभाव निर्माण करणारा महत्त्वाचा दुवा आहे. त्यांनी समाजातील उपेक्षित घटकांपर्यंत माहिती पोहोचवून त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली आहे.

विविध कार्यक्रम, विशेष उपक्रम व जनजागृती मोहिमांद्वारे बार्टी अनुसूचित जातीच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक उत्थानासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. आजच्या स्पर्धात्मक आणि बदलत्या युगात ही संस्था नव्या दिशेने वाटचाल करत आहे आणि समतावादी भारताच्या निर्मितीसाठी कटिबद्ध आहे.

विभागीय संपर्क अधिकारी



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीमंत सेना साहिब सुभा श्री राजे रघुजी भोसले यांच्या ऐतिहासिक तलवारीचे प्रदर्शन आणि लोकार्पण सोहळा पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी प्रभादेवी येथे पार पडला. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, मुधोजी राजे भोसले, आमदार श्रीकांत भारतीय, आमदार संजय उपाध्याय, आमदार राणा जगजितसिंह पाटील, आमदार संजय कुटे, सचिव डॉ. किरण कुलकर्णी, संचालक मीनल जोगळेकर, संचालक डॉ. तेजस गर्गे आदी उपस्थित होते.



R.N.I.No. 14140

महाराष्ट्र शासन

# लोकराज्य

## अधिकृत-विश्वासार्ह-वस्तुनिष्ठ




### वाचकांच्या प्रतिक्रियांचे स्वागत!

- राज्याच्या जडणघडणीचा बोलका साक्षीदार ठरलेल्या लोकराज्य मासिकाची गुणवत्ता आणि संदर्भमूल्य अधिक वाढविण्यासाठी वाचकांच्या प्रतिक्रिया अत्यंत मोलाच्या आहेत.
- वाचकांनी विधायक सूचना, लेखांवरील अभिप्राय lokrajya2011@gmail.com या ईमेलवर किंवा खालील पत्त्यावर पाठवावेत.

### अंक ऑनलाइन मोफत उपलब्ध

संकेतस्थळ : https://dgipr.maharashtra.gov.in
आणि https://mahasamvad.in

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

**पत्ता :** उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, नवीन प्रशासन भवन, १७ वा मजला, मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई ४०००३२.

Visit: www.mahasamvad.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

**गोविंद अहंकारी**
उपसंचालक (प्रकाशने),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.

प्रति / TO

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक गोविंद अहंकारी, उपसंचालक (प्रकाशने), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी मे. प्रिंटरेड इश्युज (इंडिया) प्रा. लि., १७, प्रगती इंडस्ट्रियल इस्टेट, एन. एम. जोशी मार्ग, मुंबई - ४०० ०११ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.

मुख्य संपादक : ब्रिजेश सिंह